अध्याय बारावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐ नमो सद्गुरु वसंतू । ऐक्यकाळीं तुझा ऋतू । तया ऋतु काळींचा मारुतू । ज्ञानवनांतू जैं रिघे ॥ १ ॥ तैं अविद्येचीं जुनीं पानें । गळूनि जाती तत्क्षणें । नव पल्लवीं विराजमानें । विरक्तपणें अनुरक्त ॥ २ ॥ अत्यंत वैराग्याची हांव । खांकर झाले वृक्ष सर्व । त्यांसी निघाले नव पल्लव । अतिलवलव कोंवळिक ॥ ३ ॥ जाहल्या वसंताचें रिगवणें । वृक्ष आडवे फुटले तेणें । सोहंभावाचीं सुमनें । तेणें गुणें विकासलीं ॥ ४ ॥ कृष्णसारूप्यें कृष्णभ्रमर । तेथें झेंपावले अतिसत्वर । आमोद सेविती अरुवार । कैसेनि केसर कुचंबे ॥ ५ ॥ सद्भावाच्या आमोदधारा । सेवितां सुख झालें भ्रमरा । हृदयकमळीं केला थारा । मध्यमद्वारा चालिले ॥ ६ ॥ भेदोनियां साही कमळें । द्विदळादि षोडशदळें । झेंपावलें मळयानिळें । सहस्रदळीं मिसळले ॥ ७ ॥ तेथ सेवूनि पराग धवळ । उन्मत्त मातलें अलिकुळ । करिती आनंदाचा गोंधळ । सुखकल्लोळ स्वानंदें ॥ ८ ॥ लागला अनुहताचा ध्वनी । रुणझुणती दशलक्षणीं । त्याही नादातें प्राशुनी । निःशब्दपणीं निवांत ॥ ९ ॥ तेथें मोक्षसुखाचे घड । डोलतां दिसे अतिगोड । तेणें जीवाचें पुरत कोड । करिती धुमाड सोहंशब्दें ॥ १० ॥ मुमुक्षुमयूर अतिप्रीतीं । पिच्छें पसरूनि नाचती । येऊन वसंतवनाप्रती । टाहो फोडिती गुरुनामें ॥ ११ ॥ नेमस्त कोकिळां होतें मौन । वसंतऋतुराज देखोन । तिंहीं करोनि विसर्जन । मधुरस्तवनें गर्जती ॥ १२ ॥ भक्तिसरोवरीं निर्मळ पाणी । विकासल्या नवविध कमळिणी । भक्त सुस्नात तिये स्थानीं । निमज्जनीं

ओंकाररूपी सद्गुरूला नमस्कार असो. तूं वसंत ऋतु आहेस. ऐक्याचा समय आला म्हणजे द्वैताचें निरसन करून अद्वैताची स्थापना करणारा तूं सद्गुरु प्रकट होतोस. प्राणापान सम करून तो वसंत ऋतूचा वायु ज्ञानरूपी अरण्यांत वाहूं लागतो. १ त्यावेळीं अनादि अविद्यारूपी वृक्षाचीं पिकलेलीं पानें तत्काल गळून पडतात. २ तीव्र वैराग्यामुळें अविद्यावृक्ष करपूं लागतो. तेव्हां सद्गुरुरूपी वसंत ऋतूच्या आगमनानें नवी कोंवळी आरक्त पालवी फुटते, ३ वृक्ष फोंफावतो आणि सोहंभावाचीं फुलें फुलतात. जीवभाव नाहींसा होऊन शिवभाव म्हणजे कृष्णस्वरूपाचें सादृश्य प्राप्त होतें. ४ तेच काळे भ्रमर त्या पुष्पांवर त्वरेनें झांप टाकितात आणि त्यांतील आल्हादकारक मकरंद सेवन करितात. तेव्हां त्या फुलांतील केसर चुरडणार कसें ! ५ त्यामुळें सत्स्वरूपनिष्ठ होऊन, प्रेमामृत सेवन करून हृदयांत स्थिर झालेले भ्रमर सुषुम्नानाडीच्या मार्गानें चिदाकाशांत जाऊं लागले; ६ मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा या सहा कमळांचा भेद करून द्विदलापासून षोडशदलापर्यंतचीं कमलें मलवायूनें वांकून सहस्र दलामध्यें मिसळलीं; ७ तेथल्या शुभ्र परागांचा आस्वाद घेऊन ते भ्रमराचे थवे उन्मत्त झाले, आनंदाचा गोंधळ करूं लागले, व स्वानंदानें सुखाचा कल्लोळ सेवूं लागले. ८ इतक्यांत दशलक्षणांनीं रुणझुण करणारा अनुहताचा शब्द त्यांच्या कानीं पडतांच तो नादहि ग्रहण करून ते निःशब्द होऊन बसले. १० तेथें मोक्षसुखाचे मधुर घड लोंबतांना दिसले. त्यामुळें जीवांचे सर्व मनोरथ पूर्ण झाले व ते 'सोहं' शब्दाची आरोळी ठोकूं लागले. १० इतक्यांत मुमुक्षुरूपी मयूर आपला पिसारा पसरून नाचूं लागले आणि वसंतवनांत येऊन त्यांनीं गुरूच्या नामाचा टाहो फोडिला. ११ यम-नियम-रूपी कोकिला मौन धरून बसल्या होत्या. त्या वसंतऋतु आलेला पहातांच आपलें मौन टाकून त्या मोठ्यानें सद्गुरुस्तवनाचें कूजन करूं लागल्या. १२ भक्तिरूपी सरोवरांत स्वच्छ पाणी होतें. त्यांत नवविधा भक्तीच्या कमलिनी फुलल्या होत्या. त्या सरोवरांत स्नान करणारे भक्त बुडी मारितांच तेथेंच निश्चल झाले. जीव आणि शिव ही चक्रवाक

निश्चळ ॥ १३ ॥ ते सरोवरींचें सेवितां पाणी । जीवशिव चक्रवाकें दोनी । सद्गुरुचिद्भानु वसंतवनीं । देखोनि मिळणीं मिळालीं ॥ १४ ॥ वसंतें उल्हास तरुवरां । उलोनि लागल्या स्वानंदधारा । पारंब्या भेदूनियां धरा । धराधरा विगुंतल्या ॥ १५ ॥ बोधमलयानिळ झळकत । तेणें वनश्री मघमघीत । मोक्षमार्गींचे पांथिक तेथ । निजीं निजत निजरूपें ॥ १६ ॥ ऐसा सद्गुरु वसंतरावो । निजभक्तवना दे उत्सावो । तो भागवतभजनअध्यावो । उद्धवासी देवो सांगत ॥ १७ ॥ बारावे अध्यायीं निरूपण । सत्संगाचा महिमा गहन । कर्माचा कर्ता तेथ कोण । त्यागी तें लक्षण कर्माचें ॥ १८ ॥ संपतां अकरावा अध्यावो । गुह्य सांगेन म्हणे देवो । तें परिसावया उद्धवो । न्याहाळी पहा वो हरिवदन ॥ १९ ॥ काय सांगेल गुह्य गोष्टी । कोण अक्षरें निघती ओंठीं । त्या वचनार्था घालावया मिठी । उल्हास पोटीं उद्धवा ॥ २० ॥ जैसें मेघमुखींचें उदक । वरच्यावरी झेली चातक । तैसें कृष्णवचनालागीं देख । पसरिलें मुख उद्धवें ॥ २१ ॥ स्नान संध्या भोजन । आवडे या एकें काळें जाण । तैसें ज्ञेय ज्ञाता ज्ञान । घ्यावया सावधान उद्धव ॥ २२ ॥ ऐसा उद्धवाचा आदरू । देखोनि हरि झाला सादरू । भक्तकृपाळु अतिउदारू । निजगुह्यसारू सांगत ॥ २३ ॥

भ०—न रोधयति मां योगो न साङ्ख्यं धर्म एव च । न स्वाध्यायस्तपस्त्यागो नेष्टापूर्तं न दक्षिणा ॥ १ ॥
व्रतानियज्ञश्छन्दांसि तीर्थानि नियमा यमाः । यथान्वरुन्धे सत्सङ्गः सर्वसङ्गापहो हि माम् ॥ २ ॥

पक्ष्यांची जोडी मायारूपी रात्रीमुळें परस्परांपासून वेगळी झाली होती. तिनें त्या सरोवरांतील जल प्राशन करितांच वसंतवनामध्यें सद्गुरुरूपी ज्ञानसूर्याचा उदय झाला, अविद्या रात्र नाश पावली व जीव-शिवाचें ऐक्य झालें. १४ वसंतऋतूमध्यें वृक्ष प्रफुल्लित होतात. त्याप्रमाणें हाहि विकास पावून त्याच्यापासून स्वानंदधारा वाहूं लागल्या. त्याच्या पारंब्या पृथ्वीचा भेद करून शेषशायी नारायणापर्यंत जाऊन पोंचल्या व त्याच्याशीं एकरूप झाल्या. १५ बोधरूपी मलयवायु वाहूं लागला. त्यामुळें वनश्री सुगंधित झाली. तेथें मोक्षमार्गांतील प्रवाशांनीं स्वरूपांत स्वरूपानें विश्रांति घेतली. १६ असा हा सद्गुरु वसंतराय आहे. हा वसंतरूपी सद्गुरु आपल्या भक्तरूपीवनाला उत्साह देतो. भागवतांच्या भजनाचा हा अध्याय श्रीकृष्ण उद्धवाला सांगत आहे. १७ बाराव्या अध्यायांत सत्संगाचा अगाध महिमा, तेथील कर्माचा कर्ता कोण व त्यागाचें लक्षण काय, यांचें निरूपण केलें आहे. १८ अकराव्या अध्यायाच्या शेवटीं श्रीकृष्णानें गुह्य गोष्ट सांगेन असें म्हटलें होतें, तेव्हां ती ऐकण्यासाठीं उतावीळ झालेला उद्धव हरीच्या मुखाकडे न्याहाळून पाहूं लागला. १९ श्रीकृष्ण आतां कसली गुप्त गोष्ट सांगणार आहे, त्याच्या तोंडांतून कसलीं अक्षरें निघतील, तें ऐकण्यासाठीं उद्धवाच्या मनांत मोठा उल्हास वाटत होता. २० चातक जसा तोंड उघडून मेघांच्या मुखांतील पडणारे थेंब वरच्यावर झेलून घेतो, तसें उद्धवानें श्रीकृष्णाच्या मुखांतील वचनासाठीं तोंड उघडिलें. २१ स्नान, संध्या व भोजन हीं जशीं एखाद्याला एकाच वेळीं आवडावीं, त्याप्रमाणें ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय यांचें एकाच वेळीं ग्रहण करण्यास उद्धव सावध होऊन राहिला. २२ अशी उद्धवाची उत्कंठा पाहून भक्ताविषयीं अत्यंत दयाळु व अति उदार असा श्रीहरि आपल्या गुह्य रहस्याचें सार सांगण्यास सादर झाला. २३.

(या बाराव्या अध्यायांत प्रथम सत्संगतीचा महिमा, नंतर कर्मानुष्ठान व त्याचा त्याग, यांच्या व्यवस्थेचें वर्णन केलें आहे.)

श्रीभगवान् उवाच-भगवान् म्हणाले, यथा हि सर्वसङ्गापहः सत्सङ्गः मां अवरुन्धे—ज्याप्रमाणें सर्व आसक्तीची निवृत्ति करणारा सत्संग मला वश करूं शकतो, त्याप्रमाणें, मां योगः न रोधयति—मला आसन-प्राणायामादि योग वश करूं शकत नाहीं, न साङ्ख्यं धर्म एव च—सांख्य किंवा अहिंसादि सामान्य धर्म मला वश करीत नाहींत, स्वाध्यायः तपः त्यागः न—वेदांचा जप, कृच्छ्रादि तप व संन्यासी मला वश करीत नाहींत, इष्टापूर्तं न—अग्निहोत्रादि इष्ट व कूप, क्रीडास्थान इत्यादि निर्माण करणें हें पूर्त हीं श्रौतस्मार्त कर्मेंहि माझी प्राप्ति करून देत नाहींत व, दक्षिणा व्रतानि यज्ञः छंदांसि तीर्थानि नियमाः यमाः न—सामान्य दान, एकादशी-उपवासादि व्रतें, देवपूजा, रहस्यमंत्र, तीर्थयात्रा, शौचादि नियम व अहिंसा सत्यादि यम हीं सर्व साधनेंहि माझी प्राप्ति करून देत नाहींत. १-२.

मज वश करावयालागीं । सामर्थ्य नाहीं अष्टांगयोगीं । नित्यानित्यविवेक जगीं । आंगोवागीं मज न पवे ॥ २४ ॥ प्रकृतिपुरुषविवंचना । अखंड आलोडितां मना । पावावया माझिया स्थाना । सामर्थ्य जाणा त्या नाहीं ॥ २५ ॥ धर्म अहिंसादिसहित सत्य । त्यांचेनि मी नव्हें प्राप्त । मुख्य वेदाध्ययनेंही मी अप्राप्त । साङ्ग समस्त जरी पढिले ॥ २६ ॥ तेथ तपें कायसीं बापुडीं । पंचाग्नि असार परवडी । कृच्छ्रचांद्रायणें झालीं वेडीं । त्यांचे जोडी मी न जोडें ॥ २७ ॥ देहगेह सांडूनि उदास । विरजाहोमीं हवी सर्वस्व । साधनीं अतिश्रेष्ठ संन्यास । त्यासी मी परेश नातुडें ॥ २८ ॥ करितां श्रौतस्मार्तकर्मांसी । कर्मठें झालीं पानपिसीं । तरी मी नाकळें त्यांसी । क्लेशहोमेंसीं कष्टतां ॥ २९ ॥ गोदान भूदान तिलदान । दान देतां धनधान्य । त्यांसी मी नाटोपें जाण । दानाभिमान न बचतां ॥ ३० ॥ संकटचतुर्थी ऋषिपंचमी । विष्णुपंचक बुधाष्टमी । अनेक व्रतें करितां नेमीं । ते मी कर्मीं नातुडें ॥३१॥ अश्वमेध राजसूययाग । सर्वस्व वेंचूनि करितां साङ्ग । माझे प्राप्तीसी नव्हतीचि चांग । तेणें मी श्रीरंग नाटोपें ॥ ३२ ॥ हो कां वापी कूप आराम । वृक्षारोपणें मनविश्राम । आचरतां स्मार्तकर्म । मी आत्माराम न भेटें ॥ ३३ ॥ नाना छंद रहस्यमंत्र । विधिविधानें अतिविचित्र । सामर्थ्यें अतिविशेष पवित्र । नव्हतीं स्वतंत्र मत्प्राप्ती ॥ ३४ ॥ पुष्करादि नाना तीर्थ । पापनिर्दळणीं अतिसमर्थें । शीघ्र पावावया मातें । सामर्थ्य त्यांतें असेना ॥ ३५ ॥ यमनियम अहर्निशीं । जे सदा शिणती साधनेंसीं । ते यावया माझ्या द्वारासी । सामर्थ्य त्यांसी असेना ॥ ३६ ॥ उद्धवा यमनियमनिर्धार । एकुणिसावे अध्यायीं सविस्तर । तुज मी सांगेन साचार । संक्षेपाकार बारावा ॥ ३७ ॥ ते यमनियम बारा बारा । आणि सकळ साधनसंभारा । यावया माझिया नगरा । मार्गु पुढारा चालेना ॥ ३८ ॥ ते गेलिया संतांच्या

मला वश करण्याचें सामर्थ्य अष्टांग योगालाहि नाहीं. जगांतील नित्यानित्यविवेकाहि माझी प्राप्ति करून देऊं शकत नाहीं. २४ किंवा प्रकृति पुरुषांचा विचार निरंतर जरी मनांत करीत बसले तरी तेहि माझ्या स्थानाला पोंचविण्यास समर्थ नाहींत. २५ धर्म, अहिंसा किंवा सत्य इत्यादि जे सर्व गुण त्यांनींहि मी प्राप्त होत नाहीं. सर्वांत श्रेष्ठ जें वेदाध्ययन त्याचें सांग साग्र पठण केल्यानेंहि मी प्राप्त होत नाहीं. २६ मग त्यापुढें बापड्या तपांची काय कथा ! पंचाग्निसाधनाचे अनेक प्रकार आणि कृच्छ्रचांद्रायणादि व्रतें यांनीं माझी प्राप्ति होत नाहीं. २७ घर व देह यांवरील आसक्ति सोडून, विरजाहोमांत सर्वस्वाची आहुति देऊन केलेला जो सर्व साधनांतील अतिश्रेष्ठ संन्यास त्यानेंहि माझी प्राप्ति होत नाहीं. २८ कर्मठ लोक श्रौत-स्मार्त कर्में करून भ्रमिष्ट होतात. त्यांना यज्ञयागाचे कष्ट करूनहि माझा लाभ होत नाहीं. २९ कोणी गायी दान दिल्या, भूमीचें दान दिलें, तिळाचें दान, धन-धान्यादिकांचें दान केलें, तरी दानाभिमान सुटल्यावांचून मी त्यांना वश होत नाहीं. ३० संकष्टी चतुर्थी, ऋषिपंचमी, विष्णुपंचमी, बुधाष्टमी इत्यादि अनेक नेम-धर्म व व्रतें-वैकल्यें करूनहि मी प्राप्त होत नाहीं. ३१ सर्व संपत्ति खर्च करून अश्वमेध व राजसूय-यज्ञ जरी यथासांग केले तरी ते माझ्या प्राप्तीच्या उपयोगी नाहींत. ३२ किंवा विहिरी, तळीं बांधिलीं, मार्गस्थांच्या विश्रांतीसाठीं वृक्ष लाविले, उपवनें केलीं, तरी हीं स्मार्त कर्में करूनहि मी आत्माराम भेटत नाहीं. ३३ विविध छंद, रहस्यमंत्र, विचित्र विधि व अनुष्ठानें यांचें सामर्थ्य जरी विलक्षण असलें व तीं अत्यंत पवित्र असलीं तरी त्यांनीं माझी प्राप्ति होत नाहीं. ३४ पुष्करादि अनेक तीर्थें पापक्षालन करण्यास समर्थ आहेत. परंतु सत्वर माझी प्राप्ति करून देण्याचें सामर्थ्य मात्र त्यांत नाहीं. ३५ किंवा रात्रंदिवस यम-नियमादि साधनांनीं थकूनहि साधक माझ्यापर्यंत पोंचण्यास समर्थ होत नाहींत. ३६ उद्धवा ! यम-नियमांचा निर्णय मी तुला एकोणिसाव्या अध्यायांत सविस्तर सांगेन व त्याचे बारा प्रकारहि संक्षेपानें त्याचवेळीं कथन करीन. ३७ पण ते बारा यम आणि बारा नियमहि आपल्या सर्व साधनसामग्रीसह माझ्या वैकुंठनगरीचा मार्ग जाणत नाहींत. ३८ ते सर्व जेव्हां संतांच्या दारीं जातात, तेव्हां सांधूंचा आधार घेऊन

दारा । धरूनि साधूच्या आधारा । अवघीं आलीं माझ्या घरा । एवं परंपरा मत्प्राती ।। ३९ ।। तैशी नव्हे सत्संगती । संगें सकळ संगांतें छेदिती । ठाकठोक माझी प्राप्ती । पंगिस्त नव्हती आणिका ।। ४० ।। किडी भिंगुरटीच्या संगतीं । पालटली स्वदेहस्थिती । तेवीं धरलिया संतांची संगती । भक्त पालटती मद्रूपें ।। ४१ ।। केवळ पाहें पां जडमूढें । चंदनासमीपवर्ती झाडें । ते सुगंध होऊनि लांकडें । मोल गाढें पावलीं ।। ४२ ।। तीं अचेतन काष्ठें सर्वथा । चढलीं देवब्राह्मणांचे माथां । त्यांचा पांग पडे श्रीमंता । राजे तत्त्वतां वंदिती ।। ४३ ।। तैशी धरिल्या सत्संगती । भक्त माझी पदवी पावती । शेखीं मजही पूज्य होती । सांगों किती महिमान ।। ४४ ।। संतसंगतीवेगळें जाण । तत्काळ पावावया माझें स्थान । आणिक नाहींच साधन । सत्य जाण उद्धवा ।। ४५ ।। मागां बोलिलीं जीं साधनें । तीं अवघींही मलिन अभिमानें । ऐक तयांचीं लक्षणें । तुजकारणें सांगेन ।। ४६ ।। अष्टांगयोगीं दुर्जयो पवन । सर्वथा साधेना जाण । साधला तरी नागवण । अनिवार जाण सिद्धींची ।। ४७ ।। नित्यानित्यविवेकज्ञान । तेथ बाधी पांडित्यअभिमान । प्रबळ वांछी धनमान । ज्ञानचि विघ्न ज्ञान्यासी ।। ४८ ।। अहिंसाधर्म करितां जनीं । धर्मिष्ठपणीं गाळिती पाणी । गाळितां निमाल्या जीवश्रेणी । अधर्मपणीं तो धर्म ।। ४९ ।। करितां वेदाध्ययन । मुख्य वेदें धरिलें मौन । पठणमात्रें मी नातुडें जाण । याजनदान वांछिती ।। ५० ।। तप करूं जातां देहीं । क्रोध तापसांच्या ठायीं । परता जावों नेदी कंहीं । वाढला पाहीं नीच नवा ।। ५१ ।। सर्वस्वत्यागें संन्यासग्रहण । तेथही न जळे देहाभिमान । व्यर्थ विरजाहोम गेला जाण । मानाभिमान बाधिती ।। ५२ ।। श्रौत स्मार्त कर्म साङ्ग । इष्टापूर्त जे कां याग । तेथ आडवा ठाके स्वर्गभोग । कर्मक्षय रोग साधकां ।। ५३ ।। नाना दानें देतां सकळ । वासना वांछी दानफळ । कां

माझ्या घरीं येतात. याप्रमाणें माझी प्राप्ति परंपरेनें होणारी आहे. ३९ संतसंगति तशी नाहीं. संत आपल्या संगतीनेंच सर्व संगांचा त्याग करवितात. त्यांना माझी साक्षात् प्राप्ति होते. ते दुसऱ्या कोणाच्या अधीन नसतात. ४० ज्याप्रमाणें कुंभारणीच्या संगतीनें अळीचा देह बदलतो, त्याप्रमाणें संतांची संगति धरली असतां भक्तांचें मत्स्वरूपांत स्थित्यंतर होतें. ४१ चंदनवृक्षाच्या सभोंवार असलेली जड-मूढ झाडेंच पहा ! केवळ चंदनाच्या सामीप्यानेंच त्याच्या सुगंधाचें ग्रहण करून मूल्यवान् बनतात. ४२ तीं अचेतन लाकडेंहि देवांच्या आणि ब्राह्मणांच्या मस्तकांवर चंदनरूपानें चढतात. श्रीमंत त्यांच्या अधीन होतात आणि राजे तर त्यांना वंदन करितात. ४३ त्याप्रमाणें सत्संगति धरिली असतां भक्त माझ्या पदाला येऊन पोंचतात आणि शेवटीं ते मलाहि पूज्य होतात. त्यांचा महिमा किती वर्णावा ! ४४ हे उद्धवा ! माझ्या प्राप्तीसाठीं सत्संगावांचून दुसरा कांहीं उपाय नाहीं, हें सत्य समज. ४५ मीं मागें जीं साधनें सांगितलीं तीं सर्व अभिमानानें मलिन झालेलीं आहेत. त्यांचें लक्षण तुला सांगतों, ऐक. ४६ अष्टांगयोगांतील वायुनिरोध कांहीं केल्या साधत नाहीं आणि तो जरी साधला तरी अनिवार सिद्धि प्राप्त होऊन त्या साधकाला माझ्या प्राप्तीपासून दूर सारितात. ४७ नित्यानित्यविवेकज्ञानांत पांडित्याचा अभिमान बाधतो आणि सन्मान व द्रव्य यांची प्रबल इच्छा होऊन तें ज्ञानच माणसाला विघ्न करितें. ४८ अहिंसाधर्माचें पालन करणारे लोक धर्मबुद्धीनें पाणी गाळून घेतात, पण तें गाळीत असतांना जीवांचा समुदाय प्राणास मुकतो. त्यामुळें तो धर्म हिंसामयच होतो. ४९ वेदाध्ययन केल्यास माझ्याविषयीं मुख्य वेदानेंच मौन धरिलें असल्यामुळें केवळ पठणानें मी प्राप्त होत नाहीं. वेदाध्ययन करणारे याजन व दान यांची इच्छा करितात. ५० शरीरानें तप करूं लागल्यास त्या तपस्व्याच्या मनांत क्रोध उत्पन्न होतो व तो कधीं कमी होत नाहीं तर नित्य नवीनच वाढतो. ५१ सर्वस्वाचा त्याग करून संन्यास घेतला तरी त्यांतहि देहाभिमान दग्ध होत नाहीं. मानाचा अभिमान ज्यांना बाधत असतो त्यांचा ' विरजा ' होम व्यर्थ गेला असें समज. ५२ श्रौत-स्मार्त सांगकर्मे, इष्टापूर्त, सर्व यज्ञ-याग यांत स्वर्गभोगाची इच्छा आडवी येते आणि साधकांना कर्माचाच क्षयरोग लागतो. ५३ अनेक प्रकारचीं सगळीं

दातेपणें गर्व प्रबळ । लागला अढळ ढळेना ॥ ५४ ॥ अनंतव्रतें व्रती झाला । चौदा गांठीं देवो बांधला । शेखीं अनंतातें विसरला । देवो हरविला हातींचा ॥ ५५ ॥ नाना यज्ञ करितां विधी । मंत्र तंत्र पात्रशुद्धी । सहसा पावो न शके सिद्धी । पावल्या बाधी फळभोगू ॥ ५६ ॥ नाना छंदें रहस्यमंत्र । विकळ हो नये उच्चार । मंत्रीं मंत्र रचिले साचार । चळले अपार मंत्रवादी ॥ ५७ ॥ भगवीं करूनि तांबडीं । तीर्थाभिमानें जाले कापडी । भिकें लागलीं बापुडीं । नाहीं अर्धघडी विश्रांती ॥ ५८ ॥ यमनियम बारा बारा । करितां अखंड बोरबारा । चोविसांमाजीं यांचा उभारा । नेणती सोयरा पंचविसावा ॥ ५९ ॥ एवं सांगीतल्या साधनांसी । आपमतीं करितां त्यांसी । बाधकता आहे सर्वांसी । ते म्यां तुजपाशीं सांगीतली ॥ ६० ॥ करितां साधनें आपमतीसी । तेथें विघ्नें उपजती ऐशीं । तींच साधनें साधु उपदेशीं । सर्वही सिद्धीसी पावती ॥ ६१ ॥ साधु न सांगतां निर्धारीं । नाना साधनें हा काय करी । कोण विधान कैशी परी । निजनिर्धारीं कळेना ॥ ६२ ॥ न करितां साधनव्युत्पत्ती । केवळ जाण सत्संगती । मज पावले नेणों किती । तें मी तुजप्रती सांगेन ॥ ६३ ॥

सत्सङ्गेन हि दैतेया यातुधाना मृगाः खगाः । गन्धर्वाप्सरसो नागाः सिद्धाश्चारणगुह्यकाः ॥ ३ ॥
विद्याधरा मनुष्येषु वैश्याः शूद्राः स्त्रियोऽन्त्यजाः । रजस्तमः प्रकृतयस्तस्मिंस्तस्मिन्युगेऽनघ ॥ ४ ॥
बहवो मत्पदं प्राप्तास्त्वाष्ट्रः कायाधवादयः । वृषपर्वा बलिर्बाणो मयश्चाथ बिभीषणः ॥ ५ ॥
सुग्रीवो हनुमानृक्षो गजो गृध्रो वणिक्पथः । व्याधः कुब्जा व्रजे गोप्यो यज्ञपत्न्यस्तथाऽपरे ॥ ६ ॥

दानें देणारांच्या पाठीस दानफळाची इच्छा लागते. आणि त्यांना आपल्या दातृत्वाचा प्रबल गर्व चढतो, तो कांहीं केल्या उतरत नाहीं. ५४ अनंताचें व्रत धरून भक्त व्रती झाला. चौदा गांठींनीं देवाला बांधिलें व शेवटीं त्या अनंताला विसरला आणि देव हातचा घालविला. ५५ तो नानाप्रकारचे यज्ञ विधियुक्त करितो. पण मंत्र, तंत्र, यज्ञाच्या पात्रांची पवित्रता यांनीं केव्हांहि सिद्धि मिळत नाहीं आणि मिळालीच तर फलांचा भोग बाधक होतो. ५६ नाना छंदांमध्यें रहस्यमंत्र केलेले आहेत. त्यांचा उच्चार केव्हांहि विकल होऊं नये, असा नियम आहे. मूळ मंत्र चांगले रचिले आहेत, पण मंत्रोच्चार करणारे मंत्रवादी मात्र अतिशय चळले आहेत. ५७ वस्त्रें तांबडीं भगवीं रंगवून तीर्थाच्या अभिमानानें ते कापडी होतात; परंतु त्यांना अर्धघटकाहि विश्रांति न मिळतां ते बिचारे भिकेला लागतात. ५८ बारा यम आणि बारा नियम यासाठीं सतत शीण करून प्रकृत्यादि चोवीस तत्त्वांतच त्यांचें प्राविण्य असतें. परंतु पंचविसावा जो परम आप्त परमात्मा त्याला मात्र ते जाणत नाहींत. ५९ याप्रकारें वर सांगितलेलीं साधनें आपल्याच बुद्धीनें आचरिलीं असतां तीं, कशीं बाधक होतात, तें मीं तुला सांगितलें. ६० हीं साधनें आपल्याच बुद्धीप्रमाणें आचरिलीं, कीं त्यांत अशीं विघ्नें उत्पन्न होतात. परंतु हींच साधनें जर गुरूच्या उपदेशानुसार आचरिलीं तर सर्व सिद्धीस जातात. ६१ साधूनें जर त्याचानिश्चय सांगितला नाहीं तर साधक या नाना साधनांना घेऊन काय करणार ! कोणतें साधन कशारीतीनें करावयाचें याचा निश्चय कळत नाहीं. ६२ कोणत्याहि साधनाची व्युत्पत्ति केल्यावांचूनच केवळ सत्संगतीनें किती साधक मला पावले, त्याची गणती नाहीं. तेंच मी तुला आतां सांगतों. ६३.

हे अनघ– हे निष्पाप उद्धवा ! सत्सङ्गेन हि– सत्संगानेच दैतेयाः– दितीचे पुत्र, यातुधानाः –राक्षस, मृगाः– अरण्यांतील हिंस्र पशु, खगाः–पक्षी, गन्धर्वाप्सरसः–गंधर्व, अप्सरा, नागाः सिद्धाः चारणगुह्यकाः–नाग, सिद्ध, चारण, गुह्यक, विद्याधराः–विद्याधर, मनुष्येषु रजः तमः प्रकृतयः वैश्याः शूद्राः स्त्रियः अन्त्यजाः-मनुष्यांतील राजस व तामस प्रकृतीचे वैश्य, शूद्र, स्त्रिया व अन्त्यज, तस्मिन् तस्मिन् युगे–निरनिराळ्या युगांमध्यें, बहवः मत्पदं प्राप्ताः– असे पुष्कळ भक्त माझ्या पदाला प्राप्त झाले आहेत, त्वाष्ट्रः कायाधवादयः–वृत्रासुर, प्रल्हाद इत्यादि असुर, वृषपर्वा बलि बाणः मयः अथ बिभीषणः–वृषपर्वा, बलि, बाणासुर, मयासुर व बिभीषण, सुग्रीवः हनुमान् ऋक्षः गजः गृध्रः वणिक्पथः– सुग्रीव, हनुमान्, जांबवान, गजेंद्र, जटायु, तुलाधार, व्याधः कुब्जा व्रजे गोप्यः यज्ञपत्न्यः तथा अपरे–धर्मव्याध, कुब्जा, गोकुळांतील गोपी, दीक्षितांच्या स्त्रिया व तसेंच दुसरेहि अनेक भक्त मला प्राप्त झाले. ३–६.

पाहतां केवळ जडमूढ । रजतमयोनीं जन्मले गूढ । सत्संगती लागोनि दृढ । मातें सुदृढ पावले ॥ ६४ ॥ दैत्य दानव निशाचर । खग मृग गंधर्व अप्सर । सिद्ध चारण विद्याधर । नाग विखार गुह्यक ॥ ६५ ॥ खग मृग सर्प पावले मातें । मानव तंव सहजें सरते । वैश्य शूद्र स्त्रियादि समस्तें । पावलीं मातें सत्संगें ॥ ६६ ॥ जे सकळवर्णधर्मांवेगळे । ज्यांच्या नामास कोणी नातळे । छाया देखूनि जग पळे । अत्यंत मैळे अत्यंज ॥ ६७ ॥ तिहीं धरोनि सत्संगती । आले माझिया पदाप्रती । देवद्विज तयांतें वंदिती । अभिनव कीर्ति संतांची ॥ ६८ ॥ धरिलिया सत्संगती । निंद्य तेही वंद्य होती । उद्धवा तूं निष्पाप निश्चितीं । तरी सत्संगती करावी ॥ ६९ ॥ सोनें साडेपंधरें चोखडें । त्यासी रत्नाची संगती जोडे । तें अधिकाधिक मोल चढे । मुकुटीं चढे महेंद्रा ॥ ७० ॥ तैशीं पुण्यें पुरुषा सत्संगती । जाहल्या अनंत सुख पावती । सुरवर त्यातें वंदिती । शिवादि येती भेटीसी ॥ ७१ ॥ यमधर्म पायां लागती । तीर्थें पायवणी मागती । भावें धरिल्या सत्संगती । एवढी प्राप्ती पुरुषासी ॥ ७२ ॥ दैत्य राक्षस स्त्री शूद्र पाहीं । अंत्यज तरले म्हणसी कायी । त्या त्या युगाच्या ते ते ठायीं । बहुसाल पाहीं उद्धरिले ॥ ७३ ॥

वृत्रासुर गाइजे वेदीं । जो इंद्रासीं मिसळला युद्धीं । युद्धींही अविरुद्ध बुद्धी । माझे निजपदीं पावला ॥ ७४ ॥ ऐकतां नारदाच्या गोठी । गर्भींच मजसी घातली मिठी । जो जन्मला कयाधूच्या पोटीं । भक्तजगजेठी प्रल्हादु ॥ ७५ ॥ वृषपर्वा दैत्य उद्भट । माझे पदीं झाला प्रविष्ट । बळीच्या द्वारीं मी खुजट । झालों बटू भिकेसी ॥ ७६ ॥ छळें करितां बळिबंधन । छळितां मी छळिलों जाण । अंगा आलें द्वारपाळण । बळीआधीन मी झालों ॥ ७७ ॥ त्या बळीचा पुत्र बाणासुर । शिववरें मातला थोर ।

जे केवल जड-मूढ, राजस व तामस योनींत जन्मलेले असेहि दृढ सत्संगतीनें मला प्राप्त झाले. ६४ दैत्य दानव, राक्षस, श्येनादि मोठे पक्षी, सिंहादि हिंस्र पशु, गंधर्व, अप्सरा, सिद्ध, चारण, विद्याधर, विषारी सर्प, गुह्यक, ६५ सामान्य पशु, पक्षी हे सर्व मला प्राप्त झाले. मग मनुष्ययोनि तर स्वभावतःच श्रेष्ठ आहे. त्यांतील वैश्य, शूद्र, स्त्रिया हीं सगळीं केवल सत्संगानें मला प्राप्त झालीं. ६६ फार काय ! पण सर्व आश्रम आणि धर्म यांहूनहि भिन्न असलेले, ज्यांच्या नांवालाहि कोणी स्पर्श करीत नाहीं, ज्यांची सावली पाहून लोक दूर पळतात, असे जे मलिन अंत्यज ६७ तेहि सत्संगाच्या प्रभावानें माझ्या पदाला येऊन पोंचले व देव, ब्राह्मण त्यांना वंदन करूं लागले. अशी संतांची कीर्ति मोठी आश्चर्यकारक आहे. ६८ हे उद्धवा ! संतसंगति धरिली असतां निंद्य लोकहि वंद्य होतात. तूं खरोखर निष्पाप आहेस. तरी संतांची संगति धर. ६९ आधींच साडे पंधरा दराचें उत्तम सोनें आणि त्यांत कोंदणांत रत्नें बसवून त्यांची भर पडली कीं, त्याची किंमत जास्तच वाढते व तें सम्राटाच्या मस्तकावर बसतें. ७० त्याप्रमाणें पुण्यवान् पुरुषाला सत्संगति घडली असतां त्याला अनंत सुखाची प्राप्ति होते. देव त्याला वंदन करितात आणि शिवादिक त्याच्या भेटीला येतात. ७१ यम-धर्म त्याचे पाय धरितात. पुण्य-तीर्थें त्याच्या पायाचें तीर्थ मागतात. भक्तीभावानें सत्संगति धरिली असतां पुरुषाला एवढी प्राप्ति होते. ७२ दैत्य, राक्षस, स्त्री, शूद्र किंवा अत्यंज इतकेच उद्धरून गेले असें नाहीं, तर त्या त्या युगांत आणखीहि पुष्कळ भक्तांचा उद्धार झाला आहे. ७३.

वेदानें ज्या वृत्रासुराचें वर्णन केलें आहे, त्यानें इंद्राबरोबर युद्ध केलें, पण युद्धप्रसंगीहि त्याची विरोधबुद्धि नसल्यामुळें तो माझ्या पदाला प्राप्त झाला. ७४ कयाधूच्या पोटीं जन्मलेल्या भक्तामध्यें श्रेष्ठ प्रल्हादानें नारदाच्या गोष्टी ऐकून गर्भांत असतांनाच मज परमात्म्याला मिठी घातली. ७५ वृषपर्वा मोठा प्रबल दैत्य. तोहि माझ्या पदाला प्राप्त झाला. मी बळीच्या दारांत वामन बटु होऊन भिक्षा मागण्यास गेलों. ७६ तेथें मीं बळीला कपटानें बांधिलें असतां त्यानेंहि मला फसविलें. अखेर द्वारपाळ होऊन मी बळीच्या अधीन झालों. ७७ त्या बळीचा पुत्र बाणासुर शंकराच्या वरानें अतिशय मत्त झाला आणि त्यानें माझ्या पुत्राचा पुत्र चोरून नेला.

माझे पुत्राचा चोरिला पुत्र । दोहींचा हेर नारदू ॥ ७८ ॥ तो म्यां साधूनि धरिला चोरू । बाणीं केला अतिजर्जरू । छेदिला सहस्र भुजांचा भारू । शिव जीवें मारूं नेदीच ॥ ७९ ॥ तो म्हणे भक्तपुत्र तूं झणीं मारीं । मजही बळीची भीड भारी । अखंड मी असें त्याच्या द्वारीं । यालागीं उद्धरीं बाणातें ॥ ८० ॥ मग संबोखावया शिवातें । बाण आपुले निजहस्तें । ऐक्यें शिवपदीं स्थापिलें त्यातें । कल्याणातें पावला ॥ ८१ ॥ खांडववन अग्नीसी । अर्जुनें दीधलें खावयासी । तेथें जळतां मयासुरासी । म्यांचि तयासी उद्धरिलें ॥ ८२ ॥ राक्षसकुळीं जन्मला जाण । शत्रूचा बंधु बिभीषण । माझ्या ठायीं अनन्य-शरण । जीवप्राण तो माझा ॥ ८३ ॥ सुग्रीव हनुमंत जांबवंतू । यांचा पवाडा विख्यातू । जटायु उद्धरिला वनांतू । जो रावणें खस्तू केला होता ॥ ८४ ॥ गज सरोवरीं ग्रहग्रस्त । स्त्रियापुत्रीं सांडिला जीत । तो अंतकाळीं मातें स्मरत । आर्तभूत अतिस्तवनें ॥ ८५ ॥ सांडूनि समस्तांची आस । पाहोनि वैकुंठाची वास । राजीव उचलूनि राजस । पावें परेश म्हणे वेगीं ॥ ८६ ॥ त्या गजेंद्राचे तांतडी । वैकुंठींहूनि लवडसवडी । म्यां गरुडापुढें घालोनि उडी । बंधन तोडी गजाचें ॥ ८७ ॥ त्यासी पशुयोनीं जन्म होतें । परी तो अंतीं स्मरला मातें । पावला माझ्या निजधामातें । गाइजे त्यातें पुराणीं ॥८८॥ वैश्य तुळाधार वाणी । सत्य वाचा सत्य जोखणी । सत्यें पावला मजलागुनी । सत्यतोलणी त्याचें नांव ॥ ८९ ॥ अंत्यजामाजीं धर्मव्याध । माझें पावला निजपद । जराव्याध गा प्रसिद्ध । करोनि अपराध उद्धरिला ॥ ९० ॥

त्याप्रसंगीं दोन्हीकडे बातमीदार नारद. ७८ त्याला गांठून मीं चोर पकडला आणि त्याला बाणानें अत्यंत जर्जर केलें. त्याच्या सहस्र भुजांचा भार तोडून टाकिला. मी त्याला जीवानिशीं मारणार होतों, पण काय करूं ७९ शंकर त्याला मारूं देईना. तो म्हणाला, हा तुझ्या भक्ताचा पुत्र आहे. त्याला मारूं नको. मलाहि बळीची मोठी भीड. मी त्याच्या दारांत अखंड उभा ! म्हणून मीं बाणासुराचा उद्धार केला. ८० मग शंकराची समजूत करण्या-साठीं मी त्याला ऐक्यरूपानें शिवपदीं स्थापिलें. त्यामुळें त्याचें कल्याण झालें. ८१ अर्जुनानें अग्नीला खांडववन भक्षण करण्यास दिलें. तेथें मयासुर जळत होता. त्याला मींच उद्धरिलें. ८२ रामावतारांतील माझ्या शत्रूचा बंधु बिभीषण राक्षसकुलांत जरी जन्मला होता, तरी तो मला अनन्यशरण येतांच माझा जीव कीं प्राण होऊन राहिला. ८३ सुग्रीव, हनुमान्, जांबवान् यांचा पराक्रम तर प्रसिद्धच आहे. रावणानें वनांत छिन्नभिन्न करून टाकिलेल्या जटायूचाहि मीं उद्धार केला. ८४ मगरानें सरोवरांत गजाला ग्रासलें. त्याच्या स्त्री पुत्रांनींहि जिवंत असतांनाच त्याचा त्याग केला. अतिशय गांजल्यामुळें अंतकाळीं त्यानें माझें स्मरण केलें. ८५ व सर्वांची आशा सोडून वैकुंठाची वाट पहात, सोंडेनें कमल उचलून 'हे परमात्म्या सत्वर पाव' असें तो म्हणाला. ८६ त्या गजेंद्राची तांतडी पाहून मीं वैकुंठाहून मोठ्या लगबगीनें गरुडाच्याहि पुढें उडी टाकून गजेंद्राचें बंधन तोडिलें. ८७ त्याचा पशुयोनींत जन्म झाला होता, तरी त्यानें मरणकाळीं माझें स्मरण करितांच तो माझ्या पदाला प्राप्त झाला. पुराणांत त्याचें वर्णन आहे. ८८ (जाजली नांवाच्या मुनीला तपाचा गर्व झाला होता. त्याच्याशीं एका धर्मात्म्या वैश्यानें वाद करून त्याचा गर्व परिहार केला, अशी भारताच्या शांतिपर्वांत कथा आहे.) सत्य बोलणारा व ग्राहकांस खऱ्या मापानें जिन्नस विकणारा असा एक तुळाधार वाणी होता. तो सत्यानें मला पावला. सत्यतोलणी याच नांवानें तो प्रसिद्ध होता. ८९ (मिथिला नगरींत एक धर्मव्याध रहात होता. त्यावेळीं एक ब्राह्मण तपश्चर्या करीत वृक्षाखालीं अध्ययन करीत असतां झाडावर बसलेल्या एका पक्षिणीची विष्ठा त्याच्या अंगावर पडली. तेव्हां ब्राह्मणानें वर दृष्टि करितांच ती दग्ध झाली. स्वतःच्या दृष्टिपाताचा हा प्रभाव पाहून ब्राह्मणाला अतिशय गर्व झाला; त्यानंतर एके दिवशीं तो मधुकरी मागण्यास एका पतिव्रतेच्या घरीं गेला असतां, तिनें भिक्षा वाढण्यास उशीर लाविला म्हणून तिच्याकडे या ब्राह्मणानें रागानें पाहिलें; पण ती दग्ध झाली नाहीं. तेव्हां ब्राह्मणाला मोठें आश्चर्य वाटलें. तें जाणून ती म्हणाली कीं मी पतिव्रता असल्यामुळें माझें तेज तुझ्यापेक्षां प्रखर आहे. त्यामुळें तुझा क्रोध मला जाळूं शकला नाहीं. तूं धर्मव्याधाकडे जा. तो तुझें समाधान करील. त्याप्रमाणें तो ब्राह्मण त्याजपाशीं गेला असतां व्याधानें त्याला उपदेश केला. अशी कथा

चरणीं विंधोनियां बाण । घायें घेतला माझा प्राण । तो परीक्षिति जराव्याध जाण । कृष्णें आपण तारिला ॥ ९१ ॥ कौलिकांमाजीं गुहक देख । आला श्रीरामासंमुख । कर्म निरसलें निःशेख । निजधाम देख पावला ॥ ९२ ॥ कुब्जा तीं ठायीं वांकुडी । नीट निजभावें चोखडी । तिच्या चंदनाची शुद्ध गोडी । अतिआवडी मजलागीं ॥ ९३ ॥ तिणें चर्चूनियां चंदन । मन केलें मदर्पण । मी झालों तिजआधीन । निजधाम ते जाण पावली ॥ ९४ ॥ गोकुळींचिया गोपिका । संसारासी होऊनि विमुखा । तनमनप्राणें मजलागीं देखा । भाळोनि निजसुखा पावल्या ॥ ९५ ॥ माझी गोपिकांसी परम आवडी । कीं मजचि गोपिकांची गोडी । पाहतां यांचे समान पाडीं । जाहलीं बापुडीं साधनें ॥ ९६ ॥ सांडूनि संसाराची चाड । न धरूनि पतिपुत्रांची भीड । यज्ञपत्न्यांसी माझें कोड । भावार्थें दृढ भाविकां ॥ ९७ ॥ तिहीं मज अर्पोनियां अन्न । माझें निजधाम पावल्या जाण । मज न पावतीच ते ब्राह्मण । जयांसी कर्माभिमान कर्मांचा ॥ ९८ ॥ एक ब्राह्मण अतिशास्त्रबळें । पत्नीसी येवूं नेदी मजजवळें । तुह्मी वेदशास्त्रांहीं वेगळे । गोरक्ष गोंवळें केवीं पूजा ॥ ९९ ॥ येरी समस्तां जातां देखोन । तिचें मजलागीं तळमळी मन । अति कर्मठ तो ब्राह्मण कठिण । अवरोधून राखिली ॥ १०० ॥ पित्यानें लाविलीसी माझ्या हातीं । तेव्हांच मी तुझ्या देहाचा पती । मज सांडूनि केउती । गोवळाप्रती जातेसी ॥ १ ॥ येरी म्हणे तूं या देहाचा पती । तो देह ठेवूनियां तयाप्रती । जीवित्वें मीनलिया मजप्रती । सायुज्य मुक्ति पावली ॥ २ ॥ ज्या माझिया प्राप्तीसी । साधक शिणती नाना सायासीं । तीं साधनें न करितां त्यांसी । अनायासीं मज पावल्या ॥ ३ ॥

वनपर्वांत आहे.) अंत्यजांतील धर्मव्याधाला माझी प्राप्ति झाली. ९० शुकाचार्य परीक्षिताला म्हणाले कीं, हे राजा ! कृष्णाचें दयाळुत्व मी तुला किती म्हणून सांगूं ! जराव्याध क्षत्रिय असून दुराचारामुळें व्याध झाला होता. त्याचाच बाण श्रीकृष्णास लागून त्यानें त्याचा प्राण घेतला; तथापि भगवानांनीं त्यासहि तारिलें. ९१ कोळ्यांतील गुहक श्रीरामाच्याजवळ येतांच त्याच्या सर्व कर्मांचें निरसन होऊन तो निजधामाला प्राप्त झाला. ९२ कुब्जा तीन ठिकांणीं वांकडी; पण तिचा माझ्यावर निस्सीम भाव होता. तिच्या चंदनाची मला अतिशय आवड होती. तिनें अंगाला चंदनाची उटी लावून मन मदर्पण केलें. तसा मी तिच्या अधीन झालों आणि ती माझ्या पदाला पोंचली. ९४ गोकुळांतील गोपी संसारापासून विमुख होऊन भक्तीनें मला भाळल्या व तन, मन, धन मदर्पण करून आत्मसुखाला प्राप्त झाल्या. ९५ गोपींना माझी अत्यंत आसक्ति व मलाहि गोपींची परम आवड; हें पाहून इतर साधनें बिचारीं दीन झालीं. ९६ संसाराची चाड न धरितां पति पुत्रांची भीड सोडून, याज्ञिकांच्या स्त्रियांनीं अत्यंत भक्तीनें माझ्यावर दृढभाव ठेविला. ९७ त्यांनीं मला अन्न अर्पण करून माझी प्राप्ति करून घेतली. परंतु ज्या ब्राह्मणांना आपल्या कर्मांचा अभिमान असतो ते केव्हांहि मला प्राप्त होत नाहींत. ९७ एका शास्त्रसंपन्न ब्राह्मणानें आपल्या पत्नीला मजपाशीं येऊं दिलें नाहीं. तुम्ही वेदशास्त्रबाह्य आहांत, तुम्ही गवळी आहांत, तुमची पूजा कशी करावी ! ९९ इतर स्त्रिया मजकडे येत असलेल्या पाहून तिचें मन तळमळूं लागलें; परंतु त्या महाकर्मठ, कर्दनकाळ ब्राह्मणानें तिला प्रतिबंध केला. १०० तो म्हणाला कीं तुझ्या पित्यानें तुला माझ्या हातीं दिलें तेव्हांच मी तुझ्या देहाचा स्वामी झालों. तरी आतां मला सोडून तूं गवळ्यापाशीं कशी जातेस ! १ तिनें उत्तर दिलें कीं, तूं या देहाचा पति आहेस. तो देह तुझ्यापाशीं ठेवितें, असें बोलून ती आत्मत्वानें मला प्राप्त झाली आणि सायुज्य मुक्तीला पावली. २ ज्या माझ्या प्राप्तीसाठीं साधक नानाप्रकारचीं साधनें करण्यांत थकून जातात, तीं साधनें आचरिल्यावांचूनच त्या मला प्राप्त झाल्या. १०३.

ते नाधीतश्रुतिगणा नोपासितमहत्तमाः । अव्रतातप्ततपसः सत्सङ्गान्मामुपागताः ॥ ७ ॥

तिहीं नाहीं केलें वेदपठण । नाहीं गुरु केले केवळ शास्त्रज्ञ । व्रततपादि नाना साधन । नाहीं जाण तिहीं केलें ॥ ४ ॥ केवळ गा सत्संगतीं । मज पावल्या नेणों किती । एकभावें जे भावार्थी । त्यांसी मी श्रीपति सुलभू ॥ ५ ॥

केवलेन हि भावेन गोप्यो गावो नगा मृगाः । येऽन्ये मूढधियो नागाः सिद्धा मामीयुरञ्जसा ॥ ८ ॥

केवळस्वरूप जे संत । त्या माझी संगती झाली प्राप्त । काय करिसी तप व्रत । भावार्थे प्राप्त मज जाहलिया ॥ ६ ॥ होआवया माझें पद प्राप्त । त्यांसी भांडवल गा भावार्थ । भावबळें गा समस्त । पद निश्चित पावल्या ॥ ७ ॥ ऐकोनि माझें वेणुगीत । गोपिका सांडूनि समस्त । निजदेहातें न सांभाळित । मज गिवसीत पातल्या ॥ ८ ॥ सांडूनि पतिपित्यांची चाड । न धरोनि वेदशास्त्रांची भीड । माझे ठायीं निजभाव दृढ । प्रेम अति गोड गोपिकां ॥ ९ ॥ पुत्रस्नेह तोडूनि घायें । विधीतें रगडूनि पायें । माझे आवडीचेनि लवलाहें । गोपिका मज पाहें पावल्या ॥ ११० ॥ त्याचपरी जाण गायी । वेणुध्वनी वेधल्या पाहीं । व्याघ्रभय विसरल्या देही । माझ्या ठायीं विनटल्या ॥ ११ ॥ माझ्या वेणुध्वनी वेधलें मन । वत्सें विसरलीं स्तनपान । मुखींचा कवळ मुखी जाण । माझें ध्यान लागले ॥ १२ ॥ माझ्या

—त्यांना सत्संगाहून निराळें साधन नाहीं, असें आतां भगवान् सांगतात—

नाधीतश्रुतिगणाः—ज्यांनीं श्रुतिसमूहाचें अध्ययन केलें नाहीं, **नोपासितमहत्तमाः**—त्या वेदाध्ययनासाठीं ज्यांनीं श्रेष्ठ श्रोत्रियांची उपासना केलेली नाहीं, अव्रतातप्ततपसः—ज्यांनीं व्रतें व तपश्चर्या केलेली नाहीं ते ते माझे भक्त, **सत्संगात् मां उपागताः**—सत्संगामुळें मला प्राप्त झाले आहेत. [सज्जनांशीं संग म्हणजे माझ्याशींच संग, अशा अभिप्रायानें येथें सत्संग असें म्हटलें आहे, किंवा स्वसंगाचेंहि सत्संगत्व येथें विवक्षित आहे. कारण ' स्व ' जो परमात्मा त्यालाहि स्वत्व आहेच किंवा ' सत्संगात ' म्ह० माझ्या भक्ताच्या संगानें असा याचा भावार्थ.] ७.

त्यांनीं वेदपठण केलें नव्हतें किंवा शास्त्रवेत्ते गुरु केले नव्हते किंवा व्रत-तपादि अनेक साधनेहि त्यांनीं आचरिलीं नव्हतीं ४ केवळ सत्संगतीनें किती स्त्रिया माझ्या पदाला प्राप्त झाल्या त्यांची गणती नाहीं. जो एकनिष्ठेनें भावार्थी असतो, त्याला मी श्रीपति अत्यंत सुलभ आहें. १०५.

—वर सांगितलेल्या भक्तांतील वृत्रासुरादिकांचें कांहींना कांही तरी अन्य साधन संभवतें. पण गोपीप्रभृति सर्वथा अज्ञ असलेल्या भक्तांना भक्तीवांचून दुसरें कांहींच साधन नाहीं, असें सांगतात—

गोप्यः गावः नगाः मृगाः ये अन्ये मूढधियः नागाः—गोपी, गोकुळांतील गायी, यमलार्जुनादि वृक्ष, हरिणें व असेच दुसरेहि जे मूढबुद्धि कालियादि नाग ते सर्व, **केवलेन हि भावेन**—सत्संगामुळें प्राप्त झालेल्या निरतिशय प्रीतीनें, **सिद्धाः**—कृतार्थ होत्साते, मां अंजस ईयुः—मला तत्काल प्राप्त झाले. [किंवा त्यावेळच्या सर्वच वृक्ष-वनस्पति इत्यादिकांची भगवानावर निरतिशय प्रीति होती, असें भगवानाच्याच 'अहो अमी देववरामरार्चितम्०' इत्यादि वचनावरून अवगत होतें.] ८.

केवळ आत्मस्वरूप जे संत त्यांना माझी संगति प्राप्त झाली. भावार्थानेंच मला प्राप्त झाल्यावर व्रतें व तपें काय करावयाचीं ! माझ्या प्राप्तीचें भांडवल केवळ भावार्थच आहे. दुसरें कांहीं नाहीं. सर्व स्त्रिया केवल भावार्थाच्या बळानेच माझ्या पदाला प्राप्त झाल्या. ७ माझ्या मुरलीचा आवाज कानीं पडतांच गोपी सगळें सोडून, देहभान विसरून, मला शोधित आल्या. ८ पिता, पति इत्यादिकांची भीति न बाळगितां, वेदशास्त्रांची भीड न धरितां, माझ्यावरच दृढ भक्ति ठेवून अति प्रेमळ गोपिका मजकडे आल्या. ९ पुत्रस्नेहाचा पाश तोडून, कर्तव्याला पायानें चुरडून, माझ्यावरील भक्तीमुळें त्या माझ्या पदाला पावल्या. १० त्याचप्रमाणें गायी देखील माझ्या मुरलीच्या गायनावर लुब्ध होऊन वाघ्रादिकांचें भय विसरून माझ्या समीप येऊन उभ्या राहिल्या. ११ माझ्या वेणुध्वनीकडे मन वेधल्यामुळें वांसरें दूध पिण्याचें विसरलीं, त्यांच्या तोंडांतील घांस तसाच तोंडात राहिला आणि त्यांना

वेणुश्रवणास्तव जिहीं । निजवैर सांडूनि देहीं । येरयेरांवरी माना पाहीं । व्याघ्रहरिणें तींही विनटलीं ॥ १३ ॥ म्यां उपडिले यमलार्जुन । ते तरले हें नवल कोण । वृंदावनींचे वृक्ष तृण । माझ्या सांनिध्यें जाण उद्धरले ॥ १४ ॥ मयूर तरले मोरपिसी । गुल्मलतातृणपाषाणांसी । जड मूढ वृंदावनवासी । मत्सांनिध्यें त्यांसी उद्धारू ॥ १५ ॥ माझे संगतीं अनन्य प्रीती । तेचि त्यांस शुद्ध भक्ती । तेणें कृतकृत्य होऊनि निश्चितीं । माझी निजप्राप्ती पावले ॥ १६ ॥ माझेनि चरणघातें साचार । कालिया तरला दुराचार । नाग नागिणी सपरिवार । माझेनि विखार उद्धरले ॥ १७ ॥ आपुली जे निजपदप्राप्ती । ते सत्संगेंवीण निश्चितीं । दुर्लभ हे उद्धवाप्रती । स्वयें श्रीपति सांगत ॥ १८ ॥

यं न योगेन साङ्ख्येन दानव्रततपोध्वरैः । व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः प्राप्नुयाद्यत्नवानपि ॥ ९ ॥

योग याग व्रत दान । वेदाध्ययन व्याख्यान । तप तीर्थ ज्ञान ध्यान । संन्यासग्रहण सादरें ॥ १९ ॥ इत्यादि नाना साधनें । निष्ठा करितां निर्बंधनें । माझी प्राप्ती दुरासतेनें । जीवेंप्राणें न पविजे ॥ १२० ॥ यापरी शिणतां साधनेंसीं । माझी प्राप्ति नव्हे अतिप्रयासीं । ते गोपी पावल्या अप्रयासी । सत्संगासी लाहोनी ॥ २१ ॥ त्या गोपिकांसीं माझी प्रीती । मीचि त्यांची सत्संगती । मत्संगें निजपदप्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २२ ॥ गोपिकांची सप्रेम स्थिती । ते तुज गोकुळीं झाली प्रतीती । तुजही न तर्केच त्यांची प्रीती । ते मी तुजप्रती सांगेन ॥ २३ ॥ गोपिकांचे अत्यंत प्रेम । स्वमुखें सांगे पुरुषोत्तम । उद्धवाचें भाग्य उत्तम । आवडीचें वर्म देवो सांगे ॥ २४ ॥

माझेंच ध्यान लागलें. १२ माझ्या मुरलीचा नाद ऐकण्यासाठीं परस्परांविषयींचें वैर विसरून वाघ व हरणें एकमेकांच्या अंगावर माना टाकून बसलीं. १३ वृंदावनांतील वृक्ष व गवतहि जर माझ्या सांनिध्यानें उद्धरून गेलें तर मीं उचललेलें जुळें यमलार्जुन तरले यांत नवल कसलें. १४ मीं मोराचीं पिसें धारण केलीं म्हणून मोर तरले. वृंदावनांतील गुल्म, वेली, गवत, दगड, जड, मूढ हीं सर्व माझ्या नुसत्या सहवासानें उद्धरलीं. १५ माझ्या सहवासाची ज्यांना आवड असते, त्यांची तीच शुद्ध भक्ति होय. त्यामुळें ते कृतकृत्य होऊन माझ्या पदाला प्राप्त झाले; १६ माझ्या पायाच्या स्पर्शानेंच दुराचारी कालिया सर्प तरला व इतर सर्प सर्पिणींसह सर्व विषारी प्राण्यांचा माझ्यामुळेंच उद्धार झाला. १७ सत्संगतीवांचून आपल्या आत्मपदाची प्राप्ति अत्यंत दुर्लभ आहे, असें श्रीकृष्णांनी स्वतः उद्धवाला सांगितलें. ११८

—पुढील श्लोकांत भगवत्प्राप्तीची दुर्लभता सांगतात—

योगेन सांख्येन दान-व्रत तपोध्वरैः व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः यत्नवान् अपि यं न प्राप्नुयात्–योग, सांख्य, दानें, व्रतें, तप, यज्ञ, वेदशास्त्रव्याख्यान, स्वाध्याय व संन्यास यांच्यायोगानें ज्यानें फार मोठा प्रयत्न केला आहे असाहि साधक ज्याला प्राप्त होत नाहीं. [त्या मला पूर्वोक्त गोपी वगैरे प्राप्त झाल्या. असा वरील श्लोकाशीं संबंध. येथें प्रथमतः ज्या गोपी, पशु वगैरे कृष्णाशीं संगत झाले तेच संत, त्यांचा जो इतरांशीं संग तो सत्संग, त्यामुळें त्यांची भक्ति उत्पन्न झाली, असें समजावें.] ९.

योग, याग, व्रत, दान, वेदाध्ययन, त्याचें व्याख्यान, तप, तीर्थ, ज्ञान, ध्यान, आदरपूर्वक संन्यासग्रहण. १९ इत्यादि अनेक साधनें निष्ठापूर्वक मोठ्या निश्चयानें जरी केलीं तरी माझी प्राप्ति होत नाहीं. २० याप्रमाणें अनेक साधनांनीं थकूनहि जी माझी प्राप्ति होत नाहीं, तीच केवळ सत्संगतीमुळें गोपींनीं सहज प्राप्त करून घेतली. २१ उद्धवा ! त्या गोपींची मजवर अत्यंत प्रीति होती आणि मीच त्यांची सत्संगति होतों. सत्संगानें आत्मपद प्राप्त होतें, हें खात्रीनें जाण. २२ गोपींच्या प्रेमळपणाचा अनुभव तुला गोकुळांत आलेलाच आहे. परंतु त्यांची मजवर केवढी निष्ठा होती, त्याची तुला यथार्थ कल्पना करितां आली नाहीं. म्हणून मी आतां तुला सांगतों. २३ श्रीकृष्ण स्वमुखानें गोपिकांच्या उत्कृष्ट प्रेमाचें वर्णन करीत आहेत. उद्धवाचें भाग्य थोर, म्हणून देव आपल्या आवडीचें रहस्य सांगत आहेत. १२४

रामेण सार्धं मथुरां प्रणीते श्वाफल्किना मय्यनुरक्तचित्ताः ।
विगाढभावेन न मे वियोगतीव्राधयोऽन्यं ददृशुः सुखाय ॥ १० ॥

बळिभद्रासमवेत तत्त्वतां । अक्रूरें मज मथुरे नेतां । तैं गोपिकांसी जे झाली व्यथा । ते सांगतां मज नये ॥ २५ ॥ ते त्यांची अवस्था सांगतां । मज अद्यापि धीर न धरवे चित्ता । ऐसें देवो सांगत-सांगतां । कंठीं बाष्पता दाटली ॥ २६ ॥ सांगतां भक्तांचें निजप्रेम । प्रेमें द्रवला पुरुषोत्तम । जो भक्त-कामकल्पद्रुम । कृपा निरुपम भक्तांची ॥ २७ ॥ मज मथुरे जातां देखोनी । आंसुवांचा पूर नयनीं । हृदय फुटे मजलागुनी । प्रेमें लोळणी घालिती ॥ २८ ॥ पोटांतील परम प्रीती । सारितां मागें न सरती । धरिले चरण न सोडिती । येती काकुलती मजलागीं ॥ २९ ॥ नवल भावार्थ त्यांच्या पोटीं । माझ्या रूपीं घातली मिठी । सोडवितां न सुटे गांठी । श्वास पोटीं परतेना ॥ १३० ॥ लाज विसरल्या सर्वथा । सासुरां पतिपित्या देखतां । माझे चरणीं ठेवूनि माथा । रडती दीर्घता आक्रंदे ॥ ३१ ॥ मजवीण अवघे देखती ओस । माझीच पुनःपुन्हा पाहती वास । थोर घालोनि श्वासोच्छ्वास । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ३२ ॥ आमुचा जिवलग सांगाती । घेऊनि जातो हा दुष्टमूर्ती । अक्रूरा संमुख क्रूर म्हणती । येती काकुळती मजलागीं ॥ ३३ ॥ उभ्या ठाकोनि संमुख । माझें पाहती श्रीमुख । आठवे वियोगाचें दुःख । तेणें अधोमुख विलपती ॥ ३४ ॥ ऐशिया मजलागीं आसक्त । माझ्या ठायीं अनन्यचित्त । विसरल्या देह समस्त । अतिअनुरक्त मजलागीं ॥ ३५ ॥ माझेनि वियोगें तत्त्वतां । त्यासी माझी तीव्र व्यथा । ते

—गोपींच्या भक्तीचाच पुढील चार श्लोकांनीं विस्तार करितात—

श्वाफल्किना रामेण सार्धं मयि मथुरां प्रणीते— (सति)—अक्रूरानें बलरामासह मला मथुरेला नेलें असतां (गोपींनीं), मे अन्यं सुखाय न ददृशुः—मजवाचून सुखाचें दुसरें कोणतेंहि साधन पाहिलें नाहीं. विगाढभावेन मयि अनुरक्तचित्ताः वियोगतीव्राधयः—कारण माझ्या ठिकाणीं असलेल्या अतिदृढ भक्तीनें त्यांचीं चित्तें माझ्या ठिकाणींच आसक्त होतीं. त्यामुळें माझ्या वियोगानें त्यांना दुःसह मानस व्यथा झाली. १०.

अक्रूरानें जेव्हां बाळिभद्रासह मला मथुरेला नेलें त्यावेळीं गोपिकांना जें दुःख झालें तें मला सांगतां येत नाहीं. २५ त्यांची त्या वेळची ती अवस्था सांगूं लागलों, तर अजूनहि माझ्या चित्ताला धीर धरवत नाहीं. देव असें सांगत असतां त्याचा गळा दाटून आला. २६ कारण भक्तांच्या प्रेमाचें वर्णन करीत असतांना पुरुषोत्तमाला असेंच प्रेमाचें भरतें येतें. कारण तो भक्तांची इच्छा पुरविणारा कल्पवृक्ष व भक्तांची निरुपम कृपाच आहे. २७ मी मथुरेला जात आहें, असें पहातांच त्या गोपिकांच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहूं लागला, माझ्यासाठीं त्यांचें हृदय फुटून जाऊं लागलें आणि त्यांनीं प्रेमानें लोळण घेतली, २८ त्यांना दूर सारिलें तरी त्या मनांतील अत्यंत प्रेमामुळें दूर जाईनात. माझे धरिलेले पाय न सोडितां त्या अत्यंत काकुळतीस आल्या. २९ त्यांच्या मनांतील भक्ति मोठी आश्चर्यकारक होती. त्यांनीं माझ्या स्वरूपीं मिठी घातली. ती प्रेमाची गांठ सुटतां सुटेना व त्यांनीं माझ्या स्वरूपांत आपल्या श्वासोच्छ्वासाला जें एकदा स्थिर केलें, तो पुनः परतून बाहेर येईना. ३० त्यांनीं सर्वथा लाज सोडून दिली. पति, पिता, सासरा यांच्या समोर माझ्या चरणावर मस्तक ठेवून त्या मोठ्यानें आक्रोश करून रडूं लागल्या. ३१ माझ्यावांचून त्यांना सर्व शून्य दिसूं लागलें. माझी पुनः पुनः वाट पाहून त्या मोठमोठ्यानें स्फुंदून स्फुंदून रडूं लागल्या. ३२ हा भयंकर दुष्ट मनुष्य आमचा जिवलग सोबती घेऊन जात आहे; असें त्या अक्रूराच्या तोंडावर बोलूं लागल्या व माझी काकळूत करूं लागल्या. ३३ माझ्यासमोर उभ्या राहून व माझ्या मुखकमलाकडे पहातांच वियोगाचें दुःख मनांत येतें, म्हणून खालीं मान घालून शोक करूं लागल्या. ३४ अशा प्रकारें त्या मजवर आसक्त असल्यामुळें अनन्य भक्तीनें त्या स्वतःचें देहभानहि विसरल्या. त्या मजवर इतक्या अनुरक्त होत्या. ३५ माझ्या वियोगानें त्यांच्या मनाला तीव्र व्यथा होऊं लागली. त्या व्यथेचें

व्यथेची अवस्था । बोलीं सांगतां मज नये ॥ ३६ ॥ मजवेगळें जें जें सुख । तें गोपिकांसी केवळ दुःख । कैशी आवडी अलोलिक । मज हृदयीं देख न विसंबती ॥ ३७ ॥ मज गोकुळीं असतां । माझे ठायीं आसक्तचित्ता । ते आसक्ती समूळ कथा । ऐक आतां सांगेन ॥ ३८ ॥

तास्ताः क्षपाः प्रेष्ठतमेन नीता मयैव वृन्दावनगोचरेण ।
क्षणार्धवत्ताः पुनरंग तासां हीना मया कल्पसमा बभूवुः ॥ ११ ॥

नवल गोपिकांचा हरिख । मज वृंदावना जातां देख । माझें पाहोनि श्रीमुख । प्रातःकाळीं सुख भोगिती ॥ ३९ ॥ गायी पाजोनियां पाणी । गोठणीं बैसवीं मध्याह्नीं । तेथें उदकमिषें गौळणी । पहायालागूनी मज येती ॥ १४० ॥ तेथें नाना कौतुकें नाना लीला । नाना परींच्या खेळता खेळां । तो तो देखोनि सोहळा । सुखें वेल्हाळा सुखावती ॥ ४१ ॥ मज सायंकाळीं येतां देखोनी । आरत्या निंबलोण घेउनी । सामोऱ्या येती धांवोनी । लागती चरणीं स्वानंदें ॥ ४२ ॥ ऐशी त्रिकाळ दर्शनें घेतां । धणी न पुरे त्यांचें चित्ता । त्याहीवरी वर्तली कथा । एकांततां अतिगुह्य ॥ ४३ ॥ त्या गुह्याचें निजगुज । उद्धवा मी सांगेन तुज । महासुखाचें सुखभोज । मी अधोक्षज नाचिंनलों ॥ ४४ ॥ तें सुख गोपिका जाणती । कीं माझें मी जाणें श्रीपती । जे रासक्रीडेच्या रातीं । झाली सुखप्राप्ती सकळिकांसी ॥ ४५ ॥ त्या सुखाची सुखगोडी । रमा काय जाणे बापुडी । ब्रह्मादिकें केवळ वेडीं । त्या सुखाची गोडी नेणती ॥ ४६ ॥ पावावया त्या सुखासी । सदाशिव झाला योगाभ्यासी । तरी प्राप्ति नव्हे तयासी । भुलला मोहिनीसी देखतां ॥ ४७ ॥ उमा होऊनि भिल्लटी । तिणें भुलविला धूर्जटी । त्या सुखाची हातवटी । नेणती हटी तापसी ॥ ४८ ॥

वर्णन मला शब्दानें करितां येत नाहीं. ३६ माझ्यावांचून होणारें सर्व सुख गोपिकांना केवळ दुःख वाटूं लागलें. त्यांना माझी कशी अलौकिक आवड होती पहा! त्यांच्या अंतःकरणाला माझा कधीं विसरहि पडला नाहीं. ३७ मी गोकुळांत असतां त्यांचें मन मजवर अत्यंत आसक्त होतें. त्या आसक्तीची सविस्तर कथा सांगतों, ती ऐक. १३८

—आतां त्यांची तीव्र मानसव्यथा व्यक्त करितात—

प्रेष्ठतमेन वृन्दावनगोचरेण मया याः एव ताः ताः क्षपाः क्षणार्धवत् नीताः—अतिशय प्रिय व वृंदावनांत असलेल्या माझ्यासह शब्दांनीं वर्णन न करतां येण्यासारख्या ज्या रात्री अर्ध्या क्षणाप्रमाणें त्या गोपिकांनीं घालविल्या, **तासां ताः पुनः मया हीनाः कल्पसमाः बभूवुः**—त्याच त्यांच्या रात्रीं माझ्या अभावी त्यांना कल्पासारख्या झाल्या. ११.

गोपिकांचा संतोष मोठा विचित्र खरा! मी प्रातःकाळीं वृंदावनाला जात असतां माझें मुखकमल पाहून त्यांना रोज मोठें सुख वाटे. ३९ दुपारीं मी गायींना पाणी पाजून त्यांच्या गोठणीवर बसत असें तेथें या गौळणी मला पहाण्यासाठीं पाण्याच्या निमित्तानें येत. १४० त्यावेळीं आम्हीं अनेक प्रकारच्या लीला कौतुकानें करून नानाप्रकारचे खेळ खेळत असतां तो सर्व सोहळा पाहून, त्यांना अतिशय सुख होत असे ४१ संध्याकाळीं मला परत येतांना पाहून आरति व लिंबलोण घेऊन त्या धांवत सामोऱ्या येत आणि आनंदानें माझ्या पायीं लागत. ४२ याप्रमाणें माझें त्रिकाल दर्शन घेऊनहि त्यांच्या चित्ताची तृप्ति होत नव्हती. याहूनहि एक अतिशय गुप्त गोष्ट एकान्तांत घडली ४३ हे उद्धवा! त्या गुह्यांतील रहस्य मी तुला आतां सांगतों. मी परमात्मा त्या महासुखाच्या अनुभवानें नाचूं लागलों. ४४ रासक्रीडेच्या रात्रीं आम्हां सर्वांना ज्या सुखाची प्राप्ति झाली, तें सुख एक त्या गोपी जाणतात किं एक मी श्रीपति जाणतों. ४५ त्या सुखाचें माधुर्य बिचाऱ्या लक्ष्मीला काय ठाऊक! ब्रह्मदेवादिक तर केवळ वेडेच ते त्या सुखाची गोडी जाणत नाहींत. ४६ ते सुख मिळविण्यासाठीं शंकरानें योगाभ्यास केला, तरी त्याला तें प्राप्त झालें नाहीं. शेवटी तो मोहिनी दृष्टीस पडतांच तिला भाळला ४७ पार्वतीनें भिल्लीणीचा वेष घेऊन शंकराला भुलविलें. त्या सुखाचा अनुभव हठयोगी तापसी जाणत नाहींत. ४८ हे उद्धवा! माझा

जवळी असोनि निश्चितीं । संकर्षण महामूर्ती । त्यासी त्या सुखाची प्राप्ती । नव्हे निश्चितीं उद्धवा ॥ ४९ ॥ रासक्रीडा गोपिकांप्रती । कोणी म्हणेल कामासक्ती । तेथ कामाची कैंची प्राप्ती । ऐक निश्चितीं उद्धवा ॥ १५० ॥ शिवातें जिणोनि फुडा । काम म्हणे मी सबळ गाढा । माझी भेदावया रासक्रीडा । वाऊनि मेंढा चालिला ॥ ५१ ॥ जेथ माझ्या स्वरूपाचें वोडण । तेथ न चले कामाचें कामपण । मोडले मदनाचे बाण । दृढ वोडण स्मरणाचें ॥ ५२ ॥ काम कामिका चपळदृष्टी । निज-क्षोभाची तीक्ष्ण बाणाटी । संधि साधूनि विंधे हटी । ते नव्हेचि पैठी हरिरंगीं ॥ ५३ ॥ जेथ मी क्रीडें आत्मारामू । तेथ केवीं रिघे बापुडा कामू । माझें कामें गोपिका निष्कामू । कामसंभ्रमू त्यां नाहीं ॥ ५४ ॥ जो कोणी स्मरे माझें नामू । तिकडे पाहूं न शके कामू । जेथ मी रमें पुरुषोत्तमू । तेथ कामकर्मू रिघेना ॥ ५५ ॥ कामू म्हणे कटकटा । अभाग्य भाग्यें झालों मोटा । रासक्रीडेचिया शेवटील गोटा । आज मी करंटा न पवेंचि ॥ ५६ ॥ देखोनि रासक्रीडा गोमटी । काम घटघटां लाळ घोटी । लाज सांडूनि जन्मला पोटीं । त्या सुखाचे भेटीलागोनि ॥ ५७ ॥ तो काम म्यां आपुले अंकीं । केला निजभावें निजसुखी । तें माझें निजसुख गोपिकीं । रासमिषें कीं भोगिलें ॥ ५८ ॥ ते रासक्रीडेची राती । म्यां ब्रह्मषण्मास केली होती । गोपिका अर्धक्षण मानिती । वेगीं कां गभस्ती उगवला ॥ ५९ ॥ जेथ माझा क्रीडा सुखकल्लोळ । तेथ कोण स्मरे काळवेळ । गोपिकांचें भाग्य प्रबळ । माझें सुख केवळ पावल्या ॥ १६० ॥ ऐशा माझिया संगतीं । भोगिल्या राती नेणों किती । तरी त्यांसी नव्हे तृप्ती । चढती प्रीती मजलागीं ॥ ६१ ॥ गोपिका करूनि माझी भक्ती । मी प्रसन्न केलों श्रीपती । रास मागीतला एकांतीं । माझी सुखप्राप्ती पावावया ॥ ६२ ॥ त्या जाण वेदगर्भींच्या श्रुती। श्रुतिरूपें नव्हे मत्प्राप्ती । तैं परतल्या म्हणोनि ' नेती

वडील भाऊ बलराम जवळ असूनहि त्या सुखाला खरोखरच प्राप्त झाला नाहीं. हें तूं निश्चयानें जाण. ४९ कोणी म्हणेल कीं, मीं गोपींच्या बरोबर रासक्रीडा कामासक्तीनें केली. तर हे उद्धवा ! तेथें काम संभवतो तरी कसा ! याचा निश्चय ऐक. १५० शंकराला जिंकून ' मी मोठा प्रबल ' असें मानून काम माझ्या रासक्रीडेंत खंड पाडण्यासाठीं आपलें धनुष्य सज्ज करून निघाला. ५१ परंतु माझ्या स्वरूपाच्या ढालीपुढें कामाचा कांहीं पराक्रम चालला नाहीं. मदनाचे सर्व बाण मोडून गेले. अशी माझ्या नामस्मरणाची ढाल मोठी मजबूत आहे. ५२ कामाची चंचल दृष्टि कामुकांना क्षुब्ध करिते व त्याचे तीक्ष्ण बाण संधि साधून त्यांनाच जर्जर करितात. पण हरिरंगा-मध्यें त्यांचा प्रवेश होत नाहीं. ५३ जेथें मी आत्माराम क्रीडा करीत असतों, तेथें बापडा काम कसा शिरणार! माझ्या कामनेनें गोपिका निष्काम झाल्या व त्यांच्यामध्यें कामाचा क्षोभ उरला नाहीं. ५४ जो कोणी माझें नामस्मरण करितो, त्याच्याकडे काम नुस्ता वर मान करून पहातहि नाहीं. जेथें मी पुरुषोत्तम रममाण होतों, तेथें कामाचा प्रवेश होत नाहीं. ५५ तो 'हाय हाय' म्हणतो. मी अभागी भाग्यलेशानें मोठा झालों खरा, पण मज करंट्याला या रासक्रीडेंतील एखादा शेवटचा कणसुद्धां मिळाला नाहीं. ५६ माझी सुंदर रासक्रीडा पाहून काम अतिशय लाळ घोटूं लागला आणि शेवटीं त्यानें त्या सुखाच्या प्राप्तीसाठीं सर्व लाज सोडून माझ्या पोटीं जन्म घेतला. ५७ जें सुख गोपींनीं रासक्रीडेच्या निमित्तानें भोगिलें होतें, त्या माझ्या आत्मसुखाचा अनुभव मीं कामाला आपल्या मांडीवर बसवून दिला. ५८ गोपींनीं तें माझें आत्मसुख रासक्रीडेच्या मिषानें भोगिलें. ती रासक्रीडेची रात्र मीं ब्रह्मदेवाच्या सहा महिन्यांएवढी मोठी केली होती. तरी पण गोपिकांना ती अर्ध्या क्षणाइतकी भासली. त्या म्हणाल्या कीं, सूर्य हा आज इतका लवकर कां उगवला! ५९ अहो ! जेथें माझ्या क्रीडासुखाच्या लहरीवर लहरी येत होत्या तेथें काळाचें भान कोणाला रहाणार ! गोपिकांचें भाग्य फार मोठें म्हणूनच त्या माझ्या आत्मसुखाला प्राप्त झाल्या. १६० याप्रमाणें माझ्या संगतींत त्यांनीं किती रात्री घालविल्या त्यांची गणती नाहीं. तरीहि त्यांची तृप्ति झाली नाहीं. त्यांचें मजवरील प्रेम वाढतच चाललें होतें. ६१ गोपिकांनीं माझी भक्ति करून मज श्रीपतीला प्रसन्न करून घेतलें आणि आत्मसुखाच्या प्राप्तीसाठीं त्यांनीं एकांतांत रास अनुभविण्याची विनंति केली. ६२

नेती ' । माझी सुखसंगती न पवेची ।। ६३ ।। विषयबुद्धि तें मुख्य अज्ञान । तें असतां मी न भेटे जाण । असतां वेदोक्त जाणपण । तेणेंही संपूर्ण न भेटें मी ।। ६४ ।। जाणीवनेणीव गेलिया निःशेष । माझें पाविजे निजात्मसुख । श्रुति जाणोनि हें निष्टंक । गोकुळीं त्या देख सुखार्त आल्या ।। ६५ ।। त्याचि जाण समस्त श्रुति । गोपिकारूपें गोकुळा येती । रासक्रीडामिसें एकांतीं । माझी सुखप्राप्ती पावल्या ।। ६६ ।। हाही असो अभिप्रावो । उद्धवा ज्यासी जैसा भावो । त्यालागीं मी तैसा देवो । यदर्थी संदेहो असेना ।। ६७ ।। उद्धवा मी भक्तांसी देख । कोणे काळीं नव्हें विमुख । जो जैसा भावी भाविक । तैसा मी देख तयासी ।। ६८ ।। मी जनांसी सदा सन्मुख । जनचि मजसी होती विन्मुख । यासी कांहीं न चले देख । दाटूनि दुःख भोगिती ।। ६९ ।। मी सकाम सकामाच्या ठायीं । निष्कामासी निष्काम पाहीं । नास्तिका मी लोकीं तिहीं । असतूचि नाहीं नास्तिक्यें ।। ४७० ।। असो हे किती उपपत्ती । ऐक गोपिकांसी माझी प्रीती । माझे सुखसंगें भोगिल्या राती । त्या मानिती निमेषार्ध ।। ७१ ।। माझ्या वियोगें त्यांसी राती । ज्या आलिया यथास्थिती । त्या गोपिका कल्पप्राय मानिती । संनिध स्वपति असतांही ।। ७२ ।। त्यांच्या दुःखांची अवस्था । बोलें न बोलवे सर्वथा । माझेनि वियोगें मातें स्मरतां । समाधिअवस्था पावल्या ।। ७३ ।।

ता नाविदन्मय्यनुषङ्गबद्धधियः स्वमात्मानमदस्तथेदम् ।
यथा समाधौ मुनयोऽब्धितोये नद्यः प्रविष्टा इव नामरूपे ।। १२ ।।

त्या गोपी म्हणजे वेदांतील श्रुतिच, असें तूं जाण. श्रुतिरूपानें माझी प्राप्ति होत नाहीं, म्हणून त्या 'नेति नेति' बोलून परतल्या. माझी सुखसंगति त्यांना लाधली नाहीं. ६३ विषयबुद्धि हेंच मुख्य अज्ञान आहे. तें अज्ञान असलें म्हणजे मी भेटत नाहीं किंवा वेदाध्ययनाची विद्वत्ता असली तरीहि माझी पूर्ण प्राप्ति होत नाहीं. ६४ ज्ञान व अज्ञान या दोहोंच्या पलीकडे ईश्वराचें शुद्ध स्वरूप आहे. ६५ त्या दोहोंची निवृत्ति मज सच्चिदानंदांत होते, हें निश्चयानें जाणून त्या श्रुति गोकुळांत सुखासाठीं आल्या. त्या सर्व श्रुति गोपिकांच्या रूपांनीं गोकुळांत रासक्रीडेच्या निमित्तानें येऊन एकांतांत माझ्या आत्मसुखाला प्राप्त झाल्या. ६६ उद्धवा ! हाहि आशय राहूं दे. ज्याचा जसा भाव असतो, त्याला मी देव तसाच पावतों, यांत मुळींच संशय नाहीं. ६७ उद्धवा ! मी माझ्या भक्तांपासून केव्हांहि विमुख होत नाहीं. ज्याची जशी श्रद्धा असते तसा त्याला मी पावतों. मी ६८ सर्व लोकांच्या निरंतर संमुखच आहे. पण लोक मला विमुख होऊन स्वतःच जाणुन-बुजून दुःख भोगितात ६९ मी सकामाबरोबर सकाम असतों, आणि निष्कामाशीं निष्काम होतों. मी त्रिभुवनांत असूनहि नास्तिकाला नास्तिकपणामुळें कोठेंच नसतों. १७० असो. ही अशी युक्ति मी तुला किती सांगूं ! गोपिकांना माझी आवड होती. त्यांनीं माझ्या सुखसहवासांत ज्या रात्री घालविल्या, त्या त्यांना अर्धक्षणाहूनहि अल्प भासल्या. ७१ आणि माझ्या वियोगाच्या रात्री त्यांचें पतिजवळ असूनहि त्यांना कल्पासारख्या दीर्घ वाटत होत्या. ७२ माझ्यानें त्यांच्या दुःखाचें वर्णन करवत नाहीं. माझ्या वियोगामुळें माझें चिंतन करीत त्या गोपी समाधि अवस्थेला प्राप्त झाल्या. १७३.

—याप्रमाणें ज्यांची मानसव्यथा अतिशय तीव्र आहे अशा त्या मोहाच्या मिषानें समाधीला प्राप्त झाल्या, असें आतां सांगतात—

मयि अनुषङ्गबद्धधियः ताः स्वं आत्मानं अदः तथा इदं न अविदन्–माझ्या ठिकाणीं आसक्तीनें ज्यांनीं आपल्या बुद्धि दृढ बद्ध केल्या आहेत अशा त्या गोपी आपल्या देहाला, त्यापासून दूर असलेल्या पदार्थाला व त्याच्या अगदीं समीप असलेल्या पदार्थाला जाणत्या झाल्या नाहींत. (किंवा 'स्वं' म्ह० पति-पुत्र इत्यादि ममतेच्या विषयांस व 'आत्मानं' म्ह० अहंकारास्पद देहाला व 'अदः' म्ह० परलोकाला त्यांनीं जाणिलें नाहीं. त्यांना त्यांतील कशाचेंहि भान राहिलें नाहीं, असा याचा भावार्थ.) यथा समाधौ मुनयः नामरूपे न विदुः तथा–ज्याप्रमाणें समाधीमध्यें मुनी नामरूपाला जाणत नाहींत, त्याप्रमाणें गोपींनाहि सर्वांचें अभान झालें. अब्धितोये नद्यः इव मयि प्रविष्टाः–समुद्राच्या जलांत नद्या जशा प्रवेश करितात तशा त्या मजमध्यें प्रविष्ट झाल्या. १२.

मज गोकुळीं असतां । माझे ठायीं आसक्तचित्ता । हे अवघी समूळ कथा । तुज म्यां तत्त्वतां सांगीतली ॥ ७४ ॥ ऐशियांसी म्यां अतिनिचाडतां । कृतघ्नाचे परी सांडूनि जातां । माझ्या वियोगकाळींची व्यथा । पाषाण पाहतां उतटती ॥ ७५ ॥ यापरी मजवेगळ्या असतां । मागें माझी कथा वार्ता । सदा माझें स्मरण करितां । मदाकारता पावल्या ॥ ७६ ॥ करितां दळणकांडण । माझे दीर्घस्वरें गाती गुण । कीं आदरील्या दधिमंथन । माझें चरित्रगायन त्या करिती ॥ ७७ ॥ करितां सडासंमार्जन । गोपिकांसी माझें ध्यान । माझेनि स्मरणें जाण । परिये देणें बालकां ॥ ७८ ॥ गायीचें दोहन करितां । माझे स्मरणीं आसक्तता । एवं सर्व कर्मीं वर्ततां । माझ्या विसराची वार्ता विसरल्या ॥ ७९ ॥ करितां गमनागमन । अखंड माझ्या ठायीं मन । आसन भोजन प्राशन । करितां मद्ध्यान तयांसी ॥ १८० ॥ एवं मज गेलियापाठीं । ऐशी माझी आवडी मोठी । अखंड माझ्या ठायीं दृष्टी । माझ्याचि गोष्टी सर्वदा ॥ ८१ ॥ ऐसी अनन्य ठायींच्या ठायीं । गोपिकांसी माझी प्रीति पाहीं । त्या वर्ततांही देहगेहीं । माझ्या ठायीं विनटल्या ॥ ८२ ॥ यापरी बुद्धि मदाकार । म्हणोनि विसरल्या घरदार । विसरल्या पुत्रभ्रतार । निजव्यापार विसरल्या ॥ ८३ ॥ विसरल्या विषयसुख । विसरल्या द्वंद्वदुःख । विसरल्या तहानभूक माझेनि एक निदिध्यासें ॥ ८४ ॥ जेणें देहें पतिपुत्रांतें । आप्त मानिलें होतें चित्तें । तें चित्त रतलें मातें । त्या देहातें विसरोनि ॥ ८५ ॥ विसरल्या इहलोक परलोक । विसरल्या कार्यकारण निःशेख । विसरल्या नामरूप देख । माझें ध्यानसुख भोगितां ॥ ८६ ॥ निरसोनि तत्त्वांचे विकार । समाधि पावे मुनीश्वर । तो विसरे जेवीं संसार । तेवीं मदाकार गोपिका ॥ ८७ ॥ जेवीं कां नाना सरिता । आलिया सिंधूतें ठाकितां । तेथें पावोनि समरसता । नामरूपता विसरल्या ॥ ८८ ॥ तेवीं गोपिका अनन्यप्रीतीं । माझी

मी गोकुळांत असतांना मजवर त्यांचें मन कसें आसक्त झालें होतें, तो सर्व साद्यंत वृत्तांत मीं तुला तत्त्वतः सांगितला. ७४ अशा भक्तांबरोबरहि मी बेपर्वाईनें वागून मी कृतघ्नाप्रमाणें त्यांना सोडून गेलों असतां माझ्या वियोगानें झालेली त्यांची व्यथा पाहून पाषाणहि द्रवले. ७५ याप्रमाणें त्या गोपिका मजपासून जरी दूर झाल्या तरी माझ्या मागें माझ्याच गोष्टी करीत व निरंतर माझेंच स्मरण करीत त्या मद्रूप झाल्या. ७६ दळण-कांडण करीत असतां त्या मोठ्या सुरांत माझ्या गुणांचीं गाणीं गात असत. दहीं घुसळीत असतां माझ्या चरित्राचें गायन प्रेमानें करीत असत. ७७ सडा-संमार्जनाच्या वेळीं गोपीं माझेंच स्मरण करीत. आणि मुलांना झोंके देत असतांनाहि त्या माझेंच स्मरण करीत असत. ७८ गायींची धार काढीत असतां त्यांचें चित्त माझ्या चिंतनांतच आसक्त होत असे. याप्रमाणें सर्व काम करितेवेळीं त्या माझ्या विस्मरणाची गोष्टच विसरल्या. ७९ जातां-येतां त्यांचें मन सतत माझ्यामध्यें असे. बसणें, खाणें, पिणें या सर्व प्रसंगीं त्या माझेंच ध्यान करीत. १८० मी गोकुळांतून गेल्यानंतरहि त्यांना अशी माझी मोठी आवड होती. त्यांचें सर्व लक्ष मजकडेच असे आणि त्या सर्वकाळ माझ्याच गोष्टी बोलत. ८१ याप्रमाणें गोपींची मजवर अनन्य प्रीति असल्यामुळें त्या संसारांत असूनहि माझ्यामध्यें तल्लीन झाल्या. ८२ त्यांचें मन अशारीतीनें मद्रूप झाल्यामुळें त्या घर-दार, पति-पुत्र व आपला स्वतःचा व्यवसायहि विसरल्या. ८३ विषय-सुख विसरल्या. त्यांना माझ्या निदिध्यासामुळें शीतउष्णादि दुःख, तहान-भूक या सर्वांचा विसर पडला. ८४ ज्या मनानें देहसंबंधीं पति-पुत्रांस आप्त मानिलें होतें, तेंच मन आपल्या देहाला विसरून माझ्यामध्यें रमलें. ८५ त्या गोपिका माझ्या ध्यानाचें सुख भोगीत असतां इहलोक, परलोक, कार्य-कारण, नाम-रूप हें सर्व निःशेष विसरल्या. ८६ चोवीस तत्त्वांच्या सर्व विकारांचें निरसन करून मुनीश्वर समाधीला जसा प्राप्त होतो व संसाराला विसरतो, तशा गोपिका मदाकार झाल्या. ८७ ज्याप्रमाणें अनेक नद्या समुद्राला मिळाल्या असतां त्यांच्याशीं एकरूप होऊन नामरूपाला विसरतात, ८८ त्याप्रमाणें गोपिकांनीं अनन्य प्रेमामुळें माझी प्राप्ति

लाहोनियां प्राप्ती । नामरूपाची व्युत्पत्ती । विसरल्या स्फूर्ति स्फुरेना ॥ ८९ ॥ सच्चिदानंदस्वरूपप्रभावो । नेणतां माझा निजस्वभावो । गोपिकांचा अनन्यभावो । परब्रह्म पहा वो पावल्या ॥ १९० ॥

मत्कामा रमणं जारमस्वरूपविदोऽबलाः । ब्रह्म मां परमं प्रापुः सङ्गाच्छतसहस्रशः ॥ १३ ॥

त्या केवळ अबला निश्चितीं । मत्संगाची अतिप्रीती । तेही संगती कामासक्ती । शास्त्रप्रवृत्तीविरुद्ध ॥ ९१ ॥ मी भ्रतारू नव्हें शास्त्रविधी । रूपें मदनमोहन त्रिशुद्धी । मज रतल्या ज्या अविधी । जारबुद्धीं व्यभिचारें ॥ ९२ ॥ चौं प्रकारींच्या कामिनी । हस्तिनी इत्यादि पद्मिनी । चौघींसी चौं मुक्तिस्थानीं । काममोहिनी मी रमवीं ॥ ९३ ॥ इतर पुरुषांचे संगतीं । क्षणभंगुर सुख भोगिती । अविनाश निजसुखप्राप्ती । कामासक्ति माझेनी ॥ ९४ ॥ स्वपतिसंगें क्षणिक आनंद । माझ्या सुखाचा निजबोधू । नित्य भोगिती परमानंदू । स्वानंदकंदू सर्वदा ॥ ९५ ॥ यालागीं गा अबळा चपळा । सांडूनि स्वपतीचा सोहळा । मजचि रतल्या सकळा । माझी कामकळा अभिनव ॥ ९६ ॥ नव रसांचा रसिक । नवरंगडा मीच एक । यालागीं माझ्या कामीं कामुक । भावो निर्टंक गोपिकांचा ॥ ९७ ॥ जीवाआंतुलिये खुणे । मीचि एक निववूं जाणें । ऐसें जाणोनि मजकारणें । जीवेंप्राणें विनटल्या ॥ ९८ ॥ अंगीं प्रत्यंगीं मीचि भोक्ता । सबाह्य सर्वांगें मीचि निवविता । ऐसें जाणोनि तत्त्वतां । कामासक्तता मजलागीं ॥ ९९ ॥ हावभावकटाक्षगुण । मीचि जाणें उणखूण । कोण वेळ कोण लक्षण । कोण स्थान

करून घेतली. त्या नाम-रूपाचें भान विसरल्या व त्यांची अहंस्फूर्ति नाहींशी झाली. ८९ सच्चिदानंदस्वरूप-प्रभाव हें माझें आत्मस्वरूप न जाणतांहि गोपिका अनन्यभावानें परब्रह्माला प्राप्त झाल्या. १९०.

—याप्रमाणें—

अबलाः मत्कामाः अस्वरूपविदः—त्या अबला केवल माझी कामना करणाऱ्या माझ्या स्वरूपाला जाणत नव्हत्या. (तथापि) संगात् जारं ब्रह्म मां परमं शतसहस्रशः प्रापुः—त्या संतसंगामुळें जारबुद्धीनें जाणलेल्याहि मज ब्रह्मस्वरूप परमात्म्यालाच शतशः व सहस्रशः प्राप्त झाल्या. १३.

गोपी केवळ स्त्रिया होत्या, त्यांना माझ्या सहवासाची अति आवड आणि तीहि शास्त्रप्रवृत्तीच्या विरुद्ध अशी त्यांची माझ्या ठिकाणीं आसक्ति होती. ९१ मी शास्त्रविधीनें त्यांचा भ्रतार नव्हतों, पण मदनालाहि मोह पाडणाऱ्या माझ्या रूपानें मोहित होऊन त्या जारबुद्धीनें अविधीनें व्यभिचार करून माझ्याशीं रत झाल्या. ९२ हस्तिनी, पद्मिनी, इत्यादि चार प्रकारच्या स्त्रिया असतात. त्या चारी प्रकारच्या स्त्रियांना चार मुक्तिस्थानांमध्यें कामालाहि मोह पाडणाऱ्या मीं रमविलें. ९३ इतर पुरुषांच्या संगतींत स्त्रिया क्षणभंगुर सुख भोगितात. पण माझ्या कामासक्तीनें त्यांना नित्य आत्मसुखाची प्राप्ति झाली. ९४ पतीबरोबर होणारें सुख क्षणिक असतें. परंतु माझ्या आत्मसुखाचा आनंद नित्य परमानंद देणारा व सर्वदा स्वानंदकंद आहे. ९५ यास्तव त्या सर्व चंचल अबला आपल्या पतीपासून मिळणारें सुख टाकून माझ्या ठिकाणीं रत झाल्या. कारण माझी कामकला अपूर्व होती. ९६ नऊहि रसांचा रसिक व नवीन नवीन प्रकारांनीं रंजन करणारा मीच एक आहें. म्हणून माझ्याविषयीं गोपिकांचा अढळ कामुकभाव होता. ९७ जीवाच्या आंतील खूण मीच काय तो एक शांत करूं जाणें हें जाणून त्या सर्वजणी माझ्यासाठीं जीव-भावानें आतुर झाल्या. ९८ सर्व अंगें व प्रत्यंगें म्ह० हात, पाय, बोटें वगैरे यांचा भोक्ता व सर्वांगानें सबाह्य शांत करणारा मीच आहें, असें तत्त्वतः जाणून त्या माझ्यासाठीं कामासक्त झाल्या. ९९ हावभाव, नेत्रकटाक्ष यांचे गुण व इतर खुणा, कोणती वेळ, कोणतें लक्षण, भेटण्याचें कोणतें स्थान हें मीच जाणतों. २०० आपल्या शय्यागृहांत शयन करून जी गोपी ज्यावेळीं माझी इच्छा

मिळणीचें ॥ २०० ॥ जे निजोनियां निजशेजारीं । जे काळीं माझी इच्छा करी । तेचि काळीं तेचि अवसरीं । सुखशेजारीं मी निववीं ॥ १ ॥ मज कुडकुडें नाहीं येणें । नाहीं कवाड टणत्कारणें । नित्य निजशेजें निववणें । जे जीवेंप्राणें अनुसरली ॥ २ ॥ ऐसा सर्वकामदायक । पुरुषांमाजीं मीचि एक । हा गोपिकीं जाणोनि विवेक । भाव निष्टंक धरियेला ॥ ३ ॥ ज्यासी भाळले निष्काम तापसी । ज्यासी भाळले योगी संन्यासी । गोपी भाळल्या त्यासी । देहगेहांसी विसरोनी ॥ ४ ॥ अंधारीं गूळ खातां । कडू न लगे तो सर्वथा । तेवीं नेणोनि माझी सच्चिदानंदता । मातें सेवितां मी जाहल्या ॥ ५ ॥ परीस मानोनि पाषण । फोडूं जातां लोहाचा घण । लागतांचि होय सुवर्ण । तैशा जाण गोपिका ॥ ६ ॥ विष म्हणोनि अमृत घेतां । मरण जाऊनि ये अमरता । तेवीं जारबुद्धीं मातें भजतां । माझी सायुज्यता पावल्या ॥ ७ ॥ म्यां गोपिकांसी कामू केला । कीं त्यांचा सर्व कामू हरिला । विचारितां अर्थ एथिला । मोक्ष फावला मत्कामें ॥ ८ ॥ ज्यांसी झाली माझी संगती । त्या एक दोन सांगों किती । शत सहस्र अमिती । निजपदाप्रति पावल्या ॥ ९ ॥ वैरागराच्या मणीप्रती । खडे लागले हिरे होती । तैशा गोपिका माझ्या संगतीं । नेणों किती उद्धरल्या ॥ २१० ॥ मी परब्रह्ममूर्ति चोखडी । माझिया व्यभिचारपरवडी । धुतल्या अविद्यापापकोडी । मुक्ति रोकडी पावल्या ॥ ११ ॥ मी अथवा माझे संत । संगती होईल ज्यांसी प्राप्त । ते मज पावले निश्चित । संदेह येथ न धरावा ॥ १२ ॥ माझे स्वरूपावरी लोक । विकल्पें ठेविती नाना दोख । संत माझे निर्दोख । तत्संगें सुख निर्दुष्ट ॥ १३ ॥ उद्धवा त्वांहीं येचि अर्थीं । बहुत न धरावी व्युत्पत्ती । धरोनियां सत्संगती । संसारगुंती उगवावी ॥ १४ ॥

करीत असे, त्याचवेळीं व त्याच घटकेस मी तिच्याशेजारीं जाऊन तिला शांत करीत असें. १ मला लपत, छपत जावें लागत नसे. मला दार ठोठावें लागत नसे. तर जी जीव-भावानें मला अनुसरली, तिच्या निजशय्येवर मी तिला नित्य शांत करीत असें. २ याप्रमाणें सर्वकामना पूर्ण करणारा पुरुषांतील पुरुषोत्तम मीच एक आहें हा विवेक गोपींनीं माझ्या ठिकाणीं निष्काम भाव धरिला. ३ ज्याला निष्काम तापसी, योगी, संन्यासी भाळले, त्यालाच गोपी आपल्या घरदाराला विसरून भाळल्या. ४ गूळ अंधारांत बसून जरी खाल्ला तरी तो कांहीं कडु लागत नाहीं त्याप्रमाणेंच माझें सच्चिदानंद स्वरूप न जाणतांहि त्यांनीं मजवर अनन्यभाव ठेवितांच त्या मद्रूप झाल्या. ५ परिसाला दगड समजून त्यावर लोखंडाच्या घणाचा घाव मारितांच त्या घणाचेंच जसें सोनें बनतें, त्याचप्रमाणें गोपिका माझें खरें स्वरूप न ओळखितां जरी मजवर आसक्त झाल्या तरी त्या माझ्या पदाला प्राप्त झाल्या. ६ विष समजून जरी अमृताचें सेवन केलें तरी मरण जाऊन अमरत्व येतें. त्याचप्रमाणें त्यांनीं जरी कामबुद्धीनें माझी सेवा केली तरी त्या सायुज्य मुक्तीला पावल्या. ७ मी गोपिकांबरोबर विलास केला कीं, त्यांचा सर्व काम हरण केला, यांतील गूढ अर्थाचा विचार केला असतां त्यांना माझ्या कामनेनें मोक्षच मिळाला. ८ ज्यांना सहवास घडला त्या एक, दोन, कीं किती म्हणून सांगूं! शत, सहस्र, असंख्य गोपी आत्मपदाला प्राप्त झाल्या. ९ वैरागराच्या रत्नाला खडे लागले कीं, ते रत्नच होतात. त्याप्रमाणें माझ्या संगतीनें किती गोपिका उद्धरून गेल्या यांची गणती नाहीं. २१० मी सुंदर परब्रह्ममूर्ति आहें. त्यामुळें माझ्या विषयाभिलाषानें अविद्यापापाच्या कोटि धुतल्या गेल्या व त्यांना साक्षात् मुक्ति लाधली. ११ मी किंवा माझे संत यांची संगति ज्यांना प्राप्त होते ते निश्चयानें मला येऊन पोंचतात, त्यांत मुळींच संशय नाहीं. १२ लोक विकल्प करून माझ्या स्वरूपामध्यें अनेक दोष पाहतात. पण माझे संत निर्दोष आहेत; त्यांच्या संगतीनें निर्दोष सुख प्राप्त होतें. १३ हे उद्धवा! यास्तव तूंहि आतां याविषयीं जास्त चर्चा न करितां सत्संगति धरून संसाराची गुंतागुंत सोडीव. २१४.

तस्मात्त्वमुद्धवोत्सृज्य चोदनां प्रतिचोदनाम् । प्रवृत्तं च निवृत्तंच श्रोतव्यं श्रुतमेव च ॥ १४ ॥
मामेकमेव शरणमात्मानं सर्वदेहिनाम् । याहि सर्वात्मभावेन मया स्या ह्यकुतोभयः ॥ १५ ॥

माझें स्वरूप शुद्ध निर्गुण । वेद तितुका गा त्रिगुण । त्या वेदाचें जें प्रेरण । तें गौण जाण मत्प्राप्तीं ॥ १५ ॥ त्या वेदार्थें श्रुतिस्मृती । नाना कर्में करविती । त्या कर्मांची कर्मगती । न कळे निश्चितीं कोणासी ॥ १६ ॥ कर्म स्वरूपें परम गूढ । विधिनिषेधें अतिअवघड । सज्ञानासी नव्हे निवाड । शास्त्रें दृढ विचारितां ॥ १७ ॥ केवळ कर्मचि कर्मा आंत । एक प्रवृत्त एक निवृत्त । सकाम निष्काम अद्भुत । अंगीं आदळत साधकां ॥ १८ ॥ कर्म तितुकें आविद्यक । वेद तों त्रिगुणात्मक । तत्संबंधीं श्रवण देख । साधनरूप वेदांत ॥ १९ ॥ तमोगुणें कर्मकांड । रजोगुणें उपासनाकांड । सत्वगुणें ज्ञानकांड । वेद त्रिकांड त्रिगुणात्मक ॥ २२० ॥ वेदशास्त्र विधानविधी । यांचें मूळ अविद्या आधीं । जे अविद्येस्तव देहबुद्धी । विधिनिषेधीं गोंवित ॥ २१ ॥ यालागीं उद्धवा तूं आधीं । सांडीं अविद्या पां त्रिशुद्धी । अविद्या सांडिल्या संबंधीं । सहजें वेदविधी सांडिला ॥ २२ ॥ आधीं अविद्या ते कोण । हेंच आम्हां न कळे जाण । मग तिचें निराकरण । केवीं आपण करावें ॥ २३ ॥ निजकल्पनेचा जो बोध । तेचि अविद्या स्वतःसिद्ध । तेणेंचि बाधे विधिनिषेध । ते त्यागिल्या शुद्ध ब्रह्मचि तो ॥ २४ ॥ धूर पडलिया रणीं । सहज कटक जाय पळोनी । तेवीं अविद्या सांडितां सांडणीं । विधिविधान दोनी सहजेंचि

उद्धव तस्मात्—हे उद्धवा ! ज्याअर्थीं माझ्या भजनाचा प्रभाव असा आहे त्याअर्थीं, त्वं चोदनां प्रतिचोदनां प्रवृत्तं च निवृत्तं च श्रोतव्यं श्रुतं एव च उत्सृज्य—तूं श्रुति व स्मृति किंवा विधि व निषेध सकाम प्रवृत्तकर्म व निष्काम निवृत्तकर्म श्रवणीय व श्रुत या सर्वांचा त्याग करून, सर्वदेहिनां आत्मानं मां एकं एव सर्वात्मभावेन शरणं याहि—सर्व देहवानांचा आत्मा असा जो मी एक त्या मलाच सर्वात्मभावानें शरण जा. मयाः हि अकुतोभय स्याः— आणि माझ्या योगानेंच निर्भय हो. १४-१५.

माझें स्वरूप शुद्ध, तीनहि गुणांच्या पलीकडे आहे. परंतु वेद सत्त्व, रज व तम या तीन गुणांनीं युक्त आहे. त्या वेदाचें विधान हें माझ्या प्राप्तीचें गौण साधन आहे, असें तूं जाण. १५ त्या वेदाला अनुसरून श्रुति व स्मृति नाना कर्में करवितात. त्या कर्मांची कर्मगति कोणालाच कळत नाहीं. १६ कर्माचें स्वरूप अतिशय गहन आहे. तें विधि-निषेधामुळेंच अवघड झालें आहे. विद्वानांनीं शास्त्रानुरूप पुष्कळ विचार केला तरी त्यांचा निर्णय झाला नाहीं. १७ कर्मामध्येंच एक प्रवृत्तिपर व दुसरें निवृत्तिपर कर्म असतें. एक सकाम व दुसरें निष्काम असतें. अशी कर्माची मोठी अद्भुत रचना साधकाच्या अंगावर आदळते. १८ जेवढें कर्म तेवढें सगळें अविद्येपासून झालेलें आहे व वेद त्रिगुणात्मक आहे. त्यांतील साधनरूप वेदान्तच श्रवणीय आहे. १९ तमोगुणापासून कर्मकांड, रजोगुणापासून उपासनाकांड व सत्त्वगुणापासून ज्ञानकांड निर्माण झालें आहे, असा हा वेद त्रिगुणात्मक तीन कांडांनीं युक्त आहे. २२० वेद, शास्त्र, विधान व विधि यांचें मूळ अविद्या आहे. त्या अविद्येमुळें देहबुद्धि उत्पन्न होते आणि ती विधि-निषेधांत गुंतविते, २१ यास्तव हे उद्धवा ! तूं अगोदर ही अविद्या टाकून दे. अविद्येचा संबंध सोडला कीं, सहजच वेदविधि सुटतात. २२ पण आम्हांला अविद्या म्हणजे काय हेंच आधीं कळत नाहीं. मग आम्हीं तिचें निवारण तरी कसें करावें ! (असें जर म्हणशील तर ऐक.) २३ आपल्या कल्पनेनेंच होणारा जो बोध तीच स्वाभाविक अविद्या आहे. तिच्यामुळेंच विधि-निषेध बाधतात. तिचा एकदां त्याग केला कीं, मग तूं शुद्ध ब्रह्मच होशील. २५ रणांगणांत सेनापति पडला कीं, त्याचें सर्व सैन्य जसें स्वभावतःच पळूं लागतें त्याप्रमाणें मुख्य अविद्या लोपली कीं, विधि-विधान सहजच नाहींसें होतें. २५ रथाचा

॥ २५ ॥ आंखु छेदिलिया पडिपाडें । रथ न चाले असतांही घोडे । तेवीं अविद्या छेदिलिया निवाडें । विधिनिषेध पुढें न चलती ॥ २६ ॥ मूळ छेदिलिया एके घायीं । शाखा पल्लव छेदिले पाहीं । तेवीं अविद्या छेदिलिया लवलाहीं । विधिनिषेध राहे सहजचि ॥ २७ ॥ एकें वेदींचा तात्पर्यार्थ । मुख्य भजावा मी भगवंत । तोचि शास्त्रीं विशदार्थ । करी वेदांतश्रवणार्थ ॥ २८ ॥ श्रवण केलियाचें फळ जाण । करावें अविद्यानिरसन । अविद्या निरसिलिया श्रवण । पुढारें जाण लागेना ॥ २९ ॥ जेवीं ठाकिलिया स्वस्थान । पुढारें न लगे गमनागमन । तेवीं झालिया अविद्यानिरसन । श्रवण मनन लागेना ॥ २३० ॥ म्हणसी अविद्या केवीं सांडे । हेंचि अवघड थोर मांडे । हें अवघें उगवे सांकडें । तें मी तुज पुढें सांगेन ॥ ३१ ॥ वेदशास्त्रकर्मविधान । हें अविद्यायुक्त साधन । ते अविद्या जावया जाण । मजलागीं शरण रिघावें ॥ ३२ ॥

सांडूनि स्त्रीपुत्रविषयध्यान । सांडूनि योग योग्यता शहाणपण । सांडूनि कर्मठता कर्माभिमान । मजलागीं शरण रिघावें ॥ ३३ ॥ सांडूनियां वेदाध्ययन । सांडूनियां शास्त्रश्रवण । सांडूनि प्रवृत्ति निवृत्ति जाण । मजलागीं शरण रिघावें ॥ ३४ ॥ सांडूनि धनमान चेष्टा । सांडूनि सज्ञान प्रतिष्ठा । सांडूनियां नाना निष्ठा । शरण वरिष्ठा मज यावें ॥ ३५ ॥ सांडूनियां वैदिक लौकिक । सांडूनि आगम तांत्रिक । मज शरण रिघालिया देख । माझें निजसुख पावसी ॥ ३६ ॥ सांडूनि कुळाचें उंचपण । सांडूनि जातीचा अभिमान । सांडूनि आश्रमाचें श्रेष्ठपण । मजलागीं शरण रिघावें ॥ ३७ ॥ सांडूनियां ज्ञान ध्यान । सांडूनियां विधिविधान । सांडूनियां देहाभिमान । मजलागीं शरण रिघावें ॥ ३८ ॥ माझें नांव

आंस मोडून टाकिला कीं, घोडे असूनहि रथ जसा चालू शकत नाहीं, त्याचप्रमाणें माझ्या स्वरूपाचा निर्णय करून अविद्येचा नाश केला कीं, विधि-निषेध पुढें पाऊलहि टाकीत नाहींत. २६ वृक्षाचें मूळच एका घावानें तोडून टाकिलें कीं मग त्याच्या डहाळ्या, पानें निराळीं तोडावीं लागत नाहींत. त्याप्रमाणें अविद्येचाच उच्छेद केला असतां विधि-निषेध तत्काल सहजच तुटतात. २७ आतां वेदाचें रहस्य ऐक. मुख्यतः मज भगवानालाच भजावें हाच शास्त्रांतील स्पष्टार्थ आहे. वेदान्ताचें श्रवण करावें. २८ अविद्या नाहींशी करणें हेंच त्या श्रवणाचें फल आहे. आणि एकदां अविद्येचें निरसन झालें कीं, मग पुनः शास्त्रश्रवणाची गरज नाहीं. २९ ज्याप्रमाणें आपण एकदां आपल्या स्वस्थानीं जाऊन पोंचलों कीं, मग पुनः जा, ये करावें लागत नाहीं, त्याप्रमाणें एकदां अविद्येचें निरसन केल्यावर मग श्रवण व मनन यांची आवश्यकता उरत नाहीं. २३० आतां तूं कदाचित् असें म्हणशील कीं, अविद्येचें निरसन कसें होईल ! तिला दूर करणें फार कठिण आहे. तर तुझें हें सर्व संकट कसें जाईल, तेंहि मी तुला सांगतों. ३१ वेदशास्त्राचें कर्मविधान हें अविद्यायुक्त साधन आहे. ती अविद्या घालविण्यासाठीं मला शरण यावें. २३२.

स्त्री-पुत्रादि सर्व विषयांचा ध्यास सोडून योग, योग्यता, शहाणपण, कर्मठपणा व कर्माभिमान टाकून मला शरण यावें. ३३ वेदाध्ययन, शास्त्र-श्रवण, प्रवृत्ति, निवृत्ति हें सर्व सोडून मला शरण यावें. ३४ धन-मान यांच्या चेष्टा सोडून, विद्वत्ता व प्रतिष्ठा दूर सारून, अनेक प्रकारच्या निष्ठा बाजूला ठेवून मज सर्वश्रेष्ठ परमेश्वराला शरण यावें. ३५ वैदिक, लौकिक, तांत्रिक कर्म, पुराणोक्त व पंचरात्रागमांत सांगितलेले मंत्र, तंत्र इत्यादि सर्व टाकून मला शरण आल्यास तूं आत्मसुखाला प्राप्त होशील. ३६ आपल्या कुळाचा मोठेपणा टाकून, जातीचा अभिमान सोडून, चार आश्रमांपैकीं स्वतःच्या आश्रमाचें श्रेष्ठपण विसरून मला शरण यावें. ३७ ज्ञान-ध्यान, विधि-विधान व देहाभिमान टाकून मला शरण यावें. ३८ माझें नांवच ' अंतर्यामी ' आहे. हृदयांतील जाणणारा मुख्य मीच आहे. शब्दांनीं

अंतर्यामी । हृदयींचें जाणता मुख्यत्वें मी । तो मी चाळवेना शब्दधर्मीं । श्रद्धा परब्रह्मीं निर्ममत्वें ॥ ३९ ॥ सर्व त्यागाचें त्यागितेपण । उद्धवा तुज मी सांगेन खूण । सर्व सांडावा अभिमान । हें मुख्य लक्षण त्यागाचें ॥ २४० ॥ सर्वही सांडोनि अभिमान । मज रिघालिया शरण । तुज कैंचें जन्ममरण । माझें प्रतापें जाण तरशील ॥ ४१ ॥ शरण रिघावयासाठीं । काय रिघावें गिरिकपाटीं । किंवा सेवावी दरकुटी । अथवा दिक्पटीं भंवावें ॥ ४२ ॥ तुज वस्तीसी नाहीं गांवो । नित्य नेमस्त कोण ठावो । शरण रिघावया कोठें धांवों । ऐसा भावो कल्पिसी ॥ ४३ ॥ म्हणसी शरण रिघावें कवणे ठायीं । तरी मी असें तुझ्या हृदयीं । त्या हृदयस्थासी लवलाहीं । शरण पाहीं रिघावें ॥ ४४ ॥ सर्वभावें सर्वस्वेंसी । मज हृदयस्था शरण येसी । तैं माझी सर्वगतता पावसी । सर्वभूतनिवासी हृदयस्थू ॥ ४५ ॥ तिळभरी राखोनि अभिमान । जरी मज रिघशी शरण । तरी माझी प्राप्ती नव्हे जाण । अभिमान विघ्न प्राप्तीसी ॥ ४६ ॥ श्वानें स्पर्शिलें पक्वान्न । तें जेवीं नातळती ब्राह्मण । तेवीं जीवीं असतां अभिमान । साधकासी मी जाण नातळें ॥ ४७ ॥ रजस्वलेची ऐकोनि वाणी । दूर पळिजे पुरश्चरणीं । तेवीं अहंकाराच्या साधनीं । थिता जवळुनी मी जायें ॥ ४८ ॥ रजकविटाळाचें जीवन । जेवीं नातळती सज्जन । तेवीं हृदयीं असतां अभिमान । उद्धवा मी जाण न भेटें ॥ ४९ ॥ डोळां हरळ न विरे । घायीं कोत न जिरे । टांकी मुक्ताफळां न शिरे । खिरीमाजीं न सरे सरांटा जेवीं ॥ २५० ॥ तेवीं मजमाजीं अभिमान । उद्धवा न रिघे गा जाण । हे त्यागतात्पर्याची खूण । तुज म्यां संपूर्ण सांगीतली ॥ ५१ ॥ पत्नी विचरतां परपुरुषीं । देखोनि निजपती त्यागी तिसी । तेवीं अभिमानरत भक्तांसी । मी हृषीकेशी नातळे ॥ ५२ ॥ यालागीं सांडूनि अभिमान । मज हृदयस्था रिघालिया शरण । तुज मी उद्धरीन जाण । देवकीची आण

मी माझ्या स्वरूपापासून च्युत होत नाहीं. निर्ममत्वानेंच परब्रह्मावरील श्रद्धा दृढ होते. ३९ हे उद्धवा ! आतां सर्व त्यागाचें लक्षण मी तुला सांगतों. सर्व अभिमान टाकणें हेंच त्यागाचें मुख्य लक्षण आहे. २४० सर्व अभिमान सोडून मला शरण आल्यास मग तुला जन्म-मरण कोठचें ! तूं माझ्या प्रभावानें सहज तरशील. ४१ 'तुला शरण येण्यासाठीं पर्वताच्या गुहेंत जाऊन बसावें किंवा दरींत कुटी बांधून रहावें किंवा दशदिशांत भटकत फिरावें. ४२ तुझ्या रहाण्याची निश्चित जागा नाहीं, ठराविक गांव नाहीं, तेव्हां शरण जाण्यास कोठें धांवावें !' अशी जर तूं मनांत कल्पना आणशील, (तर ऐक.) ४३ मी तुझ्या हृदयांतच आहें. त्या हृदयस्थालाच शरण जावें. ४४ सर्वस्वी सर्वभावानें जर तूं मला शरण येशील तर सर्व भूतांच्या हृदयांत वास करणाऱ्या मज हृदयस्थाच्या सर्वव्यापकतेस तूं प्राप्त होशील. (सु. गी. १८—६१. पृ. ३४३) ४५ परंतु तूं मनांत तिळमात्र जरी अभिमान ठेवून मला शरण आलास तरी माझी प्राप्ति होणार नाहीं. कारण माझ्या प्राप्तीला अभिमान हें फार मोठें विघ्न आहे. ४६ कुत्रें शिवलेल्या अन्नाला ब्राह्मण जसे कधींहि स्पर्श करीत नाहींत, त्याप्रमाणें मनांत अभिमान असलेल्या साधकाच्या हातीं मी केव्हांहि सांपडत नाहीं. ४७ रजस्वला स्त्रीचा शब्द कानीं पडतांच पुरश्चरण करणारा जसा दूर पळतो, तसा अभिमानयुक्त साधकाच्या जवळ असलेलाहि मी दूर जातों. ४८ हे उद्धवा ! परिटानें विटाळ-लेल्या पाण्याला सज्जन जसे स्पर्श करीत नाहींत, तसा हृदयांत अहंकार ठेवणाराला मी भेटत नाहीं. ४९ डोळ्यांत गेलेला खडा जसा विरत नाहीं, जखमेंत रुतलेलें शस्त्र जसें त्यांत जिरत नाहीं, मोत्यामध्यें टाकी जशी शिरत नाहीं, किंवा खिरींत सराटा जसा शिजत नाहीं, २५० त्याप्रमाणें हे उद्धवा ! अहंकार मजमध्यें प्रवेश करूं शकत नाहीं. हें त्यागाच्या तात्पर्याचें लक्षण मीं तुला सांगितलें. ५१ परपुरुषाबरोबर पत्नीला हिंडतांना पाहतांच तिचा पति जसा तिचा त्याग करितो, त्याप्रमाणें मी परमात्मा अहंकारयुक्त भक्तास दूर सारितों. ५२ यास्तव अभिमान टाकून मज हृदयस्थाला शरण आल्यास हे उद्धवा ! देवकीची शपथ वाहून सांगतों कीं, मी तुला

उद्धवा ॥ ५३ ॥ म्हणसी तुज दोघी माता । कोणतीची आण मानूं आतां । मज तुझीची आण तत्त्वतां । तुज निर्भयता माझेनी ॥ ५४ ॥ तूं बोलीं नातुडसी कांहीं । तुज सर्वथा क्रिया नाहीं । तुझी आणभाक मानावी कायी । ऐसें जरी कांहीं कल्पिसी ॥ ५५ ॥ पातेजूनि तुझिया बोलासी । थितें सांडावें स्वधर्मासी । लटकें जाहलिया आणेसी । कोणें समर्थासी भांडावें ॥ ५६ ॥ उद्धवा ऐसें न म्हण । म्यां जे वाहिली तुझी आण । तें परमात्म्यावरी प्रमाण । सत्य जाण सर्वथा ॥ ५७ ॥ उद्धवा तूं आत्मा परिपूर्ण । मज तुज नाहीं मीतूंपण । त्या तुझी म्यां वाहिली आण । परम प्रमाण परमात्मा ॥ ५८ ॥ असतां प्रत्यक्ष प्रमाण । कां लागे भाक आण । सर्वभावें मज आलिया शरण । आतांचि जाण तरशील ॥ ५९ ॥ मज शरण रिघाल्या वाडेंकोडें । कळिकाळ तुझिया पायां पडे । कायसें भवभय बापुडें । कोण तुजकडे पाहेल ॥ २६० ॥ शरण रिघतांचि तत्काळ । तूं लाहासी माझें बळ । तेव्हां भवभय पळे सकळ । तुज कळिकाळ कांपती ॥ ६१ ॥ तृणीं पेटलिया अग्निस्फुलिंग । तो जाळी नाना वनांचे दांग । तैसें शरण आलिया अव्यंग । संसारदांग तूं जाळिसी ॥ ६२ ॥ शरण यावें हृदयस्थासी । तो हृदयस्थ न कळे आम्हांसी । उद्धवा तूं ऐसें म्हणसी । तरी ऐक त्या स्वरूपासी सांगेन ॥ ६३ ॥ सांडूनि रूपनामअभिमान । स्फुरे जें कां उद्धवपण । तें मज हृदयस्थाचें रूप जाण । त्यासी तुवां शरण रिघावें ॥ ६४ ॥ नामरूपगुणवार्ता । हे माया जाण तत्त्वतां । तें सांडूनि जे स्फुरे सत्ता । तें मज हृदयस्थाचें रूप ॥ ६५ ॥ ऐसेनि हृदयस्थ जोडल्या पहा वो । तेव्हां सर्वभूतीं पाहतां देवो । तेथ वेगळा उरावया उद्धवो । रिता ठावो न दिसेचि ॥ ६६ ॥ तेव्हां सर्व भूतीं मी एकू । निश्चयें जाण निष्टंकू । देखतांही अनेक लोकू । त्यांसी मी एकू एकला ॥ ६७ ॥ ऐसा तूं मिळोनि हृदयस्थासी । मी होऊनि

खात्रीनें उद्धरीन. ५३ कदाचित् तूं म्हणशील कीं, तुला दोन माता आहेत. तेव्हां कोणाची शपथ खरी मानावी, तर तुझीच शपथ वाहून सांगतों कीं, मीं तुला निर्भय करीन. ५४ 'पण तूं कांहीं शब्दांत सांपडणारा नाहींस, तुला क्रिया मुळींच नाहीं, तेव्हां तुझ्या आणा-शपथा मीं खऱ्या कशा मानाव्या !' असा जर कांहीं विकल्प तुझ्या मनांत येईल तर, ५५ किंवा 'तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवून, असलेल्या स्वधर्माला सोडावें आणि तुझ्या शपथा खोट्या झाल्यावर तुज समर्थाशीं भांडत कोणी बसावें !' ५६ हे उद्धवा ! तूं असें समजूं नकोस. मीं जी शपथ वाहिली ती परमात्म्याच्या साक्षीनें खरी आहे. ५७ तूं माझा परिपूर्ण आत्मा आहेस. तुझ्यांत व माझ्यांत भेद नाहीं. त्या तुझी मीं शपथ वाहिली, त्याला परमात्माच साक्षी आहे. ५८ प्रत्यक्ष प्रमाण असतांना आण भाक तरी कशाला हवी ! सर्व भावानें मला शरण आल्यास तूं आतांच तरून जाशील.५९ तूं मला जर पूर्णपणें शरण आलास तर कळिकाळहि तुझ्या पायां पडेल, मग तुला बापडें संसारभय कसलें ! तुझ्याकडे कोण पहाणार ? २६० तूं शरण येतांच तत्काळ तुला माझें सामर्थ्य प्राप्त होईल व संसाराचें सगळें भय पळून जाईल. तुला कळिकाळ चळचळां कांपेल. ६१ गवतावर अग्नीची ठिणगी पडली असतां ती वनेंच्या वनें जशीं जाळून टाकिते, त्याप्रमाणें मला शरण आल्यास संसाररूपी अरण्य तूं जाळून टाकशील. ६२ 'पण ज्या हृदयस्थाला शरण जावयाचें तो हृदयस्थ कसा आहे, हें आम्हांला कळत नाहीं.' असें जर तूं म्हणशील तर हे उद्धवा ! त्याचें स्वरूप सांगतों. ऐक. ६३ नाम, रूप व अभिमान टाकिल्यावर जें 'उद्धवपण' स्फुरतें तेंच मज हृदयस्थाचें रूप आहे, असें तूं जाण. त्यालाच तूं शरण जावेंस. ६४ नाम-रूप-गुण ही वस्तुतः माया आहे. तिला सोडून जी सत्ता स्फुरते, तेंच मज हृदयस्थाचें रूप आहे. ६५ अशाप्रकारें हृदयस्थाची प्राप्ति केल्यावर मग सर्व भूतांमध्यें देवच दिसूं लागतो. तेथें उद्धवाला निराळें रहाण्यास रिकामी जागाच उरत नाहीं. ६६ तेव्हां सर्व भूतांमध्यें मी निश्चयानें एकच असतों. अनेक लोक पाहिले तरी त्या सर्वांत मीच एक दिसतों. ६७ याप्रमाणें तूं हृदयस्थ परमात्म्यालाच प्राप्त झालास कीं मग मद्रूप होऊन

मज पावसी । माझी प्राप्ती उद्धवा ऐसी । निर्भयेंसी निश्चळ ।। ६८ ।। ऐसी सांगोनि गुह्य गोष्टी । देवो उद्धवाची पाठी थापटी । येरें चरणीं घातली मिठी । उठवितां नुठी सर्वथा ।। ६९ ।। तुवां जें सांगितलें निजगुज । तें मज मानलें गा सहज । बोला एकाचा संशय मज । तो मी तुज पुसेन ।। २७० ।।

उ. वा–संशयः शृण्वतो वाचं तव योगेश्वरेश्वर । न निवर्तत आत्मस्थो येन भ्राम्यति मे मनः ।। १६ ।।

वेदशास्त्रांचें मथित सार । योगदुर्गींचें भांडार । पिकल्या सुखाचा सुखसागर । मज साचार उपदेशिला ।। ७१ ।। तूं योगियांचा योगेश्वर । सकळ जगाचा ईश्वर । तुझें सत्य गा उत्तर । संशयकर मज वाटे ।। ७२ ।। तुवांच सांगितलें साक्षेपें जाण । करावें गा स्वधर्माचरण । तें सत्य मानूनि वचन । सर्वस्वें जाण विश्वासलों ।। ७३ ।। करावें जें स्वधर्माचरण । तेंच म्हणशी माझें भजन । शेखीं तेंही आतां सांडून । रिघावें शरण म्हणतोसी ।।७४।। तरी आत्मा कर्ता कीं अकर्ता । हेंचि न कळे तत्त्वतां । कर्म करावें कीं सर्वथा । आम्हीं आतां सांडावें ।। ७५ ।। तुझी विषम उपदेशव्युत्पत्ती । सांगतां आम्हां अबळांप्रती । थोर संदेह वाढत चित्तीं । काय श्रीपति करावें ।। ७६ ।। जरी आत्मा झाला अकर्ता । तरी कर्माचा कोण कर्ता । जैं आत्म्यासी आली अकर्तव्यता । तैं त्याग सर्वथा घडेना ।। ७७ ।। ऐकोनि उद्धवाचा प्रश्न । सांवळा राजीवलोचन । काय बोलिला हांसोन । सावधान परिसावें ।। ७८ ।।

मलाच येऊन मिळशील. हे उद्धवा ! माझी प्राप्ति अशी निर्भय व निश्चल आहे, ६८ असें हें गुप्तरहस्य सांगून देवानें उद्धवाची पाठ थोपटिली. त्याबरोबर उद्धवानें देवाच्या पायांना मिठी घातली व त्यास उठविलें तरी तो कांहीं केल्या उठेना. ६९ उद्धव म्हणाला कीं, श्रीकृष्णा ! तूं जें आपलें रहस्य सांगितलेंस, तें सर्व मला पटलें. आतां एकच संशय राहिला आहे. तो मी तुला विचारितों. २७०.

—' पूर्वीं मीं सांगितलेल्या स्वधर्मामध्यें सावधान राहून ' इत्यादि वचनानें कर्म अवश्य करावें असें सांगितलें, व आतां ' सर्वांचा त्याग करून मलाच शरण ये ' असें सांगतां ! पण त्यामुळें आत्म्याला कर्तृत्व आहे कीं नाहीं हा आत्मविषयक संशय निवृत्त होत, नाहीं किंवा कर्म करावें कीं टाकावें, या माझ्या हृदयस्थ संशयाची निवृत्ति होत नाही, असें आतां उद्धव विचारितो—

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला, योगेश्वरेश्वर–हे योगेश्वरांच्या ईश्वरा, तव वाचं शृण्वतः आत्मस्थः संशयः न निवर्तते–तुझी वाणी ऐकणाऱ्या माझ्या मनांतील संशय निवृत्त होत नाहीं. येन मे मनः भ्राम्यति— ज्या संशयाच्या योगानें माझें मन भ्रांत होत आहे, [तो माझ्या मनांतील संशय तुझें हें वचन ऐकून निवृत्त होत नाहीं.] १६.

वेदशास्त्रांचें मंथन करून महत्प्रयासानें काढिलेलें सारच, किंवा योगरूपी किल्ल्यांतील भांडारच, किंवा परिपक्व सुखाचा सागरच, असा उत्तम उपदेश तूं मला केलास. ७१ तूं योग्यांचाहि योगीश्वर व सगळ्या जगाचा ईश्वर आहेस; पण तुझें वचन मला खरोखर संशयांत टाकीत आहे. ७२ एकदा तूं ' स्वधर्माचरण करावें ' असें म्हटलेंस व आतां ' सर्वधर्मत्याग करून मच्छरण हो ' असें सांगतोस ! तेव्हां कर्म करावें कीं, टाकावें अशा भ्रमांत मी पडलों आहें. स्वधर्माचरण करावें असें तूंच मोठ्या आवेशानें एकदां सांगितलेंस. म्हणून तें तुझें वचन सत्य समजून मीं तुझ्यावर सर्वस्वीं विश्वास ठेविला. ७३ ' स्वधर्माचरण करणेंच माझें भजन आहे. ' असेंहि पुनः म्हटलेंस व शेवटीं आतां ' तें सर्व टाकून मलाच शरण यावें ' असें म्हणतोस. ७४ तेव्हां आत्मा कर्ता आहे कीं अकर्ता आहे, हेंच मला तत्त्वतः कळत नाहीं. तसेंच आम्हीं आतां कर्म करावें किंवा तें सर्वथा सोडावें ! ७५ तुझा हा उपदेशप्रकार विलक्षण आहे. तो ऐकून माझ्या मनांत मोठा संशय उत्पन्न झाला आहे. हे श्रीपते ! तेव्हां काय करावें ! ७६ आत्मा जर अकर्ता असेल तर मग कर्माचा कर्ता कोण ! आणि आत्म्याला जर अकर्तव्यता येईल तर त्याग सर्वथा घडणार नाहीं ! ७७ हा उद्धवाचा प्रश्न ऐकून राजीवनयन श्यामसुंदर प्रभु हंसून काय बोलला, तें ऐकावें. २७८.

श्रीभगवानुवाच-स एष जीवो विवरप्रसूतिः प्राणेन घोषेण गुहां प्रविष्टः।
मनोमयं सूक्ष्ममुपेत्य रूपं मात्रा स्वरो वर्ण इति स्थविष्ठः ॥ १७ ॥

ऐक बापा उद्धवा। मी मायेच्या स्वभावा। अनुसरोनि जीवभावा। कर्तृत्व जीवा जीवत्वें ॥ ७९ ॥ जळीं प्रतिबिंबला सविता। तो जळकंपें दिसे कांपतां। तेवीं अकर्ताचि मी दिसें कर्ता। जीवअहंतास्वभावें ॥ २८० ॥ राजा झालिया निद्रेअधीन। तो स्वप्नीं रंक होय आपण। तेवीं प्रकृतीस्तव

—या पुढील आठ श्लोकांनीं भगवान् उद्धवाच्या प्रश्नाचें उत्तर देत आहेत. त्याचा भावार्थ असा—ईश्वर अगोदर स्वमायावशात् प्रपंचरूपानें भासतो. त्या प्रपंचाध्यासामुळें अनादि अविद्येनें जीवांचें कर्तृत्वादि भासतें. त्यामुळें त्यांना विधि-निषेधांचा अधिकार प्राप्त होतो. त्या अधिकृतावस्थेंत चित्तशुद्ध्यर्थ कर्में कर असें सांगितलें. चित्त शुद्ध झालें असतां पुनः कर्मजाड्य उत्पन्न होऊं नये म्हणून भक्तीला विघ्न करणाऱ्या कर्मांचा आदर टाकून दृढ विश्वासानें भजन कर, असें सांगितलें. विद्या उत्पन्न झाली असतां कांहीं कर्तव्य उरत नाहीं, हा सिद्धान्त आहे. भगवान् आपल्या पुढील उत्तरांतील साडेचार श्लोकांनीं अगोदर ईश्वरापासून वागादि इंद्रियांच्या द्वारां जीवाच्या संसाराला कारण होणाऱ्या प्रपंचाची उत्पत्ति सांगतात—

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान म्हणाले— सः एषः जीवः—तो हा अपरोक्ष असलेला व शरीराला जीवविती म्हणून जीव अर्थात् परमेश्वर (त्याच्या अपरोक्षत्वाविषयीं हेतु -) वीवरप्रसूतिः—आधारादि चक्रांमध्यें ज्याची प्रसृति म्ह० अभिव्यक्ति झाली आहे, असा होत्साता, (ती अभिव्यक्तीच सांगतात—) घोषेण प्राणेन गुहां प्रविष्टः—परासंज्ञक नादयुक्त प्राणासह आधारचक्रामध्यें प्रविष्ट होत्साता, मनोमयं सूक्ष्मं रूपं उपेत्य—मनोमय सूक्ष्म रूपाला म्ह० पश्यंती व मध्यमा या नांवाच्या मणिपूर व विशुद्ध चक्रांतील रूपास प्राप्त होऊन .(मुखांत), मात्रा स्वरः वर्णः इति स्थविष्ठः—ऱ्हस्वादि मात्रा, उदात्तादि स्वर व अकारादि वर्ण याप्रमाणें अतिस्थूल म्ह० अनेक वेद-शास्त्रात्मक होतो. [आधारादि चक्रांमध्यें अभिव्यक्त झालेला व त्यामुळेंच अपरोक्ष असलेला, सर्व जीवांना जीवन देत असल्यामुळें जीव या संज्ञेस पात्र झालेला परमेश्वर ' परा वाणी ' या नांवाच्या प्राणासह आधारचक्रांत प्रविष्ट होऊन मणिपूरचक्रांत ' पश्यंती ' या नांवाच्या व विशुद्धिचक्रांत ' मध्यमा ' या नांवाच्या मनोमय सूक्ष्म रूपास प्राप्त होऊन मुखांत ' वैखरी ' या नांवाच्या स्वर-मात्रा-वर्णात्मक अतिस्थूल वाग्रूप म्ह० अनेक वेदशास्त्रात्मक होतो. याविषयीं ' चत्वारि वाक् परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः। गुहात्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥ ही श्रुति प्रमाण आहे. अर्थ—वाक्‌चीं परिमित स्थानें चार आहेत. परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी. अध्यात्मशास्त्रांत कुशल असलेले ब्राह्मण त्यांना जाणतात. त्यांतील पहिलीं तीन पदें शरीरांत मूलाधार, नाभी, व हृदय यांमध्यें आहेत. त्यामुळें तीं कोणाला कळत नाहींत. मनुष्य चवथ्या ' वैखरी ' संज्ञक वाणीनें बोलतो. मनुष्याच्या मुखांतील अर्थबोधक शब्द होतो. असा याचा भावार्थ. याविषयीं ' या सा मित्रावरुणसदनादुच्चरन्ती त्रिषष्टिं वर्णानंतः प्रकटकरणैः प्राणसंगात्प्रसूते। तां पश्यन्तीं प्रथममुदितां मध्यमां बुद्धिसंस्थां वाचं वक्त्रे करणविशदां वैखरीं च प्रपद्ये। ' असा प्राचीन अनुभवी विद्वानांचा श्लोकहि आहे. ती जी अग्नि-सोमस्थानापासून उद्भवणारी (मित्र म्ह० अग्नि, वरुण० सोम, त्या दोघांचें सदन म्ह० निवासस्थान परमात्मा, त्याच्यापासून श्वास हेंच शीतोष्णत्व त्यापासून उद्भवणारी) परावाक् वायूच्या संबंधानें त्रेसष्ट वर्णांना उत्पन्न करिते. बुद्धींतील प्रत्यक्षरूप इंद्रियांनीं ती आंतल्याआंत पहाते. उच्चार करीत नाहीं. म्हणूनच ती 'पश्यंती ' या नांवानें प्रसिद्ध आहे. प्रथम उत्पन्न झालेल्या व बुद्धीमध्यें स्थित असलेल्या तिला मी आतां उच्चारीन. अशा विचारानें युक्त असलेली जी वाणी तीच मध्यमा होय. मुखामध्यें स्थित असलेली, वागींद्रियांनीं विशद झालेली, स्थान व प्रयत्न यांनीं शुद्ध झालेली जी वाणी ती वैखरी होय. अशा या त्रिविध वाणीला मी प्राप्त होतों. अ, इ, उ, यांतील प्रत्येक स्वराचे ऱ्हस्व, दीर्घ व प्लुत असे तीन भेद आहेत. म्हणून हे नऊ, ऋ, आणि ऌ यांना प्लुत नाहीं, म्हणून ते चार आणि ए, ऐ, ओ, औ यांना ऱ्हस्व नाहींत म्हणून ते आठ, एकूण एकवीस स्वर, तेहतीस व्यंजनें आणि अनुनासिक, विसर्ग, अनुस्वार जिव्हामूलीय, उपध्मानीय मिळून नऊ असे एकंदर त्रेसष्ट वर्ण होतात.] १७.

बाबा उद्धवा ! ऐक. मायेच्या मूळ स्वभावाला अनुसरून मी जीवभावाला प्राप्त झालों आहें. जीवाला जीवत्वामुळें कर्तृत्व येतें. ७९ पाण्यांत पडलेलें सूर्याचें प्रतिबिंब पाणी हालतांच हाललेलें जसें दिसतें त्याप्रमाणें अकर्ताच असूनहि मी जीवाच्या अहंकार स्वभावामुळें कर्ता असलेला दिसतों. २८० राजा झोपेच्या अधीन झाला

मज जाण । जीवपण आभासे ॥ ८१ ॥ स्वयें राजा आहे आपण । तो स्वप्नीं रंकत्वें करी कोरान्न । तेथें जो दे पसाभर कण । त्यासी वानी आपण राजा रे तूं ॥ ८२ ॥ आपणचि राजा आहे । हें त्याचें त्यास ठाउकें नोहे । तैसेंच जीवासही होये । पूर्णत्व स्वयें स्मरेना ॥ ८३ ॥ जेवीं स्वप्नाचिया अवस्था । राजा रंकक्रिया करी समस्ता । तेवीं अविद्येस्तव तत्त्वतां । कर्मकर्ता मी झालों ॥ ८४ ॥ तेथें वेदोक्त विधिविधान । जीवाअंगीं आदळे जाण । जंव नव्हे ब्रह्मज्ञान । तंव स्वधर्माचरण करावें ॥ ८५ ॥ राजा राजपदीं जागा नव्हे । तंव रंकक्रिया त्यासी संभवे । तेवीं जंव ब्रह्मज्ञान नव्हे । तंव सर्व करावे स्वधर्म ॥ ८६ ॥ राजा राजपदीं जागा झाला । तो भीक म्हणतांचि लाजला । तेवीं ब्रह्मज्ञान जो पावला । तो मी कर्ता या बोला न बोले कदा ॥ ८७ ॥ जैसें रायास मिथ्या रंकपण । तेवीं परमात्म्यासी जीवत्व जाण । त्या जीवास शरीरीं संसरण । तें उपलक्षण अवधारीं ॥ ८८ ॥ जैसा जीव जडातें जीवविता । यालागीं जीवू ऐशी वार्ता । सहजें तरी स्वभावतां । चैतन्यरूपता जीवाची ॥ ८९ ॥ घटामाजीं दीपू घातला । तैं घटभरी प्रकाशू झाला । तोचि घरामाजीं ठेविला । घरभरी झाला प्रकाश ॥ २९० ॥ तेवीं शरीरामाजीं तरी जीवू । सहजें तरी सदाशिवू । येथ बोलणें न लगे बहु । जीवशिवअनुभवू तो ऐसा ॥ ९१ ॥ आरिशाचा सूर्य दिसे हातीं । तेवीं शरीरीं जीवाची प्रसूती । प्रकर्षेंसी राहती स्थिती । यालागीं प्रसूती बोलिजे ॥ ९२ ॥ आरसा अत्यंत लहान । तेथें सूर्य बिंबे संपूर्ण । तेवीं विदेहा देहधारण । 'विवरप्रवेशन' त्यस नांव ॥ ९३ ॥ थिल्लरीं चंद्रासी अभिव्यक्ती । तो गगनींचा दिसे अधोगती । तेवीं शरीरीं जीवाची प्रसूती । अव्यक्त व्यक्तीं प्रवेशे ॥ ९४ ॥ जळीं सविता प्रतिबिंबला । परी तो जळें नाहीं ओला झाला ।

म्हणजे तो स्वप्नांत स्वतःला जसा भिकारी झालेला पहातो, त्याप्रमाणें मायेमुळेंच माझें जीवपण भासतें. ८१ आपण स्वतः राजा असून स्वप्नांत दीन होऊन कोरडी भिक्षा मागतो आणि त्याला जो कोणी मुठभर भिक्षा घालितो, त्याची तो 'तूं राजा आहेस' अशी स्तुति करितो. ८२ परंतु आपण स्वतःच राजा आहोंत, हें त्याचें त्यालाच स्मरत नाहीं. तशीच जीवाची स्थिति होते व स्वतःचें पूर्णत्व त्याला स्मरत नाहीं. ८३ ज्याप्रमाणें स्वप्नस्थितींत राजा स्वतःला भिकारी समजून त्याच्यासारखें सगळें वर्तन करितो त्याचप्रमाणें मी मायेच्या योगानें कर्मकर्ता झालों आहें. ८४ असें समजलें असतां वेदोक्त विधि-विधान सर्व अंगावर येऊन आदळतें. जोंपर्यंत ब्रह्मज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत स्वधर्माचरण करावें. ८५ राजा जागा होऊन 'मी राजा आहें' हें जोंपर्यंत त्याला आठवत नाहीं तोंपर्यंतच स्वप्नांतील त्याची भिक्षावृत्ति संभवते, त्याचप्रमाणें जोंवर ब्रह्मज्ञान झालें नाहीं, तोंवरच स्वधर्माचरण करीत असावें. ८६ राजा स्वप्नांतून जागा होऊन 'मी राजा आहें' हें त्याला स्मरतांच 'भिक्षा' हा शब्द उच्चारण्याचीहि लाज वाटूं लागते. त्याप्रमाणें जो ब्रह्मज्ञानी झाला तो 'मी कर्ता' असें वचन कधीं बोलणारहि नाहीं. ८७ राजाचें भिक्षा मागणें जसें मिथ्या, तसेंच परमात्म्याचें जीवत्वहि मिथ्याच समज. जीव शरीरामध्यें कसा संचार करितो तें उपाधीमुळें उत्पन्न झालेलें गौणलक्षण आतां ऐक. ८८ जीव जडाला सजीव करितो, म्हणून त्याला जीव असें म्हणतात. जीवाची चैतन्यरूपता स्वाभाविकच आहे. ८९ दिवा घटांत ठेवला तर तो घटापुरताच प्रकाशतो. तोच जर घरांत ठेविला तर घरभर प्रकाश पडतो. २९० त्याचप्रमाणें शरीरांत असेपर्यंतच हा आत्मा जीव म्हटला जातो, एरवीं तो सदाशिव म्ह० सर्वव्यापी परमात्माच आहे. येथें जास्त बोलण्याची गरजच नाहीं. कारण जीवाचा व शिवाचा अनुभव असा आहे. ९१ आरशांत पडलेलें सूर्याचें प्रतिबिंब ज्याप्रमाणें आपल्या हातांत आल्यासारखें भासतें, त्याप्रमाणें शरीरांत जीवाची प्रसूति होते, त्याचें चैतन्यरूपानें शरीरांत राहणें यालाच 'प्रसूति' असें म्हणतात. ९२ आरसा अगदीं लहान असतो. पण त्यांत सूर्याचें संपूर्ण प्रतिबिंब पडतें. त्याप्रमाणें देहरहित आत्मा देहधारण करितो, म्हणून त्याला 'विवरप्रवेशन' म्ह० विवरांत प्रवेश करणें असें म्हणतात. ९३ पाण्याच्या डबक्यांत चंद्राचें प्रतिबिंब पडलें म्हणजे आकाशांतील चंद्र खालीं उतरला आहे, असें वाटतें. त्याप्रमाणें शरीरांत जीवाची प्रसूति होणें म्हणजे अव्यक्तानें व्यक्तांत प्रवेश करणेंच आहे. ९४ पाण्यांत सूर्याचें प्रतिबिंब पडलें, तरी सूर्य कांहीं त्या पाण्यानें भिजत

तेवीं कर्मे करोनि संचला । अलिप्त ठेला निजआत्मा ।। ९५ ।। जळीं प्रतिबिंब आंदोलायमान । तेवीं जीवासी जन्ममरण । थिल्लरीं चंद्र अडकला जाण पूर्ण । तेवीं कर्मबंधन जीवासी ।। ९६ ।। थिल्लरजळ आटलें । तेथें काय चंद्रबिंब निमालें । तें चंद्रबिंब होवोनि ठेलें । जाहलें निमालें दोनी मिथ्या ।। ९७ ।। थिल्लरींचा चंद्र काढूं जातां । तो मिथ्यात्वें न ये हाता । तेवीं देहीं मिथ्या जीवता । ते सत्य मानितां अतिदुःखी ।। ९८ ।। आरसा थोर अथवा लहान । तेथें सूर्य बिंबे संपूर्ण । तेवीं मी अंतर्यामी जाण । सर्वांभूतीं समान समग्र असें ।। ९९ ।। सूर्य थिल्लराआंतौता । अडकला दिसे समस्तां । तेवीं जीवासी कर्मबद्धता । मूर्ख तत्त्वतां मानिती ।। ३०० ।। गगनींचा सूर्यो न देखती । थिल्लरीं अडकला मानिती । तेवीं निर्गुणीं जयां नाहीं प्रतीती । ते बद्ध म्हणती जीवातें ।। १ ।। अग्निज्वाला जाळीं आकळितां । जाळ जळे आकळूं जातां । तेवीं आत्मया कर्मीं बांधतां । कर्मीं कर्मता निर्धर्म ।। २ ।। नाद उत्पत्तीसी ठावो । मुख्य वावो कां दुसरा घावो । या दोहीं वेगळा नित्य निर्वाहो । तो नाद पहा हो अनुहत ।। ३ ।। अनुहताचा सोलींव शब्द । परापरतीरीं पराख्य नाद । ज्याचा योगिया सदा छंद । बोलिला अनुवाद नव्हे त्याचा ।। ४ ।। ज्या नादाची सुखगोडी । सदाशिवूच जाणे फुडी । का सनकादिकीं चोखडी । चाखिली गाढी ते चवी ।। ५ ।। वायूचें शोधितां सत्व । त्यासी एकवटलें तें शब्दतत्त्व । उभयचेतनें जीवित्व । मनोमयत्व धरूं पाहे ।। ६ ।। जें चेतनेंचें चेतनत्व । तें वायूचें शोधित सत्व । तेंचि शब्दाचें निजतत्त्व । तेणें जीवित्व मनोरूप होय ।। ७ ।। जीवाचा शरीरसंयोग । स्वयें सांगे तो श्रीरंग । आधारादिचक्रप्रयोग । क्रमेंचि साङ्ग सांगत ।। ८ ।। अहमिती प्रथमाध्यासें । जीवासी जीवत्व अभासे । तो जे जे तत्त्वीं प्रवेशे । तें मी ऐसें म्हणतचि ।। ९ ।। तेथ मी देहो म्हणतां । तत्काळ जाय

नाहीं, त्याप्रमाणें कर्मे करूनहि स्वात्मा त्यापासून अलिप्तच असतो. ९५ पाण्यांतील प्रतिबिंबाचें जसें हलणें तसेंच जीवाचें जन्म-मरण आहे. डबक्यांत चंद्राचें जसें अडकून पडणें, तसेंच जीवाचें कर्मबंधन आहे. ९६ डबक्यांतील पाणी आटून गेलें म्हणजे प्रतिबिंब नाहींसें होतें. परंतु त्यामुळें आकाशांतील चंद्रबिंब कांहीं लोपत नाहीं. तें जसेंच्या तसेंच असतें. डबक्यांत प्रतिबिंब दिसणें व नाहींसें होणें हीं दोन्हीं मात्र मिथ्याच असतात. ९७ डबक्यांतील प्रतिबिंबित झालेला चंद्र जर आपण काढून घेऊं म्हटलें तर तो मिथ्या असल्यामुळें जसा हातीं लागत नाहीं, त्याप्रमाणें देहांतील जीवत्व मिथ्या आहे. तें सत्य मानिलें असतां अतिशय दुःख होतें. ९८ आरसा लहान असो किंवा मोठा असो, त्यांत सूर्याचें प्रतिबिंब संपूर्णच पडतें. त्याप्रमाणें मी अंतर्यामी सर्वभूतांमध्यें समान व पूर्ण असतों. ९९ सूर्य जसा डबक्यांत अडकलेला सर्वांना दिसतो, त्याप्रमाणें जीव कर्मानें बद्ध होतो, असें मूर्ख लोक मानितात. ३०० आकाशांतील सूर्याला ते पहात नाहींत आणि त्याच्या प्रतिबिंबाला पाहून सूर्यच डबक्यांत अडकून पडला आहे, असें मानितात. त्याप्रमाणें ज्यांना निर्गुण परमात्म्याचा अनुभव नाहीं, ते जीवाला बद्ध म्हणतात. १ अग्नीची ज्वाला जाळ्यांत धरून ठेवावयास गेलें असतां तें जाळेंच जळून जाईल, त्याप्रमाणें आत्म्याला कर्मानें कर्मात बद्ध करूं लागलें असतां कर्माचें कर्मत्वच नाहींसें होतें. २ नादाच्या उत्पत्तीचीं दोन कारणें आहेत. एक अवकाश व दुसरें आघात; पण या दोन्हीं कारणांहून निराळा व नित्य सिद्ध असा जो नाद त्याला 'अनुहत' असें म्हणतात. ३ परापर वाणीच्या पलीकडे असलेला जो 'परा' या नांवाचा नाद तोच अनुहताचा शुद्ध शब्द आहे. योग्यांना त्याचा अतिशय छंद असतो. शब्दानें त्याचें वर्णन करितां येत नाहीं. ४ त्या नादाचा सुखानुभव सदाशिवच कायतो जाणतो किंवा सनकादिकांनीं त्या नादाची पूर्ण गोडी चाखिली आहे. ५ वायूचें शुद्ध सत्त्व म्हणजे चांचल्य. त्यांत शुद्ध शब्दतत्त्व मिळून त्या दोहोंच्या चैतन्यानें त्याला सजीवत्व येतें आणि त्यांच्या मिलाफानें मन उत्पन्न होतें. ६ चेतनेंतील जें चैतन्य तेंच वायूंतील शुद्ध सत्त्व होय. शब्दाचें मूळतत्त्वहि तेंच आहे. त्यानेंच जीवित मनोरूप होतें. ७ याप्रमाणें श्रीरंगानें स्वतः जीवाचा शरीसंयोग सांगितला. आतां आधारादि चक्रप्रयोग क्रमानेंच सांगतात. ८ 'अहं' म्ह० मी या पहिल्या अध्यासानें जीवाला जीवत्वाचा भास होतो आणि तो ज्या ज्या तत्त्वांत प्रवेश करितो त्याला 'मी' असें म्हणतो. ९ त्यानें देहाला 'मीच' म्हटलें कीं, त्याचा पूर्णपणा

पूर्णता । तेव्हां एकदेशी परिच्छिन्नता । देहात्मता लागली ।। ३१० ।। निर्विशेष नाद अतिसूक्ष्म प्राण । त्यासहित आधारीं प्रवेशोन । अतिसूक्ष्म प्रथम स्फुरण । पावोनि जाण परा झाली ।। ११ ।। आधारचक्रीं सूक्ष्म प्राण । परा वाचा तेथींची जाण । मनाचें कोंवळें स्फुरण । अतिसपूरपण सूक्ष्मत्वें ।। १२ ।। स्वाधिष्ठानचक्राच्या ठायीं । मनाचें वाढतें बाळसें पाहीं । पश्यंती वाचा तये ठायीं । बोलूं देखे परी कांहीं बोलेना ।। १३ ।। तिये चक्रीं एकवटला प्राण । पुढारां न चलेचि गा जाण । प्राणापाना झालें भांडण । दोघेजण रूसले ।। १४ ।। घरकलहो लागला भारी । मग निघाले वेगळे चारी । पांचही राहिले पांचांपरी । ऐक निर्धारीं विचारू ।। १५ ।। मागें रुसोनि गेला जाण । त्या नांव म्हणती अपान । रागें पुढारां आला जाण । त्या नांव प्राण म्हणताती ।। १६ ।। दोहींमाजीं समत्वें जाण । नाभीं राहिला तो समान । कंठीं राहिला तो उदान । व्यानासी रहावया स्थान असेना ।। १७ ।। अद्यापि शरीरीं जाण । व्यानासी नाहीं एक स्थान । तो सर्वांगीं सर्वदा जाण । परिभ्रमण करीतसे ।। १८ ।। याहून धाकटे पांच प्राण । तेही वेगळे राहिले जाण । तिंहीं वेगळालें आपण । वस्तीसी स्थान योजिलें ।। १९ ।। नाग कूर्म कृकल देवदत्तू । पांचवा धनंजय जाण तेथू । यांची वस्ती जे शरीरांतू । ऐक निश्चितू सांगेन ३२० ।। शिंक जांभई आणि ढेंकर । नाग कूर्म कृकलांचें घर । उचकी देवदत्ताचें बिढार । धनंजयासी थार मिळेचिना ।। २१ ।। जीवदेहांचे आप्तवादापासीं । धनंजयो राहिला वस्तीसी । जीवें सांडिल्या शरीरासी । मुहूर्तार्ध देहासी तो वांचवी ।। २२ ।। स्वाधिष्ठानाहोनि जाण । अनुक्रमें दशधा होती प्राण । त्यांचें स्थान मान उपलक्षण । तुज म्यां जाण सांगितलें ।। २३ ।। मागें म्यां सांगितली गोष्टी । प्राणापान रुसल्या पाठीं । दोघां अद्यापि नाहीं भेटी । महाहटी छांदस ।। २४ ।। त्या दोघांसी करी बुझावण । तो माझा पढियंता तूं

तत्काळ नाहींसा होतो व एकदेशी मर्यादितपणानें देहात्मबुद्धि त्याच्या पाठीस लागते. ३१० सामान्य नाद हाच अति सूक्ष्म प्राण आहे. त्यासह आधारचक्रामध्यें प्रवेश करून जें पहिलें स्फुरण होतें, तीच परा वाणी झाली. ११ आधारचक्रांत सूक्ष्मप्राण जेथें असतो तेथेंच परा वाणी असते. तेंच मनाचें कोंवळें स्फुरण आहे. तें स्वरूपतः अति सूक्ष्म असतें. १२ स्वाधिष्ठानचक्रामध्यें तेंच सूक्ष्म मन बाळसें धरितें. तेथेंच ही दुसरी वाणी रहाते. ती बोलण्याचा प्रयत्न करिते; पण कांहीं बोलूं शकत नाहीं. १३ त्या चक्रांत प्राण एकरूप झाला आहे, तो पुढें जाऊं शकत नाहीं. प्राणापानांचें भांडण झालें. ते दोघे एकमेकांवर रुसले. १४ मोठा गृहकलह माजला. त्यांचे वेगळेचार झाले आणि ते पांचहिजण पांच ठिकाणीं राहिले. हाच विचार तूं निश्चयानें ऐक. १५ जो रुसून गेला होता त्याला अपान म्हणतात आणि रागानें जो पुढें येतो त्याला प्राण असें म्हणतात. १६ या दोहोंच्यामध्यें समसमानत्वानें जो नाभींत रहातो तो समान व कंठांत रहातो. तो उदान व्यानाला रहावयास कायमची जागाच नाहीं. १७ तेव्हां तो व्यान अजूनहि शरीरांत एकाच जागीं रहात नसून सर्वदा सर्व शरीरभर संचार करीत असतो. १८ याहून सूक्ष्म जे पंचप्राण तेहि वेगळे राहिले. त्यांनीं आपल्या रहावयास वेगळाल्या जागा योजिल्या. १९ नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि पांचवा धनंजय असे ते पंचप्राण आहेत. त्यांचें शरीरांतील रहाण्याचें स्थान आतां सांगतों, ऐक. ३२० शिंक हें नागाचें स्थान. जांभई कूर्माचें स्थान, ढेंकर हें कृकलाचें घर, उचकी हें देवदत्ताचें बिऱ्हाड झालें व धनंजयाला कोठेंच थारा मिळेना, २१ तेव्हां जीव व देह यांचा संगम जेथें होतो, ज्याला चिज्जडग्रंथि म्हणतात तेथें हा धनंजय नांवाचा उपप्राण रहातो. जीवानें शरीर सोडिलें असतां हाच प्राण अल्पकाल त्या देहाला वांचवितो म्हणजे त्यांत विकार होऊं देत नाहीं. २२ स्वाधिष्ठानापासून असे हे दहा प्राण होतात. त्यांचें स्थान, मान व उपलक्षण मीं तुला सांगितलें. २३ मागें मीं तुला सांगितलें होतें कीं, प्राण व अपान हे दोघे रुसल्यापासून आतांपर्यंत त्या दोघांची भेट नाहीं. असे ते मोठे हट्टी व नादिष्ट आहेत. २४ त्या दोघांची जो समजूत घालितो, तो माझा फार आवडता आहे,

जाण । त्या सर्वस्व दें मी आपण । योगसाधन या नांव ।। २५ ।। उद्धवा प्राणलक्षणें सांगतां । अवचटें प्राणापानसमता । प्रसंगीं आली कथा । त्वांही स्वभावतां ऐकावी ।। २६ ।। स्वाधिष्ठानाहोनि मणिपुरा येतां । जीवामनांची एकात्मता । सूक्ष्म प्राण तेथ वसतां । परेच्या ऐक्यता पश्यन्ती ।। २७ ।। तेथ मनाचें खेळुगेपण । कुमार अवस्था बाणली जाण । तंव डोलत पुढें चाले प्राण । अनाहतस्थान टाकिलें ।। २८ धरोनि पश्यन्तीचें अनुसंधान । मध्यमा वाचा उपजे जाण । मौनाची मिठी न सोडून । करी गुणगुण आपणांत ।। २९ ।। तेथ मनाची पौगंड अवस्था । मागें पुढें सांभाळितां । वांछी नाना भोग अवस्था । लाजा सर्वथा बोलेना ।। ३३० ।। मग वेगें टाकिलें विशुद्धिस्थान । तेथ उसळत उदान झाला प्राण । तंव मनासी तारुण्यपण । पुरतें जाण बाणलें ।। ३१ ।। त्या विशुद्ध चक्राप्रती । परा मिळोनि आंतौती । पश्यन्ती मध्यमा एक होती । वाचा घुमघुमती झणत्कारें ।। ३२ ।। त्या झणत्कारा-परिपाठीं । वक्त्रीं वाचा तत्काळ उठी । तारुण्यें उन्मत्त झाली मोठी । त्या स्वरवर्ण चावटी मांडिली ।। ३३ ।। अज्ञाचक्र भ्रूस्थान । तें याहूनि वेगळें जाण । तेथें वाचेसी नाहीं गमन । हंसलक्षण योग्यांचें ।। ३४ ।। हीं साही चक्रें अनुक्रमें जाण । चार मातृका अठ्ठावीस वर्ण । सोळाही स्वर संपूर्ण । हंस-लक्षण योगियांचें ।। ३५ ।। कोण चक्रीं कोण वर्ण । मातृकांचें कोणतें स्थान । कोठें उठती स्वर संपूर्ण । तेंही लक्षण अवधारीं ।। ३६ ।। आधारचक्रीं चतुर्दळ उभारा । तेथ न्यसिल्या चारी मात्रा । व श ष स या अक्षरा । बोलिजे मात्रा शास्त्रज्ञीं ।। ३७ ।। स्वाधिष्ठान षड्दळ जेथ । साही वर्ण स्थापिले तेथ । बकारादि लकारांत । जाण निश्चित ते स्थानीं ।। ३८ ।। मणिपूर दशदळ निश्चित । दहा वर्ण स्थापिले तेथ । डकारादि फकारांत । वर्ण नांदत ते चक्रीं ।। ३९ ।। अनाहतचक्र द्वादशदळयुक्त । बारा वर्ण न्यासिले तेथ । ककारादि ठकारांत । वर्ण विराजत ते चक्रीं ।। ३४० ।। विशुद्धिचक्रींच्या सोळा दळां ।

असें तूं जाण. त्याला मी आपलें सर्वस्व आपण होऊन देतों. यालाच योगसाधन म्हणतात. २५ हे उद्धवा ! प्राणांचें लक्षण सांगत असतां अकस्मात् प्राण-अपानाच्या समतेची ओघानेंच गोष्ट निघाली आहे, तरी आतां तूंहि ती कथा ऐक. २६ स्वाधिष्ठानाहून मणिपूर चक्रांत येतांच जीव व मन यांचें ऐक्य होतें. तेथें सूक्ष्म प्राण राहिले म्हणजे परा व पश्यंती यांची एकात्मता होते. २७ तेथें मनाच्या खेळकरपणानें त्याला कुमार-अवस्था प्राप्त होते, मग तो डुलत पुढें चालतो व अनाहतस्थानाला येऊन पोंचतो. २८ पश्यंतीकडे लक्ष्य ठेवून मध्यमा वाचा उत्पन्न होते. ती मौन सोडून आपल्याशींच गुणगुणूं लागते. २९ तेथें मनाला पौगंड म्ह० सोळा वर्षांच्या आंतील अवस्था प्राप्त होते. त्याला मागें पुढें संभाळीत असतांहि तें अनेक विषयभोग इच्छितें. पण लाजेनें कांहीं बोलत नाहीं. ३३० त्यानंतर वेगानें विशुद्धिस्थान प्राप्त होतें. तेथें उसळत येणारा उदान प्राण होतो. मनांत पूर्ण तारुण्य बाणतें. ३१ त्या विशुद्ध चक्रामध्यें, परावाणी ज्यांच्यामध्यें सूक्ष्मरूपानें आहे अशा पश्यंती व मध्यमा या दोन वाणी एक होतात व त्या मोठ्या झणत्कारानें घुमघुमूं लागतात. ३२ त्याबरोबर मुखामध्यें वैखरी वाक् उद्भवते. ती तारुण्यानें मोठी उन्मत्त होऊन स्वर व वर्ण यांचा चावटपणा सुरू करिते. ३३ भ्रूस्थान हें आज्ञाचक्र आहे. तें याहून वेगळें आहे. तेथें वाणीची गती होत नाहीं. ती योग्याचें हंसलक्षण आहे. ३४ अशीं हीं क्रमानें सहा चक्रें आहेत. चार मातृका, अठ्ठावीस वर्ण, सोळा स्वर हेंच तें योग्याचें हंसलक्षण होय. ३५ त्यांतील कोणत्या चक्रामध्यें कोणते वर्ण आहेत, मातृकांचें स्थान कोणतें आहे, संपूर्ण स्वर कोठें उठतात, तेंहि लक्षण तूं आतां ऐक. ३६ आधारचक्रामध्यें चार पाकळ्यांचें कमळ आहे. त्यांवर चार मात्रांचा न्यास केला आहे. व, श, ष, स या चार अक्षरांना शास्त्रज्ञ मात्रा असें बोलतात. ३७ स्वाधिष्ठान चक्राला सहा पाकळ्या आहेत. त्यावर ब-पासून ल-पर्यंत सहा वर्ण स्थापिले आहेत. ३८ मणिपूर दहा दळांचें आहे. त्यांत ड-पासून फ पर्यंत दहा वर्ण नांदतात. ३९ अनाहतचक्र बारा पाकळ्यांचें आहे. त्यांतील प्रत्येक पाकळीवर क-पासून ठ-पर्यंत बारा वर्ण शोभतात. ३४० विशुद्धि चक्राच्या सोळा पाकळ्या

अ इ उ ऋ ऌ हे वर्ण सोळा । कंठस्थानीं मीनला मेळा । यांचा वेदीं आगळा प्रताप ॥ ४१ ॥ आज्ञाचक्र अतिअवघड । नुघडे काकीमुखाचें कवाड । न चले प्राणांची चडफड । मार्ग अतिगूढ लक्षेना ॥ ४२ ॥ तें आज्ञाचक्र गा द्विदळ । केवळ हंसाचें राउळ । तेथ पावावया योगबळ । अतिप्रबळ पाहिजे ॥ ४३ ॥ हें स्थान पावावयासाठीं । योगी झाले महाहटी । अभ्यास करितां अतिसंकटीं । तेही शेवटीं न पावती ॥ ४४ ॥ हें पावावया माझें स्थान । अतिगुह्य आहे अनुष्ठान । सोहंहंसाचें साधन । सावधान जो साधी ॥ ४५ ॥ प्राणाचेनि गमनागमनें । सोहंहंसाचेनि स्मरणें । सावधानें जो साधूं जाणे । तेणें पावणें हें स्थान ॥ ४६ ॥ त्यासीचि पवनजयो घडे । तोचि आज्ञाचक्रामाजीं चढे । तेथूनि मार्ग काढी पुढें । अतिनिवाडें अचूक ॥ ४७ ॥ तेथ नानाभोगसमृद्धिफळें । आणिती ऋद्धिसिद्धींचें पाळें । ते डावलूनियां सकळें । निघे निर्मळें निजपंथें ॥ ४८ ॥ जो कां ऋद्धिसिद्धींसी भुलला । मी सिद्ध ये श्लाघे आला । तो आज्ञाचक्रावरोनि च्यवला । केल्या मुकला कष्टासी ॥ ४९ ॥ ज्यासी वैराग्य असें सपुरतें । तो कदा भुलेना सिद्धीतें । लाता हाणोनि भोगमान्यतेतें । निगे निजपंथें मजलागीं ॥ ३५० ॥ तें औट पीठ गोल्हाट । सांडूनि भ्रमरगुंफा कचाट । शोखूनि सहस्रदळाचे पाट । मजमाजीं सुभट मिसळले ॥ ५१ ॥ सांगतां आज्ञाचक्राची संस्था । पुढें गोडी लागली योगपंथा । मागील विसरलों जी कथा । क्षमा श्रोतां करावी ॥ ५२ ॥ म्हणाल वाहवटीं पडला मासा । तो परतेना जेवीं सहसा । ग्रंथनिरूपणीं तूं तैसा । जल्पू वायवसा कां करिसी ॥ ५३ ॥ जेवीं चुकलिया बाळकातें । माता शिकवण दे त्यातें । तेवीं तुमचें वचन मातें । निजहितातें द्योतक ॥ ५४ ॥ करितां चक्रांचें निरूपण । योगारूढ झालें मन । विसरोनि मागील निरूपण । गेलें निघून शेवटां ॥ ५५ ॥ हें ऐकोनि हांसिले श्रोते । तूं

आहेत. अकारादि सोळा स्वरांचा समूह त्या कंठस्थानामध्यें एकत्र जमला आहे. वेदांनीं यांचा प्रताप फारच वर्णिला आहे. ४१ आज्ञाचक्र अति अवघड आहे. त्याचें द्वार कांहीं केल्या उघडत नाहीं. प्राणांचा प्रयत्न तेथें चालत नाहीं. त्याचा गुप्तमार्ग दिसत नाहीं. ४२ तें चक्र द्विदल आहे. तें हंसांचें केवळ मंदिरच आहे. तेथें जाऊन पोंचावयास फारच मोठें योगबल लागतें. ४३ हें स्थान मिळविण्यासाठीं योगी महा हठी झाले. त्यांनीं दीर्घ प्रयत्नानें अतिशय अभ्यास जरी केला तरी त्यांना तें स्थल प्राप्त होत नाहीं. ४४ हें माझें स्थान प्राप्त होण्यासाठीं अति गुह्य अनुष्ठान सांगितलें आहे. सोहं-हंसाचें साधन जो सावधान चित्तानें साधितो, ४५ तोच त्या फलास प्राप्त होतो. प्राणाच्या गमनागमनाबरोबर सोहं व हंसः याचें स्मरण सावधानचित्तानें जो करूं शकतो, त्यालाच तें स्थान प्राप्त होतें. ४६ त्यालाच वायूचा जय करितां येतो. तोच आज्ञाचक्रावर चढतो आणि तेथून पुढील मार्ग अचूक काढितो. ४७ त्या चक्रांत अनेक भोग व समृद्धि हीं फळें प्राप्त होतात. ऋद्धिसिद्धि पुढें येतात. पण सर्वांना मागें लोटून तो आपल्या शुद्ध मार्गानें पुढें जातो. ४८ परंतु जो कोणी या ऋद्धि-सिद्धींना भुलला आणि 'मी शुद्ध झालों' अशी आत्मश्लाघा करूं लागला तो आज्ञाचक्रावरून खालीं घसरला व केलेल्या कष्टाला मुकला, असें समजावें. ४९ ज्याच्या ठिकाणीं पूर्ण वैराग्य असतें तो सिद्धीला कधींच भुलत नाहीं. तर भोग व मान्यता यांना लाथा मारून दूर सारितो व आपल्या मार्गानें माझ्याकडे यावयास निघतो ५० तेव्हां साडेतीन हातांचें हें विचित्र देहरूप अधिष्ठान सोडून भ्रमरगुंफा या नांवाचें कचाट उल्लंघून, सहस्रदळ चक्राचें पाट शोषून, तो शूर योगी माझ्यामध्यें येऊन मिसळतो. ५१ अहोपण, मी या आज्ञाचक्राची स्थिति सांगत असतां माझें मन योगमार्गाकडेच वेधलें व त्याचीच गोडी लागल्यामुळें मी मागच्या कथेचें अनुसंधान विसरलों. श्रोत्यांनीं मला क्षमा करावी. ५२ तुम्ही कदाचित् म्हणाल कीं, प्रवाहांत पडलेला मासा जसा एकाएकीं परत फिरत नाहीं, त्याप्रमाणेंच ग्रंथनिरूपण करितेवेळीं तुझी स्थिति होते; पण व्यर्थ बडबड कशाला करितोस! ५३ तर चुकलेल्या बालकाला आई जशी शिकविते, त्याप्रमाणें तुमचें वचन माझें हित प्रकट करितें. ५४ चक्रांचें निरूपण करीत असतां माझें मन योगारूढ झालें व तें मागील कथानुसंधान विसरून शेवटपर्यंत निघून गेलें. ५५ हें ऐकून श्रोते हंसले व म्हणाले कीं, याचा कर्ता नाहींस, हे आम्हांला कळून चुकलें आहे, तरी

कर्ता नव्हसी येथें । हें कळोनि गेलें आमुतें । नको परिहारातें उपपादूं ॥ ५६ ॥ आलोडितां ग्रंथकोडी । न कळे योगज्ञानाची गोडी । ते तुवां विशद केली फुडी । निजपरवडीविभागें ॥ ५७ ॥ तुझेनि मुखें कृष्णनाथें । श्रीभागवत जें कठिण होतें । तें अर्थविलें यथार्थें । सत्य आमुतें मानलें ॥ ५८ ॥ हा बारावा अध्यावो । अतिगूढ बोलिला देवाधिदेवो । तेथींचाही त्वां अभिप्रावो । विशद पहावो विवरिला ॥ ५९ ॥ ऐसा संतीं करोनि आदरू । निर्भय दिधला नाभिकारू । एका जनार्दनीं हर्षनिर्भरू । केला नमस्कारू संतांसी ॥ ३६० ॥ 'वैखरी' मात्रा स्वर वर्ण । या पदांचें झालें व्याख्यान । तेंचि दृष्टांतें श्रीकृष्ण । उद्धवासी जाण सांगतू ॥ ६१ ॥ सूक्ष्म जीवशिवांचें मूळ । तोचि वाग्द्वारा झाला स्थूळ । येचि अर्थीं अति विवळ । करूनि प्रांजळ सांगत ॥ ६२ ॥

यथाऽनलः खेऽनिलबंधुरूष्मा बलेन दारुण्यधिमथ्यमानः ।
अणुः प्रजातो हविषा समिध्यते तथैव मे व्यक्तिरियं हि वाणी ॥ १८ ॥

अव्यक्तरूपें उष्मा गगनीं । व्यापकपणे असे वन्ही । तो अरणीमाजीं मथितां मंथनीं । अतिसूक्ष्मपणीं प्रकटला ॥ ६३ ॥ अनळा अनिळ निजसखा । कोमळ तूळें फुंकितां देखा । दिसे लखलखित नेटका । ज्वाळा साजुका कोंवळिया ॥ ६४ ॥ तेथ पावला दशा मध्यम । मग हवनद्रव्यें करितां होम । तेणें थोरावला निरुपम । वाढला व्योमचुंबित ॥ ६५ ॥ तसा सूक्ष्म नाद शिवसंयोगें । प्राणसंगमें लागवेगें । षट्चक्रादिप्रयोगें । वैखरीयोगें अभिव्यक्त ॥ ६६ ॥ मरा हे ऐकतां गोठी । ते वाचा सर्वांशें वाटे खोटी । तेंचि अक्षरें केल्या उफराटीं । रामनामें गोमटी निववी वाचा ॥ ६७ ॥ करितां सुष्ठु दुष्टु उच्चार । वर्ण

आतां उगाच समाधान करीत बसूं नकोस. ५६ कोट्यवधि ग्रंथांचा जरी अभ्यास केला तरी योग-यागाची गोडी कळत नाहीं. ती तूं आपल्या चातुर्यानें स्पष्ट करून सांगितलीस. ५७ श्रीकृष्णनाथानें अतिशय कठिण असलेलें भागवत तुझ्या तोंडून व्याख्यान करवून अगदीं सोपें करून दिलें. हें आम्हांला खरोखर पटलें. ५८ हा बारावा अध्याय अतिशय गूढ आहे, असें देवाधिदेव श्रीकृष्णानें सांगितलें होतें. त्याचा अभिप्राय तूं अगदीं स्पष्ट करून सांगितलास. ५९ संत मंडळींनीं असा आदर करून अभय दिलें. तेव्हां एकनाथजनार्दनानें संतांना नमस्कार केला. 'वैखरी-मात्रा-स्वर-वर्ण' या पदांचें जें व्याख्यान झालें तेंच श्रीकृष्ण दृष्टान्तानें स्पष्ट करून उद्धवाला सांगत आहे. ६१ जीव-शिवांचें सूक्ष्म मूळ असा तो भगवानूच वाग्द्वारां स्थूल झाला. भगवान् आतां हाच अर्थ अतिशय सुलभ करून स्पष्टपणें सांगतात. ३६२.

—अव्यक्त असलेल्या आत्म्याची सूक्ष्म, मध्यम या क्रमानें अभिव्यक्ति होते, यांविषयीं दृष्टान्त—

यथा अनलः खे ऊष्मा–ज्याप्रमाणें अग्नि आकाशांत अव्यक्त ऊष्मरूपानें असतो, दारुणि बलेन अधिमथ्यमानः अनिलबन्धुः सन् अणुः–काष्ठामध्यें बलानें अधिक मंथन केला जाणारा तो वायु ज्याचा साह्यकर्ता आहे असा होत्साता सूक्ष्म विस्फुलिंगादिरूप होतो, प्रजातः हविषा समिध्यते-पुढें इंधनाच्या साहाय्यानें अधिक व्यक्त झालेला तो घृतादि हवींनीं प्रदीप्त होतो, तथा एव इयं वाणी हि मे व्यक्तिः-तशीच ही वाणी माझी अभिव्यक्ति आहे. १८.

उष्णता आकाशांत अव्यक्तरूपानें रहाते. तोच व्यापक अग्नि आहे. अरणीचें मंथन केलें असतां तोच अग्नि सूक्ष्म ठिणगीरूपानें प्रकट होतो. ६३ वायु अग्नीचा स्वाभाविक मित्र आहे, त्यामुळें त्या ठिणगीजवळ थोडासा कापूस धरून फुंकर घालितांच त्याची बारीक ज्वाला लखलखीत पेटलेली दिसते. ६४ तेथें तो मध्यम दशेला प्राप्त होतो. त्यांत घृतादि हवनीय द्रव्याचा होम केला असतां तो अग्नि अत्यंत प्रदीप्त होतो आणि त्याच्या ज्वाला आकाशाला स्पर्श करूं लागतात. ६५ त्याप्रमाणें सूक्ष्म नाद शिवाच्या संयोगानें व प्राणाच्या समागमानें त्वरेनें षट्चक्रादिकांच्या संबंधानें वैखरीनें व्यक्त होतो. ६६ 'मरा' हा शब्द ऐकतांच तो सर्वथा अभद्र वाटतो; पण तींच अक्षरें उलट केलीं असतां 'रामनामानें' तीच सुंदर वाणी शांत करिते. ६७ अर्थात् चांगला किंवा वाईट

नव्हती क्षर अक्षर । यालागीं नांव तें अक्षर । यापरी पवित्र ते वाणी ॥ ६८ ॥ जैशी वाचेची अभिव्यक्ती । तैशीच इतर इंद्रियप्रवृत्ती । संक्षेपें तेही स्थिती । उद्धवाप्रती सांगतू ॥ ६९ ॥

एवं गदिः कर्मगतिर्विसर्गो घ्राणो रसो दृक् स्पर्शः श्रुतिश्च ।
सङ्कल्पविज्ञानमथाभिमानः सूत्रं रजःसत्त्वतमोविकारः ॥ १९ ॥

जैसी वाचेची व्युत्पत्ती । तैशीच कर्मेंद्रियांची प्रवृत्ती । चरणांच्या ठायीं गती । ग्रहणशक्ती हस्तांची ॥ ३७० ॥ विसर्ग जाण वायूचा । सुखोद्रेक तो लिंगाचा । कर्मेंद्रियीं पांचवी वाचा । विस्तारू तिचा सांगितला ॥ ७१ ॥ तैशींच जाण ज्ञानकरणें । दृष्टी उठी देखणेपणें । रसना रसातें चाखों जाणे । श्रवण श्रवणें अधिकारू ॥ ७२ ॥ शीत उष्ण मृदु कठिण । हें त्वगिंद्रियाचें लक्षण । सुगंध दुर्गंध जाणतेपण । घ्राण विचक्षण ते कर्मी ॥ ७३ ॥ संकल्प विकल्प मनाचे । निश्चयो कर्म बुद्धीचें । चिंतन जाण चित्ताचें । अहंकाराचें मीपण ॥ ७४ ॥ सूत्र तंव प्रधानाचें । विकार रजतमसत्वांचे । संक्षेपें विवरण तिहींचें । ऐक साचें सांगेन ॥ ७५ ॥ आधिदैव आधिभौत । ज्यासी आध्यात्म म्हणत । वाढला जो प्रपंचू येथ । ईश्वराचें अभिव्यक्त स्वरूप जाण ॥ ७६ ॥ जगाचें मूळकारण । अंगें ईश्वरचि आपण ॥ त्या कारणाहूनि कार्य भिन्न । नव्हे जाण सर्वथा ॥ ७७ ॥ हो का घृताची एकेकाळीं । थिजोनि झाली पुतळी । ते घृताहोनि वेगळी । नाहीं देखिली प्रत्यक्ष ॥ ७८ ॥ काष्ठाचा घोडा केला । अंगें ठाणें अति मिरवला । तो काष्ठपणा नाहीं मुकला । सर्वांगें शोभला काष्ठत्वें ॥ ७९ ॥ त्याचे पाहतां वेगळाले अवयव । खूर

उच्चार करितांना वर्ण शुभाशुभ होत नाहींत. म्हणून त्यांना अक्षर असें बोलतात. अशी ती वाणी पवित्र आहे. ६८ जशी वागिंद्रियाची अभिव्यक्ति होते, तशीच इतर इंद्रियांचीहि प्रवृत्ति होते. त्यांचीहि स्थिति संक्षेपानें भगवान् उद्धवाला सांगतात. ३६९.

—या उक्त वाग्वृत्तीचा उपसंहार करणारे भगवान् वाणीच्याच न्यायाचा इतर इंद्रियवृत्तींमध्यें अतिदेश करितात—

एवं गदिः—याप्रमाणें भाषण ही माझी व्यक्ति आहे. (हा वाग्वृत्तीचा उपसंहार झाला. आतां तिचाच इतर इंद्रियांमध्यें अतिदेश—) कर्म गतिः विसर्गः—कर्म ही हातांची वृत्ति, गति ही पायांची वृत्ति, त्याग, पायु व उपस्थ यांची वृत्ति (या कर्मेंद्रियांच्या वृत्ति), घ्राणः—वास घेणें, रसः—रसास्वाद घेणें, दृक्—रूप पहाणें, स्पर्शः—स्पर्श करणें, श्रुतिः च—आणि शब्द श्रवण करणें (या ज्ञानेंद्रियांच्या वृत्ति), संकल्पविज्ञानं—मनाचा संकल्प, बुद्धि व चित्त यांचें विज्ञान, अथ अभिमानः—आणि अहंकाराचा अभिमान या अन्तःकरणाच्या वृत्ति, सूत्रं—सूत्र, ही प्रधानाची वृत्ति, रजःसत्त्वतमोविकारः—रजोगुण, सत्त्वगुण व तमोगुण यांचा आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक असा त्रिविध प्रपंचरूप विकार [ही सर्व माझी अभिव्यक्ति आहे, असा पूर्वीच्या अभिव्यक्ति शब्दांशीं त्याचा अन्वय] १९.

वाणीच्या उत्पत्तीप्रमाणेंच कर्मेंद्रियांची प्रवृत्ति होते. पायांत गति आहे व हातांना ग्रहण करण्याची शक्ति आहे. ३७० कर्मेंद्रियांतील पांचवी जी वाचा तिचा विस्तार करून सांगितला. ७१ तशींच ज्ञानेंद्रियें आहेत, असें समज. दृष्टि पहाण्याच्या शक्तीनें उठली, रसना रसाचा स्वाद जाणते. श्रवण ऐकण्याचें अधिकारी झालें. ७२ शीत-उष्ण, मृदु-कठिण, हें स्पर्शेंद्रियाचें लक्षण झालें. सुवास व दुर्गंध जाणण्याच्या कामीं घ्राण चतुर झालें. ७३ संकल्प-विकल्प हे मनाचे धर्म झाले. निश्चय हें बुद्धीचें कर्म, चिंतन हें चित्ताचें आणि 'मीपण' हें अहंकाराचें कर्म झालें. ७४ रजोगुण, तमोगुण व सत्त्वगुण या प्रधानाच्या तीन गुणांचा विकार असें जें सूत्र त्यांचें विवरण करून थोडक्यांत सांगतों, तें ऐक. ७५ आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक यांनीं हा सर्व प्रपंच वाढला आहे. हेंच ईश्वराचें अभिव्यक्त स्वरूप आहे, असें जाण. ७६ जगाचें मूळ कारण स्वतः ईश्वरच आहे. त्या कारणाहून म्हणजे ईश्वराहून कार्य म्हणजे हें जगत् सर्वथा भिन्न नाहीं. ७७ तूप थिजून त्याची जर कधीं पुतळी केली तर ती कांहीं त्या तुपाहून भिन्न नसते. ७८ लांकडाचा घोडा बनविला व घोड्याच्या शरीराकारानें मोठ्या डौलांत मिरविला तरी तो आपल्या काष्ठत्वाला कांहीं मुकत नाहीं, तर सर्वांगीं काष्ठत्वानें शोभतो. ७९ त्याचे खूर, खांदे इत्यादि सर्व

खाद् काष्ठचि सर्व । तेवीं महाभूतें गुणप्रभव । स्वरूप सावेव शिवाचें ॥ ३८० ॥ सुवर्णाचें झालें लेणें । तें जेवीं मिरवे सोनेपणें । तेवीं महाभूतें विषयकरणें । अभिन्नपणें शिवरूप ॥ ८१ ॥ फडा पुच्छ वांकुडा बाग । येणें आकारें म्हणती नाग । तो नाग नव्हे सोनेंचि चांग । तेवीं हें जग मद्रूप ॥ ८२ ॥ प्रपंच ईश्वरासी अभिन्न । येचि अर्थीं श्रीनारायण । उद्धवासी सांगे आपण । अभिन्नपणें जीवशिवां ॥ ८३ ॥

अयं हि जीवस्त्रिवृदब्जयोनिरव्यक्त एको वयसा स आद्यः ।
विश्लिष्टशक्तिर्बहुधेव भाति बीजानि योनिं प्रतिपद्य यद्वत् ॥ २० ॥

जीवाचा जीवू आपण । यालागीं बोलिजे शिवपण । जीवशिवरूपें हा भिन्न । जीवत्व जाण या हेतू ॥ ८४ ॥ सागरु आपुल्या अंगावरी । वर्तुळ आवर्त करीं धरी । तेवीं लोकपद्मातें श्रीहरी । करीं धरी निजनाभीं ॥ ८५ ॥ 'त्रिवृदब्ज' म्हणिजे यापरी । त्या नाभिकमळामाझारीं । स्वलीला त्रैलोक्यातें धरी । पद्मनाभ श्रीहरी या हेतू ॥ ८६ ॥ सुवर्णाच्या सिंहासनीं । सुवर्णमूर्ति बैसवूनी । पूजिजे सुवर्ण-सुमनीं । एकपणें तीन्ही भासती ॥ ८७ ॥ तेवीं नाभिपद्मीं त्रैलोक्य धरितां । तिहींतें भासवी अभिन्नता । यालागीं पद्मनाभ तत्त्वतां । आलें वाक्पथा श्रुतीचिया ॥ ८८ ॥ द्रुति मार्दवें पिंवळी । एकली भासे चांपेकळी । तेचि विकासे जेवीं नाना दळीं । तेवीं मी वनमाळी लोकत्वें ॥ ८९ ॥ हें नसतां कार्यकारण । यापूर्वीं मी अव्यक्त जाण । जो मी प्रमाणांचाही प्रमाण । भेदें जेथ आण वाहिली ॥ ३९० ॥ हेतु मातु

निरनिराळे अवयव काष्ठच असतात. त्याप्रमाणें पंचमहाभूतें त्रिगुणापासून उत्पन्न झालेलीं आहेत. त्यामुळें तीं मूर्तिमंत ईश्वररूपच आहेत. सोन्याचा अलंकार जरी केला तरी तो सुवर्णत्वानेंच मिरवितो. त्याप्रमाणें पंचमहाभूतें, विषय आणि इंद्रियें हीं सर्व एक शिवरूप असतात. सोन्याचा नाग केला तर त्याची फडा, शेपटी, अंगाचा वांकडा बांक, या सर्व आकारांवरून जरी त्याला नाग म्हटलें तरी तो वास्तविक नाग नसून शुद्ध सोनेंच असतें.८१ त्याप्रमाणें हें जगत् मद्रूप आहे. प्रपंच ईश्वराहून भिन्न नाहीं. याच अर्थीं नारायण उद्धवाला जीव आणि शिव यांचें अभिन्नत्व सांगत आहे. ३८३.

—असें असल्यामुळें ईश्वरापासून झालेला हा अभिव्यक्तिरूप प्रपंच ईश्वराहून भिन्न नाहीं, असें आतां सांगतात—

अयं जीवः अव्यक्तः एकः वयसा विश्लिष्टशक्तिः बहुधा इव यः आभाति-हा ईश्वर पूर्वीं अव्यक्त व एकच असून कालवशात् ज्याच्या वागादि इंद्रियरूप भिन्नभिन्न शक्ति आहेत किंवा ज्यानें मायाशक्तीचा विशेषेंकरून आश्रय केलेला आहे असा होत्साता जो अनेक प्रकारचा झाल्याप्रमाणें भासतो, सः एव आद्यः त्रिवृद् अब्जयोनिः–तोच आद्य त्रिगुणाचा आश्रय केलेला या लोककमलाचा कारणभूत आहे. [आतां एकाचेंच अनेक प्रकारें भान होतें याविषयीं दृष्टान्त-] योनिं प्रतिपद्य बीजानि यद्वत्–क्षेत्राला प्राप्त होऊन बीजें जशीं अनेकाकार होतात, त्याप्रमाणें हा एकच अनेकाकार भासतो. २०.

जीवाचा जीव आपणच आहे. म्हणून त्याला शिव असें म्हणतात. जीवत्व या निमित्तानें तो जीव आणि शिव या रूपानें भिन्न आहे. ८४ समुद्र आपल्याच पृष्ठभागावर भोंवरे, लाटा, इत्यादि उत्पन्न करितो. त्याप्रमाणें श्रीहरि आपल्या नाभींत ब्रह्मांडकमळ उत्पन्न करून तें धारण करितो, ८५ म्हणून त्याला त्रिवृदब्ज म्ह० तीन लोकांना धारण करणारा, असें म्हणतात. त्या नाभिकमलामध्यें आपल्या लीलेनें त्रैलोक्याला धारण करितो म्हणून त्याला पद्म-नाभ म्हटलें आहे. ८६ सोन्याच्या सिंहासनावर, सोन्याची मूर्ति बसवून सोन्याच्याच फुलांनीं तिची पूजा केली असतां ती तीन्हीं जशीं सुवर्णरूपानें एकच भासतात, ८७ त्याप्रमाणें श्रीहरीनें नाभिकमलांत त्रैलोक्य धारण केलें असतां त्यांत अभिन्नत्वच भासतें, यास्तव श्रुतीच्या मुखांतून 'पद्मनाभ' हाच शब्द निघाला आहे. ८८ सुवास व कोमलत्व यांनीं युक्त असलेली पिवळी चाफेकळी एकच असते. परंतु तिचा विकास झाला म्हणजे अनेक पाकळ्या प्रफुल्लित होऊन पृथक् दिसतात. त्याप्रमाणें तत्त्वतः एकच असलेला मी परमात्मा अनेक लोकांच्या रूपानें विकसित झालों आहें. ८९ हें कार्य-कारण जेव्हां नसतें तेव्हां मी अव्यक्तच असतों. मी प्रमाणांचाहि प्रमाण आहें. माझ्या

दृष्टांत । रिघो न शके ज्या गांवांत । अपार अनादि अनंत । आद्य अव्यक्त मी ऐसा ॥ ९१ ॥ एवं केवळ जें अभेद । तेथें कैंचे त्रिविध भेद । जेथ लाजोनि परतले वेद । स्वरूप शुद्ध तें माझें ॥ ९२ ॥ तो न मेळवितां साह्यमेळ । स्वलीलाक्षोभें क्षोभक काळ । स्वशक्तीनें झालों सबळ । भक्तिवंबाळ चेतविला ॥९३॥ ते निजशक्तीचे विभाग । म्यांचि विभागिले चांग । त्या विभागाचे भाग । ऐक साङ्ग सांगेन ॥९४॥ गुणशक्ति देवताशक्ती । मनःशक्ति इंद्रियशक्ती । महाभूतांची भूतशक्ती । एथ क्रियाशक्ति मुख्यत्वें ॥९५॥ जीवापासाव अदृष्टशक्ती । झाली अनिवार त्रिजगतीं । हरिहरां नावरे निश्चितीं । अदृष्टशक्ती अनिवार ॥ ९६ ॥ जे अदृष्टशक्तीनें जीवातें । बांधोनि केलें आपैतें । तिशी आवरावया मातें । सामर्थ्य येथें आथिना ॥ ९७ ॥ जेवीं कां राजाज्ञा जाण । राजा प्रतिपाळी आपण । तेवीं अदृष्टशक्तिउल्लंघन । मी सर्वथा जाण करीना ॥ ९८ ॥ जीभ कापूनि देवासी वाहती । तैसें नासिक न छेदिती । तेवीं छेदी कर्मस्थिती । परी अदृष्टगती छेदींना ॥ ९९ ॥ अथवा विशेषेंसीं निश्चितीं । मीं माया आलिंगिली निजशक्ती । तो मी एकुचि त्रिजगतीं । बहुधाव्यक्तीं आभासें ॥ ४०० ॥ माझिया साक्षात्कारा आला । जो जीवन्मुक्तत्व पावला । तोही अदृष्टें बांधला । वर्ते उगला देहगेहीं ॥ १ ॥ जनकू राजपदीं नांदे । शुक नागवा प्रारब्धें । कळी लाविजे नारदें । अदृष्ट छंदें विनोदी ॥ २ ॥ वसिष्ठ पुरोहितत्व करी । भीष्म पहुडे शरपंजरीं । याज्ञवल्क्या दोनी नारी । अदृष्टाकरीं वर्तत ॥ ३ ॥ यापरी गा अदृष्टशक्ती । अनिवार वाढली त्रिजगतीं । त्या जीव बांधले अदृष्टगतीं । जेवीं गारोडियाहातीं वानर ॥ ४ ॥ त्या जीवादृष्टें बहुधा व्यक्ती । मी एक भासें त्रिजगतीं । 'विश्वतश्चक्षु' या श्रुतीं । बहुधामूर्तीं मी एक ॥ ५ ॥

स्वरूपांत शपथेलाहि भेद सांपडणार नाहीं. ९० हेतु, शब्द व दृष्टान्त हे ज्या प्रदेशीं प्रवेशहि करूं शकत नाहींत, असा मी अपार, अनादि, अनंत, आद्य व अव्यक्त आहें. ९१ असें जें केवळ भेदरहितरूप तेथें त्रिविध भेद कोठचे ! ज्याला लाजून वेदहि परत फिरले तें माझें शुद्ध स्वरूप आहे. ९२ क्षुब्ध होणारा काळहि मीच आहें. मी कोणाच्याहि साह्यावांचून आपल्याच लीलेनें क्षोभ करणारा काळ आहें. मी आपल्या शक्तीनेंच प्रबळ झालों आहें आणि माझी शक्ति सर्वत्र पसरून दिली आहे. ९३ या माझ्या शक्तीचें मीच व्यवस्थित विभाग केले आहेत. त्या विभागांचे सविस्तर भेद सांगतों, ते ऐक. ९४ गुणशक्ति, देवताशक्ति, मनःशक्ति, इंद्रियशक्ति, महाभूतांची भूतशक्ति या सर्वांत क्रियाशक्ति मुख्य आहे. त्रिभुवनांत ९५ जीवापासून झालेली प्रारब्धाची शक्ति इतकी वाढली आहे कीं, ती हरि-हरांसहि आवरत नाहीं. अशी ती अदृष्टशक्ति अनिवार आहे. ९६ ज्या प्रारब्धशक्तीनें जीवाला बांधून आपल्या स्वाधीन करून ठेविलें आहे, तिला आवरण्यास मी स्वतःहि समर्थ नाहीं. ९७ ज्याप्रमाणें राजाहि राजाज्ञा पाळितो, त्याप्रमाणें मी प्रारब्धाचें उल्लंघन सर्वथा करीत नाहीं. ९८ जीभ कापून देवाला वहातात, पण नाक कापून कोणी वहात नाहींत. त्याप्रमाणें मी कर्मस्थिति नाहींशी करितों. पण मला प्रारब्धगति मात्र तोडितां येत नाहीं. ९९ किंवा माझीच शक्ति जी माया तिलाच मी विशेषतः चिकटल्यामुळें मी तिन्हीं लोकांत एकच असलेला अनेकरूपानें भासतों. ४०० ज्याला माझा साक्षात्कार होतो, तो तत्काल जीन्मुक्तच होतो. पण तोहि प्रारब्धानें बांधलेला असल्यामुळें देहरूपी घरांत मुकाट्यानें रहातो. १ प्रारब्धामुळेंच जीवन्मुक्त जनकानें राज्यपद भोगिलें, शुकाचार्यहि प्रारब्धामुळें नग्न रहात होता आणि नारदहि प्रारब्धबलानेंच विनोदी व कळी लावणारा झाला. २ या प्रारब्धानुसार वसिष्ठ महर्षीनें पुरोहितपणा केला. भीष्माचार्य शरपंजरीं पडले आणि याज्ञवल्क्य ऋषींच्या दोन भार्या होत्या व तोहि आपल्या प्रारब्धकर्माप्रमाणेंच वागत होता. ३ याप्रमाणें ही प्रारब्धशक्ति त्रिभुवनांत अनिवार वाढली आणि ज्याप्रमाणें, गारुड्याच्या हातांतील माकड जसें नाचवावें तसें नाचत असतें, याप्रमाणें हे जीव प्रारब्धशक्तीनें बद्ध झाले आहेत. ४ या त्रिभुवनांत मी एकच असून जीवांच्या प्रारब्धानुसार अनेक भासतों. 'विश्वतश्चक्षुः' या श्रुतींत सांगितल्याप्रमाणें विविध शरीरांत मी एकच असल्याचें सिद्ध होतें. ५ मातीचीं पुष्कळ गोकुळें बांधिलीं आणि त्यांना निरनिराळीं नावें देऊन

मृत्तिकेचीं गोकुळें केलीं । नाना नामाकारें पूजिलीं । परी ते मृत्तिकाची संचली । तेवीं सृष्टी झाली मद्रूपें ॥ ६ ॥ जेवीं एकला आपण । निद्रेसी देतां आलिंगन । स्वप्नीं देखे बहुविध आपण । तेवीं मी जाण विश्वात्मा ॥ ७ ॥ जेवीं सूक्ष्म वटबीज केवळ । त्यासी मीनल्या भूमिजळ । वाढोनियां अतिप्रबळ । वृक्ष विशाळ आभासे ॥ ८ ॥ तेथें नाम रूप पुष्प फळ । तें बीजचि आभासे समूळ । तेवीं जगदाकारें सकळ । भासे केवळ चिदात्मा ॥ ९ ॥ जे कां मूळ बीजाची गोडी । तोचि स्वाद वाढला वाढी । कांडोकांडीं स्वादुपरवडी । अविकार गोडी उंसाची ॥ ४१० ॥ तेवीं मूळीं चिदात्माचि कारण । तेथूनि जें जें तत्त्व झालें जाण । तें तें निखळ चैतन्यघन । जग संपूर्ण चिद्रूप ॥ ११ ॥ ऊंस सर्वांगें बीज सकळ । बीजरूपें ऊंस सफळ। तेवीं जगाचें चिन्मात्र मूळ । जाण सकळ तें चिद्रूप ॥ १२ ॥ बीज ऊंस दोनी एकरूप । तैसा प्रपंच जाण चित्स्वरूप । येचि अर्थीं अतिसाक्षेप । कृपापूर्वक सांगत ॥ १३ ॥

यस्मिन्निदं प्रोतमशेषमोतं पटो यथा तन्तुवितानसंस्थः ।
य एष संसारतरुः पुराणः कर्मात्मकः पुण्यफले प्रसूते ॥ २१ ॥

यालागीं संसार जो समस्त । माझ्या ठायीं असे ओतप्रोत । मजवेगळें कांहीं येथ । नाहीं निश्चित अणुमात्र ॥ १४ ॥ येचि अर्थींचा दृष्टान्तू । देवो उद्धवासी सांगतू । जेवीं कापुसाचे सूक्ष्मतंतू । कांतोनि निश्चितू पट्ट केला ॥ १५ ॥ आडवेतिडवे विणले तंतू । त्यासी वस्त्र नाम हें मृषा मातू । तेवीं संसार-

---

त्यांची पूजा केली, तरी त्यांत सर्व मातीच सांठविलेली असते. त्याप्रमाणें ही सगळी सृष्टि मद्रूपानें झाली आहे. ६ एखादा मनुष्य निद्रावश होऊन स्वप्नांत स्वतःचींच अनेकरूपें झालेलीं जशीं पहातो तसाच मी विश्वात्मा एक असून अनेकरूपानें भासतों. ७ ज्याप्रमाणें वडाचें सूक्ष्म बीज जमिनीवर पडून त्याला जल मिळालें कीं, त्या बीजापासून वृक्ष उत्पन्न होतो व तो अत्यंत प्रचंड होऊन त्याचा विस्तार दूरवर फैलावतो, ८ परंतु त्याचें नांव, रूप, फुलें व फळें हीं सर्व एक बीजरूपच असतात, त्याप्रमाणें हा चिदात्मा जगदाकारानें भासतो. ९ मूळ बीजाची जी गोडी तीच ऊंसाच्या वाढ्यांत येते. पण ती प्रत्येक कांड्यांत अधिक अधिक वाढत जाते आणि त्यांत स्वाभाविक असते. ४१० त्याप्रमाणें या सर्वांचें मूळकारण चिदात्माच आहे. त्यापासून जें जें तत्त्व उत्पन्न झालें तें सर्व शुद्ध चैतन्यघनच आहे. त्यायोगें हें जगत् पूर्ण चिद्रूपानें भरलें आहे. ११ उंसाच्या सर्व अंगांत बीज भरलेलें असतें म्हणून सगळा ऊंस बीजरूपानें असतो. त्याप्रमाणेंच या जगाचें मूळ चिन्मात्र असून सर्व जगत् चिद्रूपच आहे. १२ बीज आणि ऊंस हीं दोन्हीं जशीं एकरूप असतात, त्याचप्रमाणें प्रपंच चित्स्वरूप आहे. याविषयींच भगवान् कृपापूर्वक आणखी उपपत्ति सांगतात. ४१३.

——याप्रमाणें हें जगत् त्याच्या मायेचें कार्य असल्यामुळें त्याच्याच आश्रयानें रहातें, म्हणून तें त्याहून पृथक् नाहीं, असें सदृष्टान्त सांगतात——

यथा तन्तुवितानसंस्थः पटः तथा यस्मिन् इदं अशेषं ओतं प्रोतं च--ज्याप्रमाणें तंतूंच्या विस्तारामध्येंच ज्याची स्थिति आहे असा पट तंतूमध्यें ओतप्रोत असतो म्ह० उभ्या तंतूंत आडवे तंतु जसे विणलेले असतात त्याप्रमाणें ज्याच्यामध्यें हें सर्व जगत् ओत-प्रोत असतें. (अशाप्रकारचें हें समष्टि-व्यष्टिरूप जगत् अविद्येनें आरोपिलेलें, वृक्षरूप म्ह० जीवाच्या कर्तृत्वादि संसाराचें कारण आहे. म्हणून त्या त्या विवेकज्ञानानें कर्मादि सर्व त्याज्य आहे, असें पूर्वी सांगितलें, अशा आशयानें भगवान् या पुढील साडेतीन श्लोकांनीं म्हणतात--) यः एषः पुराणः कर्मात्मकः संसारतरुः पुण्यफले प्रसूते-- जो हा अनादि प्रवृत्तिस्वभाव संसारवृक्ष भोग व मोक्ष किंवा कर्म व त्याचें फळ यांस प्रसवतो. २१.

यास्तव हा सर्व संसार मजमध्यें ओतप्रोत म्ह० सर्वत्र सारखा भरलेला आहे. माझ्याहून भिन्न असें या जगांत अणुभरहि कांहीं नाहीं. १४ याविषयींच भगवान् उद्धवाला दृष्टान्त सांगतात. ज्याप्रमाणें कापसाचें बारीक सूत काढून त्याचें वस्त्र विणिलें, १५ म्हणजे त्यांत कापसाचे तंतूच वास्तविक आडवे, उभे विणलेले असतात; पण

शब्द हा व्यर्थू । स्फुरें भगवंतू मी तद्रूपें ॥ १६ ॥ पाहतां सूतचि दिसे उघडें । त्याचें नाम म्हणती लुगडें । प्रत्यक्ष चैतन्य स्फुरतां पुढें । त्यासी संसारू वेडे म्हणताती ॥ १७ ॥ सुतावेगळें वस्त्र न दिसे । मजवेगळा प्रपंचु नसे । उद्धवा अप्राप्ताचें भाग्य कैसें । मीचि नसें म्हणताती ॥ १८ ॥ यापरी मी सर्वगत । विश्वात्मा विश्वभरित । वृक्षदृष्टांतें प्रस्तुत । तुज म्यां येथ सांगीतलें ॥ १९ ॥ मज देखणा ज्याचा निर्धारू । त्यासी मी केवळ सर्वेश्वरू । मज अप्राप्त जो नरू । त्यासी संसारू आभासे ॥ ४२० ॥ जो सर्वात्मा सर्वेश्वरू । भ्रांतासी भासे भवतरुवरू । त्या भवतरूचा विस्तारू । स्वयें श्रीधरू सांगत ॥२१॥ भ्रांतीस्तव भवतरुवरू । कर्माकर्मजळें वाढला थोरू । जीर्ण जुनाट अपरंपारू । ओतंबरू फळपुष्पीं ॥ २२ ॥ त्याचें कोण बीज कोण मूळ । कोण रस कोण फळ । जेणें भ्रमले जीव सकळ । तें मी समूळ सांगेन ॥ २३ ॥

> द्वे अस्य बीजे शतमूलस्त्रिनालः पञ्चस्कन्धः पञ्चरसप्रसूतिः ।
> दशैकशाखो द्विसुपर्णनीडस्त्रिवल्कलो द्विफलोऽर्कं प्रविष्टः ॥ २२ ॥

भ्रमभूमीमाजिवडें । पापपुण्यजोडपाडें । बीज पडतांचि वृक्ष विरूढे । अग्रीं वाढे कल्पना ॥ २४ ॥ पान फूल न दिसे फळ । वेलाअंगीं देखा सरळ । तेणेंचि वेला वाढ प्रबळ । संसार सबळ कल्पनाग्रें ॥ २५ ॥ कर्माकर्मप्रवाहजळें । भरलें अविद्येचें आळें । अनंत वासना तेचि मूळें । वृक्ष तेणें बळें ढळेना

आम्ही त्याला वस्त्र असें मिथ्याच नांव देतों; त्याचप्रमाणें 'संसार' हा शब्द व्यर्थ आहे. मी भगवान्च वास्तविक संसाररूपानें स्फुरण पावतों. १६ सूत विणलेलें प्रत्यक्ष पहात असूनहि त्याला 'लुगडें' म्हणतात त्याप्रमाणें मूर्खलोक चैतन्य प्रत्यक्ष स्फुरत असलेलें पाहूनहि त्याला 'संसार' म्हणतात. १७ सुतावांचून जसें वस्त्र नाहीं, तसा माझ्यावांचून संसार नाहीं. पण हे उद्धवा! संसारांत गुरफटलेल्या लोकांचें भाग्य कसें असतें पहा! ते 'मीच नाहीं' असें मानितात. १८ याप्रमाणें मी सर्वव्यापी, विश्वात्मा, विश्वंभर आहें, हें तुला वृक्षाचा दृष्टान्त देऊन सांगितलें. १९ मला पहाणारा जो माझा भक्त त्याला मी सर्वेश्वर आहें, पण मला न जाणणारा जो असतो, त्याला मात्र हा संसार भासतो. १९ जो सर्वांचा आत्मा, सर्वांचा स्वामी, तो भ्रांत लोकांना संसारवृक्ष भासतो. त्या संसारवृक्षाचा विस्तार स्वतः भगवान्च सांगतात. २१ भ्रांतीनें उद्भवलेला हा संसारवृक्ष कर्म-अकर्मरूपी जलानें फार मोठा वाढला. तो अनंतकालापासूनचा जीर्ण व जुनाट आहे. फळें व फुलें यांनीं ओथंबला आहे. २२ त्याचें बीज कोठचें, मूळ कोठचें व ज्याच्यायोगें सर्व जीव भ्रमांत पडतात असा त्याचा रस व फळें कोठचीं, तें मी तुला सविस्तर सांगतों. ४२३.

—वृक्षरूपकाचा विस्तार करितात—

अस्य द्वे बीजे—या संसारवृक्षाचीं पुण्य व पाप हीं दोन बीजें आहेत, **शतमूलः**—असंख्य वासना हींच याचीं मुळें आहेत, **त्रिनालः**—सत्त्व-रज-तम हे तीन गुण हींच याची कांडें आहेत. **पंचस्कन्धः**—आकाशादि पंचभूतें याच याच्या शाखा आहेत. **पंचरसप्रसूतिः**—शब्दादि पांच विषय याच्यापासून उत्पन्न होतात. **दशैकशाखः**—पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें व मन अशीं अकरा इंद्रियें या याच्या उपशाखा आहेत. **द्विसुपर्णनीडः**—जीव व परमात्मा या दोन पक्ष्यांनीं यावर घरटें केलें आहे. **त्रिवल्कलः**—वात, पित्त व कफ याच याच्या तीन त्वचा आहेत. **द्विफलः**—सुख व दुःख हीं याचीं दोन फलें आहेत. **अर्कं प्रविष्टः**—आणि हा अशा स्वरूपाचा संसारवृक्ष सूर्यमंडळापर्यंत पसरलेला आहे. [कारण सूर्यमंडलाचा भेद करून गेलेल्या जीवाचा अभाव होतो.]

भ्रमरूपी जमिनींत पाप-पुण्याचें जुळें बीज पडतांच हा वृक्ष उगवतो व त्याच्या शिखरावर कल्पना वाढते. २४ त्याचीं पानें, फुलें, फळें कांहीं दिसत नाहींत. वेल मात्र सरळ वाढत असते व त्या वाढीनेंच तो वृक्ष प्रबल होतो आणि कल्पनांच्या शिखरावर संसार जोरानें विस्तारितो. २५ कर्मअकर्मरूपी जलाच्या प्रवाहानें अविद्यारूपी अळें भरतें. अनंत वासना हींच त्या वृक्षाचीं मुळें. त्यांच्या आधारानेंच हा वृक्ष केव्हांहि डळमळत

॥ २६ ॥ सूक्ष्म वासना कल्पकोडी । अधोगती रुतल्या बुडीं । संकल्पविकल्पें चहूंकडीं । पसरल्या बुडीं बुचबुचित ॥ २७ ॥ संचितक्रियमाणा वाफे भारी । सुबुद्ध भरले जळेंकरी । भरिलेच मागुते भरी । प्रवाहो त्यापरी वाहत ॥ २८ ॥ तेणें वृक्ष सबळ भारी । नित्य नूतन वाढी धरी । सगुण गुणाचे वाढीवरी । त्रिगुण अहंकारीं त्रिनाळ ॥ २९ ॥ त्रिगुणगुणांची परवडी । येरांची येरांमाजीं मुरडी । येरयेरांवरी बुडी । मिसळे वाढीं वाढती ॥ ४३० ॥ पंचभूतांच्या खांद्या थोरी । प्रपंच वाढल्या बाहेरी । पसरल्या येरयेरांवरी । मीनल्या परस्परीं वाढती ॥ ३१ ॥ समूळ गर्भ साधूनि रुखा । मनोमय वाढलिया शाखा । अग्रीं दशेंद्रियफांटे देखा । तिच्या झुळका डोलती ॥ ३२ ॥ त्या त्या शाखांमाजीं देखा । दैवतें आलीं वस्तीसुखा । करूनि कर्मांचा आवांका । आपुलाली शाखा ते धरिती ॥ ३३ ॥ दशधा वायूचीं झडाड । तेणें तें डोलत दिसे झाड । त्यामाजीं दों पक्ष्यांचें नीड । अतिगूढ अतर्क्य ॥ ३४ ॥ जेथूनि उपजे निजज्ञान । तेंचि नीड हृदयभुवन । जीवू परमात्मा दोघेजण । अतर्क्य पूर्ण वसताती ॥ ३५ ॥ जीवू जो देहाभिमानी । परमात्मा जो निरभिमानी । इंहीं दोघींजणीं मिळोनि । हृदयभुवनीं नीड केलें ॥ ३६ ॥ जीव संकल्पविकल्पप्राप्ती । परमात्मा निर्विकल्पस्थिती । दोहींची हृदयामाजीं वस्ती । नीड निश्चितीं या हेतू ॥ ३७ ॥ पाहे पां वात पित्त श्लेष्मा । या आंतरत्वचा भवद्रुमा । वल्कलें म्हणावयाचा महिमा । भक्तोत्तमा या हेतू ॥३८॥ गगनाहूनि वाढला वरुता । शून्यासहित लांबला आरुता । सैंघ पसरला सभोंवता । दिशांच्या प्रांता सांडुनी ॥३९॥ एवं विस्तारलेनि विस्तारा । वृक्ष उन्मळोनि मद्भरा । पंचरसांच्या विषयधारा । अतिमधुरा वर्षतू ॥ ४४० ॥ श्रुतिस्मृति हींच पानें । त्यांमाजीं उगवलीं स्वर्गसुमनें । दीक्षितभ्रमर ज्यांकारणें । अतिसत्राणें उडताती ॥ ४१ ॥ त्या वृक्षाचीं जावळीं फळें । सुखदुःखें ॥

नाहीं. २६ कोट्यवधि कल्पांतील सूक्ष्म वासनारूपी मुळ्या खोल जाऊन बुडाशीं रुतून बसतात व संकल्पविकल्परूपानें चोहोंकडे पसरून बुडाशीं त्यांचें जाळें माजून रहातें. २७ संचित्-क्रियमाण कर्मांचे वाफे जलानें आधींच तुडुंब भरलेले असतात. त्यांत दुसरे प्रवाह मिसळून ते वाफे वरच्यावर भरतच असतात. २८ त्यामुळें हा संसारवृक्ष अतिशय जोरानें फोंफावतो. नित्य नव्या वाढीला लागतो. गुणांच्या सगुण वाढीवर अहंकाराचे तीन कोंब फुटतात. त्रिगुणांच्या गुणांचें जाळेंच बनून रहातें. ते एकमेकांत गुंतून भराभर वाढतात व मुरडून पुनः एकमेकांत गुरफटून पुनः वाढूं लागतात. ४३० पंचमहाभूतांच्या मोठ्यामोठ्या डहाळ्या प्रपंचवृक्षाच्याहि बाहेर पसरतात आणि एकमेकांवर चढून वाढीला लागतात. ३१ या संसारवृक्षावर मुळासह मनोमय शाखा वाढल्या आहेत आणि त्यांच्या शिखराला दश-इंद्रियांचे फांटे फुटले आहेत. ते वायूच्या मंद झुळुकेबरोबर हलत असतात. ३२ त्या त्या शाखांमध्यें देवता सुख भोगण्यासाठीं वस्ती करून राहिल्या आहेत. ३३ त्या कर्मांच्या आधारानें आपापल्या शाखेंत बसतात. दहा प्रकारच्या वायूच्या सोसाट्यानें तो वृक्ष डोलत आहेसा भासतो. त्या वृक्षावर दोन पक्ष्यांचें अत्यंत गूढ व अतर्क्य असें घरटें आहे. ३३ जेथून ज्ञान उत्पन्न होतें तें हृदयभुवनच हें घरटें आहे. त्यांत जीव आणि परमात्मा अतर्क्य व पूर्ण स्वरूपानें रहातात. ३४ देहाभिमानी जीव आणि अभिमानरहित परमात्मा या दोघांनीं मिळून हृदयमंदिरांत घरटें केलें. ३५ जीव संकल्प-विकल्पयुक्त आहे व परमात्मा विकल्पशून्य आहे. या दोघांचें वास्तव्य हृदयांत असतें म्हणून त्याला घरटें असें म्हटलें आहे. ३६ वात, पित्त, कफ या संसारवृक्षाच्या आंतल्या साली आहेत. हे भक्तश्रेष्ठ उद्धवा ! त्यांस गौरवानें वल्कलें म्हणण्याचेंहि कारण हेंच आहे. ३७ या वृक्षाची वाढ आकाशाच्याहि वर गेली आहे व शून्याच्याहि खालीं गेली आहे आणि दिशांच्या मर्यादेचें उल्लंघन करून त्याचा विस्तार सभोंवार पसरला आहे. ३८ याप्रमाणें हा वृक्ष अशा विस्तारानें विस्तारिला असतां तो मदरसानें भरून येतो व विषयांच्या अति मधुर पांच रसांचा वर्षाव करितो. ३९ श्रुति व स्मृति हींच त्याचीं पानें आहेत. त्याला स्वर्गरूपी फुलें येतात. त्या पुष्पावर याज्ञिकरूपी भ्रमर मोठ्या त्वरेनें उड्या टाकीत असतात. ४४० या संसारवृक्षाला दोनच जुळीं फळें येतात. सुख व दुःख हींच तीं जुळीं फळें वृक्षाच्या मुळापासून शिखरापर्यंत नेहमीं लोंबत असतात. ४१ जेवढीं सूर्यमंडळें आहेत, तेथपर्यंत या वृक्षाचा विस्तार आहे आणि

दोनीं एके मेळें। शेंडा धरोनि समूळें। दोनींचि फळें पैं त्यासी ॥ ४२ ॥ जितुकीं सूर्यमंडळें भासती। तितुकी जाण याची स्थिती। सुखदुःखफळें तितुक्यांप्रती। कर्मप्राप्ती देतुसे ॥ ४३ ॥ सूर्यमंडळाआरुतें। सांगीतलें भववृक्षातें। चंद्रमंडळादि समस्तें। भवभय तेथें नाहीं न म्हण ॥ ४४ ॥ मी सूर्यमंडळमध्यवर्ती। त्या मजवेगळी जे स्फुरे स्फूर्ती। तेथवरी भवभयाची प्राप्ती। जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४५ ॥ सूर्याचें जें सूर्यमंडळ। तेंही संसारामाजीं केवळ। जो न खाय या वृक्षाचें फळ। तोचि रविमंडळभेदक ॥ ४६ ॥ वृक्षाचीं दोनीं फळें येथें। दोहीं फळांचे दोघे भोक्ते। दोघे संसाराआंतौते। एक तूतें सांगेन ॥ ४७ ॥

अदन्ति चैकं फलमस्य गृध्रा ग्रामेचरा एकमरण्यवासाः।
हंसा य एकं बहुरूपमिज्यैर्मायामयं वेद स वेद वेदम् ॥ २३ ॥

दुःखफळाचे भोक्ते। अत्यंत विषयासक्त जेचि ते। गीध गृहस्थ का जे येथें। अविधीं विषयांतें सेविती ॥ ४८ ॥ ग्राम्य विषयीं अतितत्पर। यालागीं बोलिजे ग्रामचर। ग्राम गीध जैसे घार। तैसे सादर विषयांसी ॥ ४९ ॥ जेवीं कां घार गगना चढे। तेथूनि आमिषा उडी पडे। तेवीं नरदेह पावोनि चोखडे। विषयीं झडपडे झोंबती ॥ ४५० ॥ एवं विषयासक्त जे चित्तें। जे अधोगतीतें पावते। ते दुःखफळाचे भोक्ते। जाण निश्चितें उद्धवा ॥ ५१ ॥ सांडोनियां गार्हस्थ्य। वनवासी वानप्रस्थ। त्यांसचि सुखफळ प्राप्त। जाण निश्चित उद्धवा ॥ ५२ ॥ त्या सुखफळाचे विभाग। ब्रह्मसदनांत इतर स्वर्ग। कर्मे करूनियां साङ्ग। जेथींचा मार्ग चालिजे ॥ ५३ ॥ ब्रह्मचर्यें वेदाध्ययन। गार्हस्थ्यें पूजिते

त्यांतील कर्मप्राप्ति सुखदुःखरूपी फळें देते. ४२ पण ' सूर्यमंडळापर्यंतच हा संसारवृक्ष आहे. ' हें ऐकून तूं चंद्रमंडळादि सर्वांत संसारभय नाहीं, असें म्हणूं नकोस. ४३ उद्धवा! मी सूर्यमंडळाच्या मध्यवर्ती आहे. माझ्यावांचून जेवढी स्फूर्ति स्फुरण पावते तेथपर्यंत संसारभयाची प्राप्ति असते, हें निश्चयानें जाण. ४५ सूर्याचें सूर्यमंडळहि केवळ संसारांतच आहे. जो या वृक्षाचें फळ चाखीत नाहीं तोच सूर्यमंडळाचा भेद करून पलीकडे जातो. ४६ या जगांत या वृक्षाचीं दोन फळें आहेत, त्या दोन फळांचे भोक्तेहि दोघेच आहेत व ते दोघेहि संसारांत असतात, तें तुला आतां सांगतों ऐक ४७.

—पूर्वोक्त फलांचे भोक्ते सांगतात—

गृध्राः ग्रामेचराः अस्य एकं फलं अदन्ति-ग्रामांत रहाणारे सकाम गृहस्थ याचें एक फल खातात म्ह० दुःख भोगितात. (कारण स्वर्गादि सुखाचाहि शेवटीं क्षय होत असल्यामुळें तें दुःखरूपच आहे.) हंसाः अरण्यवासाः एकं अदन्ति-विवेकी अरण्यवासी संन्यासी याचें दुसरें सुख हें फल भोगितात. एकं मायामयं बहुरूपं इज्यैः यः वेदः सः वेदं वेद-एका मायामयच बहुरूप परमात्म्याला म्ह० आपल्या मायाविकारांनीं बहुरूप झालेल्या परमात्म्याला गुरूंच्या द्वारां जो जाणतो, तो वेदाचा तत्त्वार्थ जाणतो. २३.

जे अत्यंत विषयासक्त असतात, तेच दुःखफळाचे भोक्ते आहेत. गृहस्थरूपी गिधाड येथें अविधीनें विषय सेवितात. ४८ ते ग्राम्य विषयांत अत्यंत तत्पर असतात. म्हणून त्यांना ग्रामचर असें म्हणतात. गिधाड किंवा घारी यांच्यासारखे ते विषयावर तुटून पडतात. ४९ घार जशी आकाशांत उंच उडत असते, पण खालीं मांस दिसतांच त्या आमिषावर झडप घालते, त्याप्रमाणें हे गृहस्थ ज्ञानप्राप्तीस योग्य अशा मनुष्यदेहाला प्राप्त होऊनहि झडप घालून विषयांना झोंबत असतात. ४५० ज्यांचें चित्त असें विषयासक्त असतें ते अधोगतीला जातात. तेच दुःखफळाचे भोक्ते होत, हें खात्रीनें जाण. ५१ हे उद्धवा! गृहस्थाश्रम सोडून जे वानप्रस्थाश्रम स्वीकारून वनवासी होतात त्यांसच खरोखर सुख, या फलाची प्राप्ति होते, असें निश्चयानें जाण. ५२ ब्रह्मसदनापर्यंतचे स्वर्ग हे त्या सुखफलाचे विभाग आहेत. सांग कर्मे करून गृहस्थ त्या मार्गानें जाऊं शकतात. ५३ ब्रह्मचर्याश्रमांत वेदाध्ययन

अग्निब्राह्मण । वानप्रस्थाश्रमीं जाण । वन्यफळभोजन वनवासी ।। ५४ ।। येणें क्रमेंचि क्रममुक्तिस्थान । जिहीं ठाकिलें ब्रह्मसदन । सुखफळाचे भोक्ते ते जाण । ब्रह्मभुवननिवासी ।। ५५ ।। इतर स्वर्गीं सुखप्राप्ती । जेथें आहे पुनरावृत्ति । ब्रह्मसदनीं पावल्या वस्ती । त्यांसी क्रमें मुक्ती होईल ।। ५६ ।। मुळींचें पद 'अरण्यवासी '। तेणें द्योतिलें वानप्रस्थासी । तेथ नाहीं घेतला संन्यासी । त्यासी वनवासी म्हणों नये ।। ५७ ।। संन्याशांसी निवासस्थान । वेदीं बोलिलें नाहीं जाण । तिंहीं स्वदेहाचें केलें दहन । नेमिलें स्थान त्यां नाहीं ।। ५८ ।। जे अविद्यादिकर्मप्रवृत्ती । विरजाहोमीं स्वयें जाळिती । ते भववृक्षाचीं फळें खाती । हेही युक्ती घडेना ।। ५९ ।। जागृतींच्या पाहुण्यासी । जेवूं धाडावें स्वप्नगृहासी । तेवीं न्यस्तसंकल्प संन्यासी । संसारसुखासी केवीं भोक्ते ।। ४६० ।। स्वकर्म जाळोनि विरजाहोमीं । जिहीं साध्य केलें ब्रह्माहमस्मि । त्यांसी निवासस्थान कोण नेमी । वनीं ग्रामीं नेमस्त ।। ६१ ।। बिढार द्यावया आकाशासी । कोण घर नेमावें त्यासी । तेवीं न्यस्तसंकल्प संन्यासी । त्यांच्या निवासासी कोण नेमी ।। ६२ ।। जे न्यस्तसंकल्प संन्यासी । त्यांसी कोण म्हणे अरण्यवासी । मायिक भववृक्षींच्या फळासी । भोक्ते त्यांसी म्हणों नये ।। ६३ ।। मूळींचें पद 'अरण्यवासी '। तें भागा आलें वानप्रस्थासी । वानप्रस्थ सदा वनवासी । दुसऱ्या फळासी तो भोक्ता ।। ६४ ।। ऐक संन्याशांची सुखप्राप्ती । दोनी फळें मिथ्या जाणती । मीचि एक त्रिजगतीं । हे प्रतीति निश्चितीं त्यां झाली ।। ६५ ।। जो हा बहुरूपें विस्तारू । तो मी चिदात्मा साचारू । जाणोनि गुरुमुखें निर्धारू । माझें सुख साचारू पावले ।। ६६ ।। ते मद्रूपें मज पावले । माझेनि सुखें सुखरूप झाले । सुखदुःखफळांतें मुकले । येवों चुकले संसारा ।। ६७ ।। संसार मायामय मिथ्याभास । जाणे तोचि वेदज्ञ विद्वांस ।

करावें, गृहस्थाश्रमांत अग्निब्राह्मणांचें पूजन करावें आणि वानप्रस्थाश्रमांत वनांत राहून वनांतील फळांचें सेवन करावें. ५४ या क्रमानें क्रममुक्तीला प्राप्त होऊन जे ब्रह्मसदनाला जाऊन पोंचतात, तेच ब्रह्मभुवनांत राहणारे सुखफळाचे भोक्ते होत. ५५ इतर स्वर्गांतील जी सुखप्राप्ति, तिला पुनरावृत्ति आहे. ब्रह्मसदनांत जाऊन पोंचणारास क्रममुक्ति मिळते. ५६ श्लोकांत 'अरण्यवासी ' असें पद आहे. त्या पदानें वानप्रस्थ विवक्षित आहे, संन्यासी नव्हे. संन्याशाला वनवासी म्हणूं नये. ५७ संन्याशाचें निवासस्थान वेदानें सांगितलें नाहीं. त्यानें स्वदेहाचें दहन केलें असल्यामुळें त्याला नियतस्थान नाहीं. ५८ ते अज्ञानजन्य कर्मप्रवृत्तीला विरजा होमांत जाळून टाकितात. तेव्हां ते संसावृक्षाचीं फळें खातील हेंहि संभवत नाहीं. ५९ जागृतींतील पाहुण्यांना स्वप्नांतील घरीं जसें जेवावयास पाठवावें, तसेंच ज्यांच्या मनोवासनांचा लोप झाला आहे, असे संन्यासी संसारसुखाचे भोक्ते, हें म्हणणें आहे. ४६० ज्यांनीं विरजा होमांत आपलें कर्म जाळून 'ब्रह्माहमस्मि ' म्ह० मी ब्रह्म आहें असें जाणलें, त्यांच्या रहाण्याचें स्थान गांवांत किंवा वनांत कोण नियत करणार! ६१ कोण नेमणार! आकाशास बिऱ्हाडाला जागा कोणत्या घरांत द्यावी ! त्याचप्रमाणें सर्वसंगपरित्याग केलेल्या संन्याश्यांचें रहाण्याचें ठिकाण कोणी नेमावें. ६२ व मनोवासनांचा त्याग केलेल्या संन्याश्यांस अरण्यवासी तरी कसें म्हणावें ! मायेनें काल्पिलेल्या संसारवृक्षाच्या फळांचे भोक्ते त्यांना म्हणूं नये. ६३ मूळ श्लोकांतील पद 'अरण्यवासी ' असें आहे. पण तें वानप्रस्थाश्रमीजनांच्याच वांट्यास आलें. कारण वानप्रस्थ नेहमीं वनांत रहातो. म्हणून तो दुसऱ्या फळास भोगितो. ६४ आतां संन्याश्याची फलप्राप्ति ऐक. तो सुख व दुःख या दोन्ही फळांना मिथ्या मानितो. त्रिभुवनांत मी परमात्माच काय तो एक आहें, असा अनुभव त्यास निश्चयानें आलेला असतो. ६५ हा जो अनेकरूपांनीं विस्तार झाला आहे तो मी चिदात्माच आहें, हें गुरुमुखानें जाणून ते माझ्या सुखाला प्राप्त होतात. ६६ ते माझ्या रूपानें मला प्राप्त झाले, माझ्या सुखानेंच सुखस्वरूप बनले, सुखदुःखरूपी फळाला मुकले आणि संसारगतीला चुकले. ६७ संसार हा केवळ मायामय मिथ्या भास आहे, हें ज्याला कळलें त्यालाच वेदार्थ जाणणारा

त्यासीच बोलिजे परमहंस । विश्वनिवासनिवासी ॥ ६८ ॥ ऐशी होआवया पदप्राप्ती । सुदृढ करावी गुरुभक्ती । तेणें होय संसारनिवृत्ती । तेंचि श्रीपति सांगत ॥ ६९ ॥ पहिली सांगितली सत्संगती । तेणें जाहली मत्पदप्राप्ती । तेचि अध्यायाच्या अंतीं करावी । गुरुभक्ती सांगतू ॥ ४७० ॥

एवं गुरूपासनयैव भक्त्या विद्याकुठारेण शितेन धीरः ।
विवृश्च्य जीवाशयमप्रमत्तः संपद्य चात्मानमथ त्यजाऽस्त्रम् ॥ २४ ॥

न करितां सद्गुरुभजन । नव्हे भववृक्षाचें छेदन । जरी कोटिकोटी साधन । आनेआन केलिया ॥ ७१ ॥ भववृक्षातें छेदिती । केवळ जाण गुरुभक्ती । अरिनिर्दळणी निश्चितीं । जेवीं निजशक्ति शूरांची ॥ ७२ ॥ दूरी करावया दुरित । जेवीं गंगाजळ समर्थ । तेवीं भवभया भस्म करित । जाण निश्चित गुरुभक्ति ॥ ७३ ॥ करितां सत्यव्रतग्रहण । पाप स्वयें जाय पळोन । तेवीं करितां गुरुभजन । भवनिर्दळण स्वयें होय ॥ ७४ ॥ हनुमंत देखतां दिठीं । भूतें पळती बारा वाटीं । तेवीं गुरुभजनपरिपाटीं । पळे उठाउठी भवभय ॥ ७५ ॥ मरतां घडे अमृतपान । तैं मरणासचि आलें मरण । तेवीं करितां गुरुभजन । जन्ममरण निमालें ॥ ७६ ॥ अंतीं अवचटें हरि म्हणतां । पांपरा हाणे यमदूतां । तेवीं सद्गुरूतें भजतां । हाणे लाता भवभया ॥ ७७ ॥ करावया भवनिर्दळण । मुख्य करावें गुरुभजन । हेंचि श्रेष्ठ गा साधन । सभाग्य जाण गुरुभक्त ॥ ७८ ॥ कोण सद्गुरु कैशी भक्ती । ऐसें कांहीं कल्पिसी चित्तीं । तेही मी यथानिगुतीं । मागां तुजप्रती सांगितली ॥ ७९ ॥ जो शब्दपरनिष्णात । शिष्यप्रबोधनीं समर्थ । तोचि सद्गुरु येथ । जाण निश्चित उद्धवा ॥ ४८० ॥ जो

विद्वान् म्हणावें. तोच परमहंस व विश्वनिवासवासी होय. ६८ अशा पदाच्या प्राप्तीसाठीं दृढ गुरुभक्ति करावी त्यानेंच संसाराची निवृत्ति होते. तेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ६९ पहिल्यानें सत्संगति सांगितली. त्यानेंच माझ्या पदाची प्राप्ति झाली. आतां तीच गुरुभक्ति करावी, असें या अध्यायाच्या शेवटीं सांगतात. ४७०.

—'हे उद्धवा, तूंहि याप्रमाणें परमात्म्याला जाणून कृतकृत्य हो आणि सर्व साधनांचा त्याग कर,' असें आतां भगवान् सांगतात—

धीरः अप्रमत्तः एवं गुरूपासनया एव भक्त्या शितेन विद्याकुठारेण जीवाशयं विवृश्च्य—हे उद्धवा ! तूं धीर व सावधान होऊन वर सांगितल्याप्रकारें गुरूपासना याच अनन्य भक्तनें तीक्ष्ण केलेल्या ज्ञानरूपी कुऱ्हाडीनें त्रिगुणात्मक लिंगशरीररूप जीवोपाधीला तोडून, आत्मानं च संपद्य अथ अस्त्रं त्यज—आणि परमात्म्याला प्राप्त होऊन त्यानंतर साधनाचा त्याग कर. २४.

सद्गुरूचें भजन न करितां नानाप्रकारचीं कोट्यवधि साधनें जरी आचरिलीं तरी संसारवृक्षाला तोडितां येत नाहीं. ७१ वीराचें शौर्य ज्याप्रमाणें शत्रूचें निर्दालन खात्रीनें करितें, त्याप्रमाणें केवळ गुरुभक्तीनेंच संसारवृक्षाचा उच्छेद होतो. ७२ पापाचें क्षालन करण्यास गंगोदक जसें समर्थ असतें, तशी गुरुभक्ति संसारभयाला जाळून टाकिते, हें तूं निश्चयानें जाण. ७३ सत्यव्रत आचरिलें असतां पातक जसें आपण होऊनच पळून जातें, तसेंच गुरुभजन केलें असतां स्वभावतःच संसाराचा नाश होतो. ७४ हनुमान् दृष्टीस पडतांच भूतें जशीं बारा वाटांनीं पळून जातात, तसेंच गुरुभजनानें संसारभय तत्काल पळून जातें. ७५ मरणाच्या वेळीं जर अमृताचें प्राशन केलें तर त्या मरणालाच जसें मरण येतें, तसें गुरुभजन करितांच जन्म-मरण नाहींसें होतें. ७६ अंतसमयीं अकस्मात् सहज जरी हरीचें नाम उच्चारिलें तरी यमदूतांना जशा लाथा बसतात, तशाच सद्गुरूचें भजन केलें असतां भवभयाला लाथा मिळतात. ७७ यास्तव संसाराचा क्षय करण्यासाठीं मुख्य गुरुभजन करावें. हेंच सर्वांत श्रेष्ठ साधन आहे. बरें, गुरुभक्त मोठा भाग्यवान् असतो, असें समज. ७८ सद्गुरु कोणता ! भक्ति कशी करावी ! असा कांहीं मनांत संशय आणशील तर याविषयीं मीं तुला मागें सविस्तर सांगितलेंच आहे. ७९ उद्धवा ! जो शब्दब्रह्म व परब्रह्म यांत निष्णात म्ह० स्वानुभवी व शिष्याला उपदेश करण्यास समर्थ असतो तोच येथें सद्गुरु

स्वरूपीं करी समाधान । तोचि सद्गुरु सत्य जाण । त्यावेगळें सद्गुरुपण । होआवया कारण असेना ॥ ८१ ॥ त्या सद्गुरुभजनाची परी । तुज मी सांगेन निर्धारीं । सर्व कर्मधर्मांचिया शिरीं । जो कां करी गुरुभजन ॥ ८२ ॥ गुरु म्हणों पित्यासमान । तंव तो एकजन्मींचा जाण । हा मायबापू सनातन । जनक पूर्ण जगाचा ॥ ८३ ॥ गुरु मातेसमान पाहों । तंव गर्भजन्में तिचा स्नेहो । गर्भवास निवारी गुरुरावो । अधिक स्नेहो पुत्रापरिस ॥ ८४ ॥ उदराबाहेर पडल्यापाठीं । पुत्रस्नेहें माता उठी । तें बाहेरील घालून पोटीं । स्नेहें गोमटी गुरुमाता ॥ ८५ ॥ गुरु मानूं स्वामीसमान । स्वामी निवारूं न शके मरण । सद्गुरु चुकवी जन्ममरण । स्वामी संपूर्ण गुरुरावो ॥ ८६ ॥ गुरु मानूं कुलदेवता । तंव तिसी कुलधर्मीं पूज्यता । हा कुलदेवतेची देवता । नित्य पूज्यता निजकर्मीं ॥ ८७ ॥ गुरु मानूं कल्पतरूसमान । तंव कल्पतरू दे कल्पिलें दान । सद्गुरु दे निर्विकल्पता पूर्ण । अगाध दान निर्लोभें ॥ ८८ ॥ चिंतामणी दे चिंतिल्या अर्था । सद्गुरु करी चिंतेच्या घाता । चित्ता मारूनि दे चैतन्यता । अक्षयता निजदान ॥ ८९ ॥ कामधेनूचें दुभतें । तें कामनेचपुरतें । सद्गुरु दुभे स्वानंदार्थें । कामनेतें निर्दली ॥ ४९० ॥ गुरुसमान म्हणों सागरू । तो गंभीर परी सदा क्षारू । हा स्वानंदें नित्य निर्भरू । अतिमधुरू निजबोधें ॥ ९१ ॥ गुरु पर ब्रह्मसमान । हेंही बोलणें किंचित् न्यून । गुरुवाक्यें ब्रह्म सप्रमाण । येरवीं ब्रह्मपण शब्दमात्र ॥ ९२ ॥ शब्दीं लोपूनि शब्दार्था । गुरु प्रबोधी संविदर्था । त्याहूनि पूज्य परता । नाहीं सर्वथा त्रिलोकीं ॥ ९३ ॥ गुरु माता गुरु पिता । गुरु स्वामी कुळदेवता । गुरूवांचोनि सर्वथा । आणिक देवता स्मरेना ॥ ९४ ॥ थोर मांडलिया सांकडें । जैं गगन गडगडूनि पडे । तैं न पाहे आणिकाकडे । नाम पढे गुरूचें ॥ ९५ ॥ काया वाचा मनें प्राणें । जो गुरूवांचोनि

जाणावा. ४८० जो स्वरूपांतच समाधान करितो, तोच खरा सद्गुरु होय. त्यावांचून सद्गुरुपणा येण्याला दुसरें कारणच नाहीं. ८१ त्या सद्गुरूच्या भजनाचा प्रकार मी तुला निश्चयानें सांगतों. सगळ्या कर्म-धर्मांत गुरुभजनच श्रेष्ठ आहे. ८२ गुरूला जर पित्यासमान मानावें तर तो केवळ एका जन्मापुरताच जनक असतो आणि गुरु सनातन माय-बाप असून सर्व सृष्टीचा तो पूर्ण जनक आहे. ८३ बरें, गुरु मातेसारखा आहे म्हणावें तर तिच्या गर्भांत जन्म घेतल्यामुळेंच तिचें आपल्या अपत्यांवर प्रेम असतें. परंतु गुरुराज गर्भवासाचें निवारण करून पुत्रापेक्षांहि अधिक प्रेम करितो. ८४ बालक उदरांतून बाहेर आल्यावर मग मातेला त्याच्यावरील प्रेमाचा पाझर फुटतो; पण गुरुमाउली बाहेरचे सर्व दोष पोटांत घालून मातेपेक्षांहि जास्त स्नेह करिते. ८५ गुरूला जर स्वामीसारखें समजावें तर धनी कांहीं मरणाचें निवारण करूं शकत नाहीं, पण सद्गुरु जन्म-मरण चुकवितो. यास्तव सद्गुरूच पूर्णपणें स्वामी आहे. ८६ गुरूला कुलदेवता मानावें तर तिला फक्त कुलधर्मांतच पूज्यत्व आहे व सद्गुरु कुलदेवतेचीहि कुलदेवता आहे. म्हणून आपल्या प्रत्येक कर्मांत गुरु पूज्य आहे. ८७ गुरूला जर कल्पवृक्षासारखेंच म्हणावें तर कल्पवृक्ष आपण जेवढें कल्पितों तेवढेंच देतो, पण सद्गुरु पूर्ण निर्विकल्पत्व देतो. यास्तव त्याचें दान अगाध व निर्लोभ असतें. ८८ चिंतामणि आपण चिंतिलेली वस्तूच तेवढी देतो; पण सद्गुरु चिंतेचा नाश करून, चित्ताला नाहींसें करून, चैतन्याचें शाश्वत दान देतो. ८९ कामधेनूचें दूध केवळ कामनेपुरतेंच असतें; पण सद्गुरु स्वानंदामृत देऊन कामनाच नाहींशी करितो. ४९० गुरूला समुद्राची उपमा द्यावी तर तो जरी गंभीर आहे तरी निरंतर खारटच असतो; पण सद्गुरु सर्वदा स्वानंदपूर्ण असल्यामुळें आत्मबोधानें अत्यंत मधुर आहे. ९१ बरें, गुरूला परब्रह्मसमान म्हणावें तरी त्यांतहि थोडा गौणपणाच येतो. कारण गुरुवचनानेंच ब्रह्मप्रत्यय येतो. एरवीं त्याचें ब्रह्मत्व केवळ शाब्दिकच आहे. ९२ पण गुरु शब्दार्थाला शब्दांतच लोपवून ज्ञानरूप वस्तूचा बोध करितो यास्तव सद्गुरूहून अधिक श्रेष्ठ अशी त्रिभुवनांत एकहि वस्तु नाहीं. ९३ सद्गुरूच माता, पिता, स्वामी, कुलदेवता आहे. गुरूवांचून दुसरी कोणतीहि देवता सर्वथा आठवत नाहीं. ९४ मोठें संकट आलें, आकाश जरी कोंसळून पडलें, तरी दुसऱ्या कोणाकडे न पहातां केवल सद्गुरूचें नामस्मरण करावें. ९५ काया-वाचा-मन व

आन नेणे । तैसाचि भजे अनन्यपणें । गुरुभक्ति म्हणणें त्या नांव ॥ ९६ ॥ पक्षिणीचीं अपक्ष पिलें । तीं तिसीच स्मरती सर्वकाळें । तेवीं जागृतिस्वप्नसुषुप्तिमेळें । जो गुरुवेगळें स्मरेना ॥ ९७ ॥ मागां सांगीतलें भगवद्भजन । आतां सांगसी गुरुसेवन । नाहीं एकविध निरूपण । ऐसा विकल्प जाण न धरावा ॥ ९८ ॥ सद्गुरु तोचि माझी मूर्ती । निश्चयेंसीं जाण निश्चितीं विकल्प न धरावा ये अर्थीं । अनन्यभक्ति या नांव ॥ ९९ ॥ एकाग्रता जें गुरुभजन । तेंचि माझें परम पूजन । गुरूसी मज वेगळेपण । कल्पांतीं जाण असेना ॥ ५०० ॥ गुरु भगवंत दोन्ही एक । येणें भावें निजनिष्टंक । भजे तोचि गुरुसेवक । येरू तो देख अनुमानी ॥ १ ॥ माझिया ऐक्यता अतिप्रीतीं । जेणें आदरली गुरुभक्ती । तोचि धन्य धन्य त्रिजगतीं । भजती स्थिति ते ऐक ॥ २ ॥ करावया गुरुसेवे । मनापुढें देह धांवे । एकला करीन सर्वसेवे । येवढे हांवें उद्यतू ॥ ३ ॥ सेवेच्या दाटणी जाण । अधिकचि होय ठाणमाण । अंग अंगवूनि अंगवण । सेवेमाजीं जाण विसांवा त्यासी ॥ ४ ॥ सेवेचिया आवडीं । आगयेना अर्ध घडी । आवडीचें चढोवढी । चढती गोडी गुरुभजनीं ॥ ५ ॥ नित्य करितां गुरुसेवा । प्रेमपडिभरू नीच नवा । सद्भावाचिया हांवा । गुरुचरणीं जीवा विकिलें ॥ ६ ॥ आळसु येवोंचि विसरला । आराणुकेचा ठावो गेला । गुरुसेवासंभ्रमें भुलला । घेवों विसरला विषयांतें ॥ ७ ॥ तहान विसरली जीवन । क्षुधा विसरली मिष्टान्न । करितां गुरुचरणसंवाहन । निद्रा जाण विसरला ॥ ८ ॥ जांभयी यावयापुरती । सवडी उरेना रिती । तेथें निद्रेलागीं केउती । रहावया वस्ती मिळेल ॥ ९ ॥ मुखीं सद्गुरूचें नाम । हृदयीं सद्गुरूचें प्रेम । देहीं सद्गुरूचें कर्म । अविश्रम अहर्निशीं ॥ ५१० ॥ गुरुसेवेसी गुंतलें मन । विसरला स्त्री पुत्र धन । विसरला मनाची आठवण । मी कोण हें स्फुरेना

प्राण यांनीं जो गुरूवांचून अन्य कांहीं जाणत नाहीं व अनन्यभावानें त्यालाच भजतो, तोच भक्त व त्याचीच खरी गुरुभक्ति होय. ९६ पक्षिणीचीं पिलें, पंख फुटेपर्यंत सर्वकाल तिचेंच स्मरण करीत असतात, त्याप्रमाणें जागृति-स्वप्न-सुषुप्ति यांत भक्त गुरूवांचून दुसरें कसलेंहि स्मरण करीत नाहीं. ९७ (उद्धवा ! तूं कदाचित् असें म्हणशील कीं) मागें भगवद्भजन सांगितलेंस व आतां गुरुभक्ति सांगतोस, तेव्हां तुझ्या निरूपणांत एक निश्चय नाहीं ! तर असा विकल्प तूं मनांत आणूं नकोस. ९८ सद्गुरु माझीच मूर्ति आहे, असें निश्चयानें समज. याविषयीं मुळींच विकल्प धरूं नकोस. याचेंच नांव 'अनन्यभक्ति' आहे. ९९ एकाग्र मनानें गुरूचें भजन करणें हें माझेंच पूजन आहे. गुरु व मी, यांत कल्पांतींहि भिन्नत्व नसतें. ५०० गुरु व भगवान् या दोघांना एकच समजून जो अनन्यभावानें भजन करितो तोच खरा गुरुसेवक होय. इतर सर्व अनिश्चित बुद्धीचे होत. १ माझ्या सायुज्यप्राप्तीसाठीं ज्यांनीं आदरानें गुरुभक्ति स्वीकारिली तोच त्रिभुवनांत धन्य होय. आतां त्या भजनाचा प्रकार ऐक. २ गुरूच्या सेवेसाठीं त्याचा देह मनाच्या पुढें धांवत असतो. मी एकटाच गुरूची सगळी सेवा करीन, अशा उत्कट इच्छेनें तो निघतो. ३ जेवढी सेवा अधिक, तेवढा त्याचा उत्साह अधिक वाढतो व तो आपली सर्व शारीरिक शक्ति गुरुसेवेकडेच लावितो. सेवेच्या आवडीमुळें तो क्षणभरहि विसावा घेत नाहीं. ४ आवडीच्या चढाओढीमुळें त्याची गुरुभजनाची गोडी वाढतच असते. ५ नित्य गुरुसेवा करीत असतां त्याच्या मनांत नित्य नवें प्रेम उद्भवते. त्यानें सद्भावाच्या इच्छेनें सद्गुरुचरणाला जीव विकलेला असतो. ६ त्याच्यापाशीं आळस येण्याचें विसरतो. विश्रांतीला जागाच मिळत नाहीं. निरंतर गुरुसेवेच्या गडबडीत असल्यामुळें तो विषयसेवन साफ विसरतो. ७ तहानेला पाण्याची आठवण होत नाहीं. भुकेला मिष्टान्नाचें स्मरणहि नाहींसें होतें आणि गुरूचे चरण रगडीत असतां तो झोंपहि विसरतो. ८ त्याला जांभई देण्यापुरतीहि सवड सांपडत नाहीं, मग निद्रेला येण्यास आवकाश कोठचा. ! ९ त्याच्या तोंडीं रात्रंदिवस सद्गुरूचें नांव असतें. हृदय सदैव सद्गुरुप्रेमानें भरलेलें असतें. देह सर्वकाळ सद्गुरूचेंच काम न थकतां करीत असतो. ५१० त्याचें मन गुरुसेवेंत गुंतल्यामुळें तो स्त्री, पुत्र, धन या सर्वांस विसरतो. त्याला मनाचेंहि विस्मरण होतें. 'मी कोण' हेंहि त्याला कळेनासें होतें. ११ भजनाचा

॥ ११ ॥ नवल भजनाचा उत्साबो । भजतां नाठवे निजदेहो । थोर सेवेचा नवलावो । निजात्मभावो गुरुचरणीं ॥ १२ ॥ ऐसाही प्रारब्धमेळा । अवचटें झालिया वेगळा । न तुटे प्रेमाचा जिव्हाळा । भजनीं आगळा सद्‌भावो ॥ १३ ॥ गुरूचा वसता जो ग्राम । तेथेंचि वसे मनोधर्म । गुरुध्यान तें स्वधर्मकर्म । सेवासंभ्रम सांडीना ॥ १४ ॥ गुरुमूर्तीची सवे त्यासी । ते मूर्ति बैसवी हृदयावकाशीं । मग नानाभजनविलासीं । आवडी कैशी भजनाची ॥ १५ ॥ चिन्मात्र पूर्णिमा गुरु पूर्णचंद्र । तळीं आपण होय आर्त चकोर । मग स्वानंदबोधाचे चंद्रकर । निरंतर स्वयें सेवी ॥ १६ ॥ सद्‌गुरु सूर्य करी चिद्‌गगनीं । आपण होय सूर्यकांतमणी । त्याचेनि तेजें प्रज्वळोनी । स्वभावें मायावनीं होळी करी ॥ १७ ॥ सद्‌गुरुकृपामृताच्या डोहीं । स्वयें तरंगू होय तये ठायीं । सबाह्य तद्रूपें पाहीं । भावना हृदयीं भावितु ॥ १८ ॥ आपुला निजस्वामी जो सद्‌गुरू । भावी निर्विकल्प कल्पतरू । त्याचे छाये बैसोनि साचारू । मागे वरू गुरुभक्ती ॥ १९ ॥ सद्‌गुरु कामधेनु करी जाणा । वत्सरूपें भावी आपणा । आवडीं चाटवी बोधरसना । स्वानंदपान्हा सेवितू ॥ ५२० ॥ तुझ्या सकळ वृत्तींची सेवा । म्यांचि करावी गा गुरुदेवा । ऐसें प्रार्थूनि सद्भावा । हा वरू मज द्यावा कृपानिधी ॥ २१ ॥ तेथ संतोषोनि गुरुनाथें । वरू दीधला वरदहस्तें । हर्षें वोसंडत चित्तें । धन्य मी वरातें लाधलों ॥ २२ ॥ ऐशी लाहोनि वरदस्थिती । तेचि सेवा आदरी प्रीतीं । अतिधन्य भावार्थ गुरुभक्ती । नाना उपपत्ती गुरुभजना ॥ २३ ॥ सद्‌गुरूचीं दहाही करणें । मनबुद्ध्यादि अंतःकरणें । क्रियामात्र मीचि होणें । ऐसें जीवेंप्राणें भावितु ॥ २४ ॥ सद्‌गुरु जे जे भोग भोगिती । ते मीचि होईन निश्चितीं । एवं मीचि एक गुरुभक्ती । दुजी स्थिति हों नेदी ॥ २५ ॥ सद्‌गुरु जेथें उभे ठाकती । तैं पायांतळीं मीचि क्षिती ।

उत्साह किती आश्चर्यकारक आहे, पहा ! भजन करीत असतां आपल्या देहाचेंहि भान रहात नाहीं. गुरुसेवेचा हा केवढा अगाध महिमा ! भक्ताचा सारा आत्मभाव गुरुचरणींच लागून रहातो, १२ असें असतांहि प्रारब्धयोगानें जर गुरूपासून तो दूर झाला तरी त्याच्या अंतःकरणांतील प्रेमाचा ओघ कमी न होतां त्याची भक्ति अधिकच वाढत जाते. १३ गुरूच्या राहण्याचें जें गांव असतें, तेथेंच त्याचे सर्व मनोधर्म गुंतून राहतात. गुरूचें ध्यान हेंच स्वधर्म-कर्म बनतें. तो सेवेचा उत्साह कधीं सोडीत नाहीं. १४ गुरूच्या मूर्तीची त्याला संवय असल्यामुळें तो हृदयमंदिरांत त्या मूर्तीला स्थापितो. मग त्याच्या अनेकप्रकारच्या भजनाची आवड काय वर्णावी ! १५ चिद्रूप हीच पौर्णिमा आणि सद्‌गुरू हा पूर्णचंद्रमा अशी कल्पना करून तो स्वतः खालीं उत्सुक चकोर बनतो आणि स्वानंदबोधरूपी चंद्रकिरणांचें निरंतर सेवन करितो. १६ तो सद्‌गुरूला चिद्रूपी आकाशांतील सूर्य कल्पितो आणि स्वतः सूर्यकांत-मणि होऊन त्याच्या दिव्य तेजानें प्रदीप्त होतो व मायारूपी वन जाळून टाकितो. १७ किंवा सद्‌गुरूच्या कृपामृत-डोहांतील आपण लाटाच होऊन रहातो. आंत, बाहेर सर्व गुरूचेंच स्वरूप आहे, असें समजून त्याच्या छायेंत बसून गुरूभक्तीचा वर मागतो. १८-१९ सद्‌गुरूला कामधेनु करून आपण तिचें वासरूं होतो आणि त्याच्या ज्ञानरूपी जिभेनें स्वतःला आवडीनें चाटवून घेतो व स्वानंदरूपी पान्हाचें प्राशन करितो. ५२० 'हे गुरुदेवा ! तुझ्या सगळ्या वृत्तींची सेवा मीच करावी, हे दयाघना !' 'एवढा वर मला द्या' अशी सद्भावानें प्रार्थना केली असतां २१ गुरुनाथानें मोठ्या संतोषानें वरदहस्त ठेवून वर दिला. तेव्हां आनंदानें चित्त भरून आलें व 'मी केवढा धन्य म्हणून हा वर मिळाला' असें त्याला वाटतें. २२ असा वर मिळाल्यावर तो त्याची सेवा पूर्वीपेक्षांहि जास्त प्रेमानें करूं लागतो. अत्यंत प्रेमाची गुरूभक्ति फार विलक्षण आहे. त्यांतील गुरुभजनाचे प्रकार असंख्य आहेत. २३ सद्‌गुरूचीं मन, बुद्धि, अंतःकरण इत्यादि दश इंद्रियें व त्यांचीं कर्मे मीच आहें, असें तो समजतो २४ सद्‌गुरू जेवढे भोग भोगितो ते सर्व निश्चयानें मीच व्हावें, मींच एक गुरुभक्ति करणारा असावें, अशा भावनेनें तो दुसऱ्या कोणत्याहि स्थितींत रहात नाहीं. २५ सद्‌गुरु जेथें उभा रहातो, त्याच्या पायांखालची भूमि मींच असावें, सद्‌गुरु

सद्‌गुरु जेथें जेथें चालती । ते मार्गींची माती मी होईन ॥ २६ ॥ चरणक्षालनासी समस्त । मीचि उदक मीचि तस्त । मीचि चरण प्रक्षालित । चरणतीर्थ मी सेवीं ॥ २७ ॥ सद्‌गुरुचरणींचे रजःकण । मीचि होईन आपण । सद्‌गुरू करिती आरोहण । तें सिंहासन होईन मी ॥ २८ ॥ सद्‌गुरूचें सिंहासन । तें मीचि होईन आपण । त्यावरी बैसतें आसन । तेंही जाण होईन मी ॥ २९ ॥ सद्‌गुरूसी स्नेह लागे । तें मी होईन सर्वांगें । गुरूसी वोठंगावया पुढें मागें । मुदुळी सर्वांगें मी होईन ॥ ५३० ॥ मनींचा ऐसा आवांका । सद्‌गुरूच्या सिद्ध पादुका । त्या मी होईन देखा । नेदीं आणिकां आतळों ॥ ३१ ॥ मी होईन गुरूच्या श्वासोच्छ्वासा । वेगीं बाहेर निघेन नासा । गुरू घेतील ज्या सुवासा । त्या त्या विलासा मी होईन ॥ ३२ ॥ गुरु अवलोकिती कृपादृष्टीं । त्या दृश्याची मी होईन सृष्टी । गुरूची देखती देखणी पुष्टी । ते मी उठाउठीं होईन ॥ ३३ ॥ गुरूसी आवडतें निरूपण । तें मी श्रवणीं होईन श्रवण । अथवा रुचेल जें कीर्तन । तें गाता गायन मी होईन ॥ ३४ ॥ सद्‌गुरुमुखींची जे कथा । ते मी आदरें होईन तत्त्वतां । अक्षरीं अक्षर अक्षरार्था । मीचि सर्वथा होईन ॥ ३५ ॥ सद्‌गुरु जेथ करिती स्नान । तें मी अंगस्पर्शनाचें जीवन । गुरु करिती जें आचमन । तेंही जाण होईन मी ॥ ३६ ॥ गुरु परिधान करिती वास । तें मी होईन सुवास । गुरुचरण पुसावयास । तेंही धूतवास मी होईन ॥ ३७ ॥ गुरूसी करिती विलेपन । तें मी होईन शुद्ध चंदन । चरणीं अर्पितें सुमन । मीचि जाण होईन ॥ ३८ ॥ सद्‌गुरु करिती भोजन । तेथ मीचि ताट मीचि अन्न । रसस्वाद पक्वान्न । पंक्तिकारु जाण मी होईन ॥ ३९ ॥ मथोनियां दहीं मथित । सारांश तें नवनीत । वैराग्यअग्निसंतप्त । भोजनीं मुख्य घृत मी होईन ॥ ५४० ॥ परिपाकीं स्वादिष्ठपण । सर्वां चर्वीचें कारण । मी होईन वरी लवण । न्यून तें पूर्ण गुरु करिती ॥ ४१ ॥ गुरु करिती प्राशन । तें मी होईन जीवन । सद्‌गुरूचें धालेपण । ते उद्‌गार जाण मी होईन ॥ ४२ ॥

जेथून चालत जातात, त्या मार्गावरची माती मींच व्हावें. २६ त्यांचे पाय धुवावयास पाणी व तस्ताहि मींच व्हावें, मींच त्यांचे पाय धुवावें आणि त्या चरणतीर्थाचें सेवनहि मींच करावें. २७ सद्‌गुरूच्या पायांच्या धुळीचे कणहि मीच व ते ज्यावर बसतात तें सिंहासनहि मीच होईन २८ आणि त्यावर घालावयाचें आसनहि मीच, असें समजावें. २९ सद्‌गुरूच्या आंगाला लावावयाचें तेलहि सर्वांगानें मीच, त्यांस टेकावयास मागेंपुढें लोड-तक्केहि मीच व मऊ गादीगिर्दीहि मीच होईन. ५३० माझ्या मनाची इतकी उत्कट इच्छा आहे कीं, सद्‌गुरूच्या सिद्ध असलेल्या पादुकाहि मीच व्हावे व त्यांना दुसऱ्या कोणाला स्पर्शहि करूं देऊं नये. ३१ मीच सद्‌गुरूचा श्वासोच्छ्वास होऊन नाकांतून वेगानें बाहेर निघेन. गुरु जो सुवास घेतील तोहि मीच होईन. ३२ गुरूची जी सुंदर पुष्टि तीहि सत्वर मीच होईन. गुरु कृपादृष्टीनें जें जें पहातील तें सर्व दृश्यहि मीच होईन. ३३ गुरूला आवडणारें व्याख्यान मी कान होऊन ऐकेन. किंवा गुरूला रुचणारे कीर्तन व गाणारा गायकहि मीच होईन. ३४ सद्‌गुरूच्या तोंडची कथाहि मीच मोठ्या आदरानें होईन. अक्षरांतील अक्षर व त्यांचा अर्थहि सर्वथा मीच होईन. ३५ सद्‌गुरु जेथें स्नान करितात तेथें त्यांच्या अंगावर पडणारें पाणी व गुरु ज्याचें आचमन करितात तेंहि जल मीच होईन. ३६ गुरूचें नेसण्याचें उत्तम वस्त्र व अंग पुसण्याचा पंचाहि मी होईन. ३७ गुरूच्या अंगाला उटी लावावयाचें पवित्र चंदन व चरणांवर अर्पण करावयाचीं सुवासिक फुलेंहि मीच होईन. ३८ सद्‌गुरूच्या भोजनाचें ताट व त्यांतील अन्न, त्या रसाची गोडी, मिष्टान्न व पंक्तीला जेवणारा हें सर्व मीच होईन. ३९ दहीं घुसळून काढलेलें लोणी वैराग्यरूपी जळजळीत अग्नीवर कढवून बनलेलें जेवणांतील मुख्य साजूक तूपहि मीच होईन. ५४० सर्व स्वयंपाक स्वादिष्ट करणारें, सर्वांला रुचि देणारें मीठहि मीच होईन. कांहीं कमी असल्यास गुरु पूर्ण करून घेतील. ४१ सद्‌गुरूचें प्यावयाचें पाणी व तृप्त झाल्याचें चिह्न अशी जी ढेंकर तीहि मीच होईन. ४२ सद्‌गुरूला जे जे गोड

गुरूसी जें जें गोड लागे । ते ते पदार्थ मी होईन अंगें । सद्गुरूसी ज्याची रुचि लागे । तें मी सर्वांगें होईन ।। ४३ ।। सद्गुरु आंचवती जेथ । तेथं मी उष्णोदक मी तस्त । शिंतोडे लागती जेथ जेथ । तेही समस्त होईन मी ।।४४।। गुरूसी अर्पिती जें फळ । तें मी होईन तत्काळ । गुरुअर्पणें सफळ । फळाचें फळ मी होईन ।। ४५ ।। सद्गुरुचें घ्यावया उच्छिष्ट । मजचि मोठा लवलवाट । मांजर होऊनियां ताट । चरचराट चाटीन मी ।। ४६ ।। गुरु करिती करोद्वर्तन । तो मी होईन सुगंधचंदन । मुखवासा सुवासपण । मीचि जाण होईन ।। ४७ ।। फळाशा फोडूनि फोडी । वासनाशिरा काढूनियां विडी । रिघोनियां सद्गुरूच्या तोंडीं । तांबूलगोडी मी होईन ।। ४८ ।। जाळूनियां अहंकठिणपणा । मी होईन सोहं शुद्ध चुना । शांति परिपक्व लागोनि पाना । सद्गुरुवदना पावेन ।। ४९ ।। सर्व साराचें शुद्ध सार । तो मी होईन खदिरसार । सद्गुरुमुखीं रंगाकार । मीचि साचार शोभेन ।। ५५० ।। सद्गुरुमुखींचें पवित्र पीक । वरच्यावरीं मी घेईन देख । पिकदाणीचे मुखाचें मुख । आवश्यक मीच होईन ।। ५१ ।। गुरूचा उगाळु मी होईन । पीक पिकदाणी धरोनि जाण । चवरी जी मक्षिकानिवारण । ती मी होईन निजांगें ।। ५२ ।। गुरूचा उगाळू घ्यावया देख । मी होईन आगळा सेवक । नातरी लडिवाळ बाळक । गुरुअंकीं देख मी होईन ।। ५३ ।। माझिया गुणांची सुमनमाळा । आवडीं घालीन गुरूच्या गळां । गुरु झेलिती लीलाकमळा । त्या करकमळा मी होईन ।। ५४ ।। गुरूसी नीराजन करिती । ते मी निजतेजें उजळीन ज्योति । गुरु जेणें प्रकाशें चालती । ते दीपिकादीप्ति मी होईन ।। ५५ ।। जीवभावाचें निंबलोण । गुरूसी मी करीन आपण । इडापीडा मी घेईन जाण । तें लोणलक्षण मज लागो ।। ५६ ।। मी छत्र मी छत्राकारू । मी चवर मीचि चवरधरू । मीचि विंजणा मीचि विंजणेवारू । गुरूचा परिवारू मी होईन ।। ५७ ।। गुरु करिती आरोहण । तो मी होईन श्यामकर्ण । गुरूचा भरभार सहावया जाण । वाजीवाहन होईन मी ।।५८।। गुरुपुढें मी वाटसुभटू । गुणवर्णनीं मी गर्जता भाटू । गुरुगृहीं शांतिपाठू ।

लागतात ते ते सर्व पदार्थ मीच आपल्या देहानें होईन. सद्गुरूला ज्याची आवड असेल तेंहि सर्वांगानें मीच होईन. ४३ सद्गुरूच्या आंचवण्याचें ऊन पाणी, तस्त व आजूबाजूला उडणारे शिंतोडेहि मीच होईन. ४४ गुरूला अर्पण केलेलें फल मी तत्काल होईन व गुरूला अर्पण केल्यामुळें फळाला येणारें सफलत्वहि मीच होईन. ४५ गुरूच्या उच्छिष्टाची तर मला अत्यंत उत्सुकता. त्यासाठीं मी मांजर होऊन त्याचें ताट चटचट चाटीत बसेन. ४६ गुरूच्या हस्तशुद्धीचें सुगंधयुक्त चंदन व मुखाचा सुवासहि मीच होईन. ४७ फलाशेचें खांड फोडून, वासनेच्या शिरा काढून तांबुलरूपानें गुरूच्या मुखांत जाऊन तांबुलाची गोडीहि मीच होईन. ४८ 'अहं-'पणाचें कठिणत्व जाळून मी 'सोहं' हा पवित्र चुना होऊन तो शान्तिरूपी पिकलेल्या पानास लावून मी सद्गुच्या मुखांत जाईन. ४९ सगळ्या सारांचेंहि सार असा कात होऊन सद्गुरूच्या मुखांत मी रंगाच्या रूपानें शोभेन. ५५० सद्गुरूच्या तोंडांतील पवित्र पिंक मीच वरच्यावर झेलून घेईन व पिकदाणीच्या तोंडाचें तोंडहि मीच अवश्य होईन. ५१ मी पिंक व पिकदाणी होऊन गुरूचा चावलेला विडाहि होईन. माशांचें निवारण करण्याची चवरीहि मीच आपल्या अंगानें होईन. ५२ गुरूच्या तोंडांतील विडा घेण्यासाठीं मी मोठ्या आस्थेनें सेवक होईन. किंवा मी गुरूचा लाडका बालक होऊन त्यांच्या मांडीवर बसेन. ५३ माझ्या गुणरूपी फुलांची माळ मी मोठ्या आवडीनें गुरूच्या गळ्यात घालीन आणि गुरु हातानें लीलेनें जें कमळ झेलतात तें त्याचें करकमळहि मीच होईन. ५४ गुरूला नीरांजन ओवाळिते वेळीं त्यांतील ज्योति मी आपल्या तेजानें प्रकाशित करीन आणि ज्या प्रकाशानें गुरु चालतात त्या दिव्याचा प्रकाशहि मी होईन. ५५ मी जीवाभावाचें लिंबलोण करून ते गुरूवरून उतरून टाकीन. इडा-पीडा मजवर घेईन. तो लोणाचा उतारा मलाच बाधो. ५६ छत्र, छत्र धरणारा, चवरी, चवरी वारणारा पंखा, वारा घालणारा व गुरूला सर्व परिवारहि मीच होईन. ५७ गुरूचा बसावयाचा सुलक्षणी घोडा, गुरूचा सर्व भार वाहणारा मोतद्दार ५८ गुरूपुढें

पढता भट्ट मी होईन ॥ ५९ ॥ मीचि वारी मी कन्हेरी । मी हडपी मी फुलारी । मी झाडणा मी खिल्लारी । मी द्वारपाळ द्वारीं होईन ॥ ५६० ॥ गुरु जेथें देती अवधान । ते ते कळा मी होईन जाण । गुरुवेगळा अर्ध क्षण । गेला प्राण तरी न वचें ॥ ६१ ॥ गुरु सांगेती जे कथा । तेथ मी होईन सादर श्रोता । गुरुकृपा मी होईन वक्ता । निजात्मता बोलका ॥ ६२ ॥ गुरु गंभीर दान देतां । तेथ दीन मी होईन मागता । मी होईन दान वांटितां । सादर एकांता होईन ॥ ६३ ॥ गुरु बैसती सावकाश । तैं मी होईन अवकाश । गुरुहृदयींचें चिदाकाश । निरवकाश मी होईन ॥ ६४ ॥ गुरु बैसती आपण । तें मी होईन सुखासन । तें मीचि वाहेन आपण । भोई होईन चालणा ॥ ६५ ॥ स्वामी सूनिया दिठी । चपळ पाउलांच्या नेटीं । चालेन मी उठाउठी । धुरेसि गोठी सांगेन ॥ ६६ ॥ आंतुले दृष्टीं पुढिले चालीं गोवींचें पाऊल उगवोनि घालीं । उंच नीच भूमीची खोली । चुकवूनि चालीं चालेन । ६७ ॥ संकल्प विकल्पांचे झोंक । ज्यांत वाम सव्य अनेक । ते आंवरूनियां देख । पाहत श्रीमुख चालेन मी ॥ ६८ ॥ न चुकतां निजमार्ग । न्याहाळूनि धुरेचें अंग । न करितां आणिकांचा पांग । भोई चांग मी होईन ॥ ६९ ॥ सुखासनाचेनि पडिपाडें । चालतां सुख अधिक वाढे । मागील सूड काढूनि पुढें । सुखसुरवाडें चालेन ॥ ५७० ॥ चढणें पडणें अडखळणें । दडकणें फडकणें अडकणें । सांभाळूनियां निष्ठेनें । टणकपणें चालेन ॥ ७१ ॥ उरीं शिरीं खांदीं कोंपरीं । मागील सूड पुढें धरीं । दृष्टी ठेऊनि पायांवरी । निर्विकारी चालेन ॥ ७२ ॥ आटी मुरडी उलट लोट । धापकांप पडे मेंट । आधार धरूनि सुभट । चढती वाट चालेन ॥ ७३ ॥ उल्लंघूनि कामाचा पाट । आंवरूनि क्रोधाचा लोट । चुकवूनि खोलव्याची वाट । धुरेसकट मी चालेन ॥ ७४ ॥ ममतेची ओल प्रबळ । ते ठायीं रुती गुंती सबळ । तेथ न माखतां पाऊल । लंघूनि तत्काळ जाईन ॥ ७५ ॥ मोहनदीची थोर कराडी । माजीं

मार्गदर्शक, त्याच्या गुणाचें वर्णन करणारा भाट व गुरूच्या घरीं शांतिपाठ बोलणारा भटहि मीच होईन. ५९ गुरूवर अबदागीर धरणारा, चवरी वारणारा, विडा देणारा, फुलें देणारा, झाडणारा, गवळी व दारावरील पहारेकरी मीच होईन. ५६० गुरूचें लक्ष जेथें जाईल, ती वस्तु मी होईन. गुरूवांचून अर्धाक्षणहि प्राण गेला तरी राहणार नाहीं. ६१ गुरु जी कथा सांगतील ती आदरानें ऐकणारा श्रोता मी होईन. गुरूच्या कृपेनें अध्यात्मज्ञान सांगणारा वक्ताहि होईन. ६२ गुरु गंभीरपणानें दान देत असतां मी दीन याचक होईन, गुरूचें दान वांटणारा मीच होईन व एकांतांतील गोष्टी ऐकण्यांत मी तत्पर होईन. ६३ गुरु जेथें सावकाश बसतील तेथील अवकाश मीच व गुरूच्या हृदयांतील अवकाशरहित चिदाकाशहि मीच होईन. ६४ गुरूच्या बसण्याचें सुखासन व तें वाहणारा भोई होऊन मीच भराभर वाहून नेईन. ६५ धन्याकडे लक्ष ठेवून झपाझप पाउलें टाकून खांद्यावर पालखीचा दांडा असतांहि गुरूबरोबर गोष्टी करीन. ६६ पालखींत बसलेल्या गुरूकडे दृष्टि ठेवून पुढें पाऊल टाकीन. उंच, सखल जमीन चुकवून ६७ संकल्प-विकल्पाच्या डाव्या-उजव्या बाजूला अनेकवेळां जाणारा झोंक संभाळून श्रीगुरूच्या मुखाकडे पहात मी चालत जाईन. ६८ आपला मार्ग न चुकवीतां पालखीच्या दांड्याकडे लक्ष ठेवून, दुसऱ्या कोणाची गरज व ठेवितां मी उत्तम भोई होईन. ६९ त्या वहानाच्या आश्रयानें सुख जास्तच वाढत जाईल. मागचा मार्ग पाहून मी पुढला मार्ग मोठ्या आनंदानें कां नाहीं आक्रमण करीन ५७० चढणें, पडणें, अडखळणें, भिणें, पळणें इत्यादि सर्व संभाळून लक्ष ठेवून मी जोरानें पुढें जाईन. ७१ उरावर, मस्तकावर, खांद्यावर, कोपरावर, मागील चढ पुढें धरून पायांकडे दृष्टि ठेवून निर्विकार वृत्तीनें मी चालेन. ७२ टेंकाड, वळण, चढ, उतार, आल्यास मोठ्या नेटानें चढण चढून जाईन. ७३ कामाचा ओघ ओलांडून, क्रोधाचा आवेश आवरून, खड्याची वाट चुकवून धुरेसह मी चालेन. ७४ ममतेची दलदल फार चिकट. त्यांत चतुर माणसेंहि रुतून पडतात; पण तींत पाऊल माखूं न देतां मी तिचेंहि उल्लंघन करून जाईन. ७५ मोहरूपी नदीची दरड फार भयंकर; तिच्या पाण्याचा प्रवाह फार

सबळ जळें प्रबळ बोढी । शिंतोडा न लगतां धूर मी काढीं । परापर थडी तत्काळ ॥ ७६ ॥ दृष्टी ठेवूनि स्वामीकडे । सवेग चालतां मागेंपुढें । भोई होईन दोहींकडे । खूड सुडें काढीन ॥ ७७ ॥ एवं मीचि मी मागें पुढें । सुखासनाचेनि सुरवाडें । स्वामीची निजनिद्रा न मोडे । तेणें पडिपाडें वाहेन ॥ ७८ ॥ उच्छिष्ट अन्नाचा पोसणा । आठांप्रहरांचा जागणा । सदा गुरुगुरु करीत जाणा । गुरुद्वारीं सुणा मी होईन ॥ ७९ ॥ विजाती देखोनि नयना । सोहं भावें भुंकेन जाणा । भजनथारोळा बैसणा । गुरुद्वारीं सुणा मी होईन ॥ ५८० ॥ ऐसऐशिया भावना । गुरुसेवेलागीं जाणा । अतिशयें आवडी मना । नाना विवंचना विवंची ॥ ८१ ॥ जरी दैववशें दूर गेला । परी तो भावबळें जवळी आला । गुरुसेवे जो जीवें विकला । तो शास्त्र पावला सद्विद्या ॥ ८२ ॥ असो जवळी अथवा दूरी । परी गुरुभक्तीची आवडी भारी । जीवित्व ठेविलें सेवेवरी । गुरूच्या द्वारीं भजनासी ॥ ८३ ॥ ऐसा गुरुभक्तीसी सादर । चढत्या आवडीं एकाग्र । तेंचि सद्विद्यालक्षण शस्त्र । गुरुकृपाकुठार पैं पावें ॥ ८४ ॥ लावोनि वैराग्याचे साहाणे । प्रत्यावृत्तिबोधकपणें । शस्त्र केलें जी सणाणें । तीक्ष्णपणें अतिसज्ज ॥ ८५ ॥ शस्त्र सजिलें निजदृष्टीं । दृढ धरिलें ऐक्याचे मुष्टीं । शस्त्र आणि शस्त्रधरा एकी गांठीं । करूनि उठी भवच्छेदा ॥ ८६ ॥ दृढ साधोनियां आवो । निजबळें घालितां घावो । झाला भववृक्षाचा अभावो । घायेंवीण पहा वो छेदिला ॥ ८७ ॥ जीवाशयाची वासना । ते छेदावी निजकल्पना । तोचि भववृक्षाचा छेद जाणा । सावधना धृतिबळें ॥ ८८ ॥ झालिया चैतन्यपदप्राप्ती । सकळ साधनें सहजें जाती । भोजनीं झालिया पूर्ण तृप्ती । ठायींच राहती पक्कान्नें ॥ ८९ ॥ परमतृप्ती उथळल्या पोटीं । अमृतही न लावी ओंठीं । तेवीं ब्रह्मपद पावल्यापाठीं । साधनआटाटी सांडती ॥ ५९० ॥

जोरांत असल्यामुळें ओढहि फार प्रबळ; पण त्याचा शिंतोडाहि लागूं न देतां मी पालखीची धुरा परतीरावर घेऊन जाईन. ७६ स्वामीकडे दृष्टि ठेवून मी मोठ्या वेगानें मागें-पुढें दोहींकडे भोई होऊन निर्विघ्नपणें वाट काढीन. ७७ याप्रमाणें मागें पुढें व मीच राहून स्वामीची झोंपमोड होणार नाहीं, अशा सुखासनानें त्यास मी वाहून नेईन. ७८ उच्छिष्ट अन्नावर पोसलेला, आठहि प्रहर जागणारा, सर्वकाळ गुरु गुरु करणारा असा गुरूच्या दारांतील कुत्रा मीच होऊन राहीन. ७९ विजातीय वस्तू दृष्टीस पडतांच 'सोहं-'भावनेनें मी भुंकूं लागेन आणि भजनरूपी खळग्यांत बसून गुरूच्या दारांतील पाहरेकरीहि मीच होईन. ५८० अशाप्रकारें कल्पना करून गुरुसेवेच्या अत्यंत आवडीमुळें त्याच्या मनांत अनेक तऱ्हेचे विचार घोळत असतात. ८१ दैवयोगानें तो जरी गुरूपासून दूर गेला तरी भक्तिबळानें तो त्याच्या जवळच असतो. त्यानें गुरुसेवेसाठीं आपला जीव विकला असल्यामुळें त्याला सद्विद्याशास्त्र सहज अवगत होतें. ८२ तो गुरूच्याजवळ असो किंवा दूर असो त्याला गुरुभक्तीची अतिशय आवड असल्यामुळें त्यानें आपलें जीवित गुरूच्या सेवेसाठीं त्याच्या दारांत भजन करण्यांत लाविलेलें असतें. ८३ असा तो गुरुभक्तींत सादर असल्यामुळें व वाढत्या आवडीनें एकाग्रता झाल्यामुळें गुरुकृपाकुठाररूपी सद्विद्यालक्षणशस्त्र त्यास प्राप्त होतें. ८४ त्याला तो वैराग्यरूपी सहाणेवर घांसून स्वरूपाकारवृत्तीनें पाजळून चकचकीत करितो. तेव्हां त्याला तीक्ष्ण धार चढते. ८५ आपल्या दृष्टीनें शस्त्र तयार करून तें ऐक्याच्या मुठींत घट्ट धरिलें कीं शस्त्र व शस्त्र धरणारा यांचें तादात्म्य होऊन तो संसार छेदून टाकण्यास उठतो. ८६ बरोबर नेम धरून आपल्या शक्तीनें घाव घालितांच संसारवृक्षाचा अभाव होतो, घांव बसल्यावांचूनच त्याचा छेद होतो, पहा ! ८७ लिंगशरीराची वासना अशी जी आपली कल्पना तिचा छेद करणें म्हणजेच संसारवृक्षाला आपल्या बुद्धिसामर्थ्यानें तोडणें होय. ८८ एकदा आकंठ भोजन झालें कीं, मग सर्व पक्वान्नें जशीं जागच्या-जागींच रहातात, तशीच एकदा ब्रह्मप्राप्ति झाली कीं मग सर्व साधनें आपोआप नाहींशीं होतात. ८९ एकदा पोट भरून तृप्ति झाल्यावर मग अमृत देखील ओठाशीं नेववत नाहीं, तसेंच आत्मसाक्षात्कार झाल्यावर साधनाची यातायात सहजच सुटते. ५९० हाच हेतु

हाचि भावो धरोनि चित्तीं । मागा सांगीतलें तुजप्रती । सांडीं साधनव्युत्पत्ती । प्रवृत्तीनिवृत्तीसमवेत ॥ ९१ ॥ पावलिया परब्रह्म । मिथ्या वेदोक्त सकळ कर्म । मिथ्या आश्रमादि वर्णधर्म । हें त्यागितें वर्म कर्माचें ॥ ९२ ॥ स्वप्नीं चालतां लवडसवडीं । जो अडखळूनि पडला आडीं । तो जागा होऊनि आपणातें काढी । तैशी वृथा वोढी साधनीं ॥ ९३ ॥ पीक आलिया घुमरी । ते शेतीं कोण नांगर धरी । गजांतलक्ष्मी आलिया घरीं । भीक दारोदारीं कोण मागे ॥ ९४ ॥ हातीं लागलिया निधान । नयनीं कोण घाली अंजन । साधलिया निजात्मज्ञान । वृथा साधन कोण सोशी ॥ ९५ ॥ अंगीकारोनि ज्ञानशक्ती । केली संसारनिवृत्ती । ते हे त्यागावी निजवृत्तीं । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९६ ॥ अग्नीस्तव निपजे अन्न । तें वाफ न जिरतां परमान्न । पोळी अवशेष तापलेपण । रांधितेंही जाण चवी नेणे ॥ ९७ ॥ आंबया पाडु लागला जाण । तरी अंगीं असे आम्लपण । सेजेसि मुरलिया मघमघोन । न चाखतां घ्राण चवी सांगे ॥ ९८ ॥ सेजे मुरावयाची गोठी । तेथ न व्हावी द्वैताची दिठी । येरयेरां जाहलिया भेटी । दोनी शेवटीं ठिकाळती ॥ ९९ ॥ ठिकाळलीं सेजे घालिती । तत्संगें आणिकें नासतीं । निश्चळ राहिल्या एकांतीं । परिपाकपूर्ती घ्राण सांगे ॥ ६०० ॥ शत्रु जिणोनियां कडाडीं । रणांगणीं उभवितां गुढी । शस्त्रेंसीं कवच जंव न फेडी । तंव विश्रांति गाढी न पविजे ॥ १ ॥ गरोदरीसी प्रसूति होये । पुत्रजन्में सुखावली ठाये । तेही बारावळी जैं पाहे । तैं भोगूं लाहे पुत्रसुख ॥ २ ॥ पुरुष निमोनियां जाये । त्या देहाचें दहन होये । तरी अवशेष सुतक राहे । तें गेलिया होये निजशुद्धी ॥ ३ ॥ तेवीं जावोनियां अज्ञान । उरला जो ज्ञानाभिमान । तोही त्यागिलिया जाण । चित्समाधान स्वानंदें ॥४॥ खैराचा शूळ तत्त्वतां मारी । मा चंदनाचा काय आन करी । तेवीं अभिमान दोहींपरी । बाधकता धरी ज्ञानाज्ञानें ॥ ५ ॥ लोखंडाची बेडी तोडी । आवडी सोनियाची जडी । चालतां तेही तैशीच

मनांत धरून मीं तुला पूर्वीं प्रवृत्ति-निवृत्तिसह सर्व साधनें सोडून देण्यास सांगितलें. ९१ परब्रह्मप्राप्ति झाल्यावर सगळें वेदोक्त कर्म व आश्रमादि वर्णांचे धर्म व्यर्थ होतात. हेंच कर्मत्यागाचें रहस्य आहे. ९२ स्वप्नांत गडबडीनें चालणारा अडखळून विहिरींत पडला तर त्यानें जागें झाल्यावर स्वतःला बाहेर काढण्यासारखेंच हें साधनाचें वेड व्यर्थ आहे. ९३ भरपूर पीक आलेल्या शेतावर नांगर कोण फिरवील ! किंवा गजान्तलक्ष्मी घरीं चालून आली असतां दारोदार भिक्षा कोण मागणार ! ९४ पुरलेलें धन हातीं आल्यावर मग तें सांपडण्यासाठीं डोळ्यांत अंजन कोण घालणार ! त्याचप्रमाणें आत्मज्ञान झाल्यावर मग साधनाचे कष्ट व्यर्थ कोण सोसणार ! ९५ हे उद्धवा ! ज्ञानशक्तीचा अंगीकार करून संसाराची निवृत्ति झाली म्हणजे मग ती ज्ञानवृत्तीहि निश्चयानें टाकावी ९६ अग्नीच्या योगानें अन्न तयार होतें, पण त्याची वाफ जिरल्यावांचून तें परम अन्न होत नाहीं. पोळी पूर्णपणें भाजल्यावांचून ती गोड लागत नाहीं. ९७ आंब्याला पाड आला तरी तो किंचित् आंबट असतोच. पण तोच आढीस घालून मुरला म्हणजे त्याचा घमघमाटच चाखल्या-वांचून त्याची गोडी सांगतो. ९८ आढीस घातलेले आंबेहि एकमेकांस चिकटूं देतां उपयोगी नाहीं. त्यांनाहि द्वैताची दृष्टि लागतां कामां नये. कारण ते एकमेकांस चिकटले तर शेवटीं दोन्ही डागळतात. ९९ डागळलेला आंबा जर आढीस घातला, तर त्याच्याबरोबर दुसरे सर्व आंबे नासून जातात. पण तेच पूर्णपणें वेगळे व राहिले तर त्यांच्या पक्वपणाची खूण त्यांच्या वासावरून आपलें नाकच ओळखूं शकतें. ६०० मोठ्या धडाक्यानें शत्रूला जिंकून रणांगणावर विजयध्वज उभारिला तरी हातांतील शस्त्रें व अंगावरील कवच जोंपर्यंत काढून ठेविलें नाहीं तोंपर्यंत वीराला खरी विश्रांति मिळत नाहीं. १ गरोदर स्त्री प्रसूत होऊन पुत्रजन्मानें जरी आनंदित झाली तरी त्याचें बारसें होईपर्यंत तिला खऱ्या पुत्रसुखाचा अनुभव येत नाहीं. २ मनुष्य मरण पावल्यावर त्याचें दहन करूनच भागत नाहीं. तर सुतक मागें रहातेंच. तें जेव्हां फिटतें तेव्हांच आपली खरी शुद्धि होते. ३ त्याप्रमाणें अज्ञानाचें निरसन झाल्यावर जो ज्ञानाभिमान उरतो, तोहि जेव्हां टाकावा तेव्हांच आत्मसुखाचा स्वानंद लाधतो. ४ खैराच्या लांकडाचा सूळ बनविला तर तो मात्र जीव घेतो आणि चंदनाचा केला तर प्राण घेतल्यावांचून का रहातो ! त्याचप्रमाणें ज्ञान व अज्ञान या दोहोंचा अभिमान सारखाच बाधक होतो. ५ लोखंडाची बेडी तोडून टाकिली व आवडीनें सोन्याची

आडी । बाधा रोकडी जैशी तैशी ॥ ६ ॥ ' ब्रह्माहमस्मि ' हा अभिमान । शुद्ध ब्रह्म नव्हे जाण । अहंपणें तेंही कठिण । तेंही लक्षण अवधारीं ॥ ७ ॥ जळापासोनि लवण होये । तें जळींचें जळीं विरोनि जाये । मोतीं झालें तें कठिण पाहें । उदकीं न जाये विरोनी ॥ ८ ॥ मुक्तपणें मोला चढलें । तें वनिताअधरीं फांसां पडिलें । मुक्तचि परी नासा आलें । कठिण केलें अभिमानें ॥ ९ ॥ तेवीं अज्ञान-अभिमान आहे । तो सर्वथा तत्काळ जाये । ज्ञानाभिमान कठिण पाहें । गोंविताहे मुक्तत्वें ॥ ६१० ॥ अपक्व घट्ट तत्काळ गळे । तो पृथ्वीचा पृथ्वीस मिळे । भाजिलें खापर अतिकाळें । पृथ्वीस न मिळे कठीणत्वें ॥ ११ ॥ प्रपंच अज्ञानें झाला लाठा । ज्ञानअज्ञानांचा सत्ववांटा । फेडूनि कांटेन कांटा । दोन्ही आव्हांटा सांडावे ॥ १२ ॥ जरी सांडिले वाटेवरी । तरी अवचटें आपणासीचि बाधु करी । यालागीं सांडावे दूरी । निजनिर्धारीं हा त्यागू ॥ १३ ॥ जेथवरी अहंपण । तेथवरी बद्धकता जाण । शुद्धाशुद्ध अभिमान । निःशेष सज्ञान सांडिती ॥ १४ ॥ उद्धवा तुजकरितां माझी भक्ती । झाली माझ्या निजपदाची प्राप्ती । आतां नाना साधनउपपत्ती । शास्त्रव्युत्पत्ती कां करिसी ॥ १५ ॥ सद्भावें करितां माझें भजन । तूं झालासी ब्रह्मसंपन्न । आतां सद्विद्यादि सर्वसाधन । शास्त्रश्रवणेंसीं सांडीं पां ॥ १६ ॥ ' तस्मादुद्धव उत्सृज्य ' । ये श्लोकींचें हें त्यागबीज । विशद सांगीतलें म्यां तुज । निजगुज हृदयस्थ ॥ १७ ॥ सकळां साधनां श्रेष्ठ साधन । शिष्यासी सद्गुरूचें भजन । तेणें पाविजे ब्रह्मसमाधान । सत्य जाण उद्धवा ॥ १८ ॥ जो भावें भजे गुरुचरणीं । तो नांदे सच्चिदानन्दभुवनीं । हे सत्य सत्य माझी वाणी ।

करून पायांत घातली तर चालतांना अडखळून दोहोंचे क्लेश सारखेच होणार. ६ ' ब्रह्माहमस्मि ' हा अभिमान असणें हें शुद्ध ब्रह्म नव्हे, असें समज. अहंपणामुळे तेंहि कठिण आहे. त्याचे लक्षण आतां ऐक. ७ मीठ पाण्यासून होतें व तें पाण्यांतच विरून जातें. परंतु मोतीं पाण्यांतच उत्पन्न होतें. तें त्याच्या अंगाच्या कठिणपणांमुळें पाण्यांत विरत नाहीं. ८ त्यांच्या मौक्तिकत्वामुळें तें मूल्यवान् होतें. परंतु तें सोन्याच्या तारेंत गुंतून स्त्रीच्या ओंठावर अडकून पडतें. तसेंच मुक्तहि अभिमानामुळें बंधांत पडतात. (किंवा मीठ पाण्यांत विरतें व मोतीं आपल्या अंगाच्या कठिणत्वामुळें स्त्रियांच्या नाकांतील नथींत जसें अडकून पडतें.) ९ त्याप्रमाणें अज्ञानामुळें असलेला अभिमान तत्काळ नाहींसा होतो. पण ज्ञानाभिमान मात्र फार कठिण. तो मुक्तत्वानेंच गुंतून टाकितो. ६१० मातीचा कच्चा घट फुटतांच तत्काळ मातींत मिळून जातो. पण पक्के भाजून काळें झालेलें खापर फुटलें तरी आपल्या कठिणपणामुळें मातींत मिळत नाहीं. ११ अज्ञानामुळें हा प्रपंच फार प्रतिबंधक झाला आहे. त्या अज्ञानाला ज्ञानानें आधीं दूर करावें व मग कांट्यानें कांटा काढण्याप्रमाणें ज्ञानाचा सत्त्वांशहि दूर आडवाटेंत फेंकून द्यावा १२ आणि ज्ञान व अज्ञान यांनीं रहित होऊन स्वस्वरूपीं समरस होऊन रहावें. तो वाटेवर टाकल्यास आपल्यालाच पुनः बाधक होईल, म्हणून दूर आडवाटेवर टाकून द्यावा. हाच खरा त्याग होय. १३ जोंपर्यंत अहंपणा आहे, तोंपर्यंत बद्धकता आहे. 'मी देह' हा अशुद्ध अभिमान व 'मी ब्रह्म' हा शुद्ध अभिमान. हे दोन्ही बाधक आहेत. १४ आत्मज्ञानी हे दोन्ही अभिमान टाकितात. हे उद्धवा ! तुला माझ्या भक्तीनेंच माझ्या पदाची प्राप्ति झाली आहे. अनेक साधनांची खटपट व शास्त्राची वाटाघाट तरी कशाला करितोस ! १५ सद्भक्तीनें माझें भजन करून तूं ब्रह्मस्वरूपच झाला आहेस. म्हणून आतां सद्विद्यादि सर्व साधनें शास्त्रश्रवणासह सोडून दे. १६ (' तस्मादुद्धव उत्सृज्य ' श्लो. १४. पृ. ७९४) हे श्लोकांतील मूळ पदाचें त्यागबीज, माझ्या हृदयांतील रहस्य मीं तुला स्पष्ट करून सांगितलें. १७ हे उद्धवा ! शिष्याला सद्गुरूचें भजन हेंच सर्व साधनांतील श्रेष्ठ साधन आहे. त्यानेंच खरोखर

विकल्प कोणीं न धरावा ॥ १९ ॥ ऐसें बोलोनि श्रीहरी । आवडीं चारी बाह्या पसरी । उद्धवातें प्रीतींकरीं । हृदयीं धरीं स्वानंदें ॥ ६२० ॥ देवें सद्भक्ता क्षेम दीधलें । निजहृदयीं हृदय एक झालें । सांगणें पुसणें सहज ठेलें । बोलणें बोलें प्राशिलें ॥ २१ ॥ चहूं वाचां पडलें मौन । जीवू विसरला जीवपण । एका तुष्टला जनार्दन । स्वानंदघन सद्भक्तां ॥ २२ ॥ तेचि सद्भक्तीचा भावार्थ । विशद बोलिला बाराव्यांत । निजभावें श्रीकृष्णनाथ । नित्य प्राप्त भाविकां ॥ २३ ॥ निजात्मप्राप्तीचें कारण । केवळ भावार्थचि जाण । भावार्थाविगळें साधन । वृथा जाण परिश्रमू ॥ २४ ॥ जप तप यज्ञ दानें । भावार्थालागीं करणें । तो भावार्था लाहिजे जेणें । धन्य जिणें तयाचें ॥ २५ ॥ धन्य नरदेहाची प्राप्ती । धन्य साधूची संगती । धन्य धन्य ते भावार्थी । जे भगवद्भक्तीं रंगले ॥ २६ ॥ जे रंगले भगवत्पथा । त्यांचें चित्त विसरलें विषयावस्था । ते हंसगीताची कथा । उद्धव कृष्णनाथा पुसेल ॥ २७ ॥ ते अतिसरळ निरूपण । केवळ शुद्ध ब्रह्मज्ञान । श्रोतां व्हावें सावधान । एका जनार्दन विनवितू ॥ ६२८ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंदे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे भगवदुद्धवसंवादे द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

ब्रह्मसमाधान मिळतें, असें तूं समज. १८ जो भक्तिभावानें गुरुचरणांचें भजन करितो, तो सच्चिदानंदभुवनांत रहातो. हें माझें वचन सत्य सत्य जाण. यांत कोणीहि संशय धरूं नये. १९ श्रीहरीनें असें बोलून आपले चारी हात पसरले व मोठ्या प्रेमानें व आनंदानें उद्धवाला हृदयाशीं धरिलें. ६२० देवानें सद्भक्ताला आलिंगन दिल्यामुळें दोघांचीं हृदयें एकमेकाला मिळालीं. सांगणें व विचारणें हीं दोन्हीं जागच्याजागीं राहिलीं. शब्दांत शब्द लीन झाले. २१ चारी वाणींनीं मौन धरिलें. जीव जीवत्व विसरला. भक्तांना स्वानंदघन असलेला एकनाथरूपी जनार्दन संतुष्ट झाला. २२ त्याच सद्भक्तीचा 'श्रीकृष्ण भक्तांना केवळ भक्तीनेंच प्राप्त होतो' हा भावार्थ बाराव्या अध्यायांत स्पष्ट करून सांगितला. २३ केवळ भावार्थच आत्मप्राप्तीचें साधन आहे. भावार्थावांचून इतर साधनें केवळ वृथा श्रम होत. २४ जप, तप, यज्ञ, दान, हीं सर्व भक्तीच्या प्राप्तीसाठीं करावयाचीं असतात. ती भक्ति ज्याला लाधली त्याचें जीवित धन्य होय. २५ नरदेहाची प्राप्ति व त्यांत साधूंची संगति धन्य होय. जे भगवद्भक्तींत रंगले ते भाविक जनच धन्य, धन्य होत. २६ भगवन्मार्गांत जे रंगतात, त्यांचें चित्त विषयावस्थेला विसरतें. उद्धव श्रीकृष्णाला आतां हंसगीताची कथा विचारील. २७ तें अतिशय रसाळ, केवळ शुद्ध ब्रह्मज्ञानाचें निरूपण ऐकण्यास श्रोत्यांनीं आतां सावधान चित्त करावें, असें एका-जनार्दन विनवीत आहे. ६२८.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित

टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवाद

नांवाचा बारावा अध्याय समाप्त झाला.